Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

C No - 35975

मुद्राराक्षसम्.

015,2D40:g,1
155D6

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी.

गिरगांव, मुंबई.

किंमत ०-१०-०.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

O15,2D40:g1 3595
155D6

Kalidas

Mudrarakshak tr. by
Krishnashastri
rajwade.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञानमंदिरम्
जंगमवाड़ी मठ काशी

मुद्राराक्षस.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. ....
3595

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

MUDRÂ-RÂKSHASA.

A SANSKRIT DRAMA.

TRANSLATED INTO MARATHI

BY

KRISHNA SHÂSTRÎ RÂJWÂDE,

AND REVISED AND CORRECTED

BY

KRISHNA SHÂSTRÎ CHIPLUNKER,

AND EDITED

BY

SHANKER P. PANDIT, M. A.,

BOMBAY:

MANORANJAK GRANTHA PRASARAK MANDALEE.

1906.

SRI JAGADGURU VISHWARADHYA JNANA SIMHASAN JNANAMANDIR LIBRARY Jangamwadi Math, Varanasi ACC No. ....

All rights reserved.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

015,2D40;g.1
155D6

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 3595

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते ।

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक २३ वें.

मुद्राराक्षस.

(संस्कृत नाटकाचें भाषांतर.)

प. वा. श्रीयुत कृष्णशास्त्री राजवाडे

यांनीं लिहिलें

[द्वितीयावृत्ति]

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव-मुंबई.

किंमत ०-८-०.] [दिसेंबर १९०६.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Printed at the KARNATAK Printing Works.

BOMBAY.

हें पुस्तक ग्रंथकर्त्याच्या वारसापासून विकत घेऊन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून ह्याच्या प्रकाशनासंबंधाचे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकाशकांचे दोन शब्द.

प्रकृत पुस्तक, परलोकवासी श्रीयुत कृष्णशास्त्री राजवाडे यांनीं तयार केलेल्या व परलोकवासी श्रीयुत कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं तपासून शुद्ध केलेल्या व प. वा. शंकर पांडुरंग पंडित, एम. ए. यांनीं एडिट केलेल्या संस्कृत 'मुद्राराक्षस' नाटकाच्या भाषांतराची द्वितीयावृत्ति आहे. सुमारें ४० वर्षांपूर्वी ह्मणजे इ. स. १८६७ सालीं ह्याची १ ली आवृत्ति प्रसिद्ध झाली होती. सांप्रत हें पुस्तक बहुतेक दुर्मिळच झालें होतें. ह्या सुरस नाटकाची ही मराठी प्रतिकृति महाराष्ट्र वाचकांच्या दृष्टीआड होऊं नये, ह्मणून आज मुद्दाम प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

१८६७ झालीं प्रसिद्ध झालेल्या पहिल्या आवृत्तींत आणि ह्या आवृत्तींत पुढीलप्रमाणें थोडासा फेरफार केला आहे. मूळांतील अर्थ कायम ठेवून कित्येक ठिकाणीं असलेली संदिग्ध वाक्यरचना आणि दूरान्वय कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. देतां आले तेथें निरनिराळे प्रवेश दिले आहेत, व दुसरेहि असेच कित्येक किरकोळ फेरफार आणि आवश्यक वाटल्या त्या सुधारणा केल्या आहेत.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीचें कार्यालय,
गिरगांव-मुंबई,
२०, दिसेंबर, १९०६.

काशीनाथ रघुनाथ मित्र.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

" कित्येक प्रकारचे ग्रंथ असे असतात कीं, ते वाचतां वाचतां जो आल्हाद वृद्धिंगत होतो, तो व पुढें काय सांगितलें आहे, पुढें काय होणार आहे, गोष्टीचा शेवट कसा व्हावयाचा, बऱ्यास बरें, व वाईटास वाईट झालें कीं नाहीं, हें जाणण्याची जी आपली उत्कंठा असते, त्यापासून बहुत अंशीं होत असतो. ह्मणूनच एखाद्या गोष्टीचें तात्पर्य आपणांस पूर्वी समजलें असलें, तर ती गोष्ट वाचण्यास फारशी उत्कंठा नसते. अशा प्रकारचीं पुस्तकें कल्पित गोष्टी व नाटकें हीं होत. पण मुख्यत्वेंकरून ह्मटलीं ह्मणजे नाटकेंच खरीं. याचें कारण उघडच आहे. तें हें कीं, एखादी गोष्ट गुप्त ठेवावी, तितकें तिचें औत्सुक्य उत्पन्न होऊन ती ऐकावी असें आपणांस वाटत असतें. आणि नाटकांतील ज्या कथा असतात, त्यांचा प्रकार असाच असतो. चांगले नाटककार आपल्या नाटकाचें संविधानक अशा रीतीनें बांधितात कीं, सगळ्या कथेचा शेवट काय होणार, व कोण कोणत्या पात्रांची कशी कशी दशा होणार, हें पूर्वीं कांहींच सुचवित नसतात. यामुळें वाचणारा किंवा पाहणारा याचें मन अगदीं तल्लीन झालेलें असतें. ह्मणून नाटकाचें संविधानक कसें काय आहे, तें पूर्वीं स्पष्टपणें वाचणारास किंवा पाहणारास समजाविणें, हें बराबर नाहीं.

असें आहे, तरी मुद्राराक्षस नाटकाची कथा इतकी बिकट आहे कीं, तिजविषयीं पूर्वीं कांहींच ठाऊक नसलें, तर तें नाटक नीटपणें समजणें फार कठिण होईल ह्मणून केवळ आवश्यकतेमुळें थोडेंसें तात्पर्य खालीं लिहिलें आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिकंदर बादशहाचे वेळेस, ह्मणजे अजमासें दोन हजार दोनशें वर्षांपूर्वी, मगध ह्मणजे बहार देशांत, पाटलिपुत्र नामें नगरांत, शैशुनाग या क्षत्रिय वंशांतील नंद नांवाचा राजा राज्य करित होता. त्यालाच महापद्मनंद असेंहि ह्मणत. पाटलिपुत्र नगरास पुष्पपुर किंवा कुसुमपुर असें नांव असे. तूर्त जें पाटणा या नांवाचें शहर आहे, तेंच हें पाटलिपुत्र असावें, असें बहुतेक विद्वानांचें मत आहे. नंद राजा हा शूद्र जातीच्या आई-पासून जन्मलेला, अशीही कथा आहे. या नंद राजास आठ मुलगे होते. हे आठ मुलगे, व त्यांचा बाप महापद्मनंद राजा, ह्या सर्वांस मिळून नऊ नंद राजे असें ह्मणतात. महापद्मनदास, पट्टराणीपासून झालेल्या नऊ पुत्रांखेरीज नीच जातींतील मुरा या नांवाच्या स्त्रीपासून झालेला चंद्रगुप्त, हाहि एक मुलगा असे. चंद्रगुप्तास त्याच्या आईवरून मौर्य असेंही नांव आहे व त्याच कारणावरून त्याला वृषल असेंहि नांव पडलें आहे. महापद्मनंद राजा हा बलाढ्य, जयशाली व शक्तिमान असे, तरीहि स्वभावानें निर्दय व क्रूर असे. त्यामुळें व विशेषेंकरून मातृपक्षीं नीच जन्म असल्यामुळें, ब्राह्मण लोकांस तो आवडत नव्हता. विष्णुगुप्त नांवाचा एक विद्वान् व राज्यनीतींत अतिनिपुण असा ब्राह्मण, ज्याला चाणक्य असेंहि ह्मणतात, तो भोजनार्थी असतां राज-वाड्यांत जाऊन मुख्य स्थानीं बसला तेव्हां, हा कोणी अज्ञान, हलकट, भोजनभाऊ भट असेल, असें समजून नंदराजानें त्याला आसनावरून ओढून काढविलें. हा अपमान होतांच चाणक्य यानें आपली शिखा सोडून, अशी प्रतिज्ञा केली कीं, "या दुष्ट व नीच राजांचा जेव्हां पूर्ण नाश करीन, तेव्हांच ही शिखा बांधीन, मधें बांधणार नाहीं." असें ह्मणून, चाणक्यानें चंद्रगुप्त याला आपल्या हाताखालीं घेऊन नऊ नंदां-चें निःसंतान करून, चंद्रगुप्त अजून वयांत आला नव्हता तरी त्याला गादी-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर बसविलें. नंदांचा ह्याप्रमाणें विध्वंस करण्याच्या कामांत, व चंद्रगुप्ताला गादीवर बसविण्याच्या कामांत, चाणक्यादिकांस उत्तर हिंदुस्थानांतील पर्वतेश्वर नांवाच्या एका राजानें मदत केली होती. मदतीस आल्यास नंदाच्या राज्याचा कांहीं भाग तुझांला बक्षिस देऊं, असें चाणक्यानें त्या राजास कबूल केलें होतें. पुढें त्या राजास चाणक्यानें कपटानें मारविलें; तेव्हां त्याचा मुलगा मलयकेतु हा बापाच्या खुनाचा सूड उगविण्याकरितां पाटलिपुत्र नगरावर चाल करून आला. त्यानें आपल्याबरोबर हिंदु शिवाय पुष्कळ यवन सैन्य आणलें होतें; हे यवन लोक फार करून ग्रीक लोक असावेत. कारण, यावेळीं उत्तर हिंदुस्थानांत व आसपास ग्रीक लोकांचें बरेंच माहात्म्य असे. पण शेवट असा झाला कीं, मलयकेतु व त्याच्या मदतीस आलेले यवन राजे, यांच्यामध्यें चाणक्यानें मोठ्या मसलतीनें फूट पाडून ह्यांची धुळधांड उडविली व ते जिकडे तिकडे नाहींसे झाले, आणि चंद्रगुप्तानें चोवीस वर्षें सुखानें राज्योपभोग घेतला.

आतांपर्यंत सांगितलेल्या त्रोटक कथानकांत असंभाव्य असें फारसें कांहीं दिसत नाहीं. एवढी गोष्ट फार करून इतिहासदृष्ट्या पाहिली असतां खरी असेल, असें वाटतें.

नाटककारानें आणखी कित्येक लहान मोठ्या गोष्टींचा संग्रह केला आहे. नंदांच्या पक्षाचा, स्वामिभक्तीविषयीं प्रख्यात, असा राक्षस या नांवाचा एक प्रधान असे. नंदांचा नाश झाला, ह्याचा सूड उगवण्यासाठीं तो मलयकेतूस जाऊन मिळाला. ह्याला आपल्या ऐश्वर्याचा नाश झाला हें कांहींच वाटत नसे; पण आपल्या राजांचा नाश झाला, तेणेंकरून तो फार दुःखी असे; आणि केवळ स्वामिभक्तीसाठीं मलयकेतूस हातीं धरून तो चंद्रगुप्ताच्या नाशास प्रवृत्त झाला होता. त्यास

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोणत्याही उपायांनीं आपल्या पक्षाकडेस आणावा, हा चाणक्याचा मुख्य हेतु होता; त्या हेतूसाठीं चाणक्यानें अनेक तऱ्हेचे कपटयुक्तीनें परिपूर्ण असे उपाय केले.

तशाच राक्षसानेंहि चंद्रगुप्तास मारण्याच्या व चाणक्यास ठकविण्याच्या अनेक युक्ति केल्या. पण चाणक्य हा इतका मतलबी असे कीं, आपला हेतु सिद्धीस नेण्याकरितां, ज्या ज्या युक्ति राक्षस करी, त्या त्या त्याच्याच पक्षाच्या नाशास कारण व्हाव्या, असें तो करी.

चाणक्य यानें पुष्कळ युक्ति केल्या. त्यांतून मुख्य ह्या कीं, त्यानें आपले मित्र राक्षसाकडे अनेक मिषांनीं पाठवून ते त्याच्या विश्वासांतील सखे किंवा सेवक होत, असें करविलें. आणि याच कपटमित्रांनीं, शेवटीं राक्षस आणि मलयकेतु यांमध्यें भेद पाडून राक्षसास मलयकेतूच्या सैन्यांतून बाहेर काढलें. अशा स्थितींत तो असतां, चाणक्यानें त्याच्या एका परम मित्रास सुळीं देण्याच्या निमित्तानें वध्यस्थानीं आणविलें, आणि त्याला सुळीं देत आहेत, इतक्यांत राक्षसानें तेथें येऊन त्याचा सूळ दूर करण्यासाठीं आपणास शत्रूच्या हातीं पाडविलें आणि शेवटीं तो चंद्रगुप्ताचा प्रधान होऊन राहिला.

नंद व मौर्य यांची कथा भागवत, विष्णुपुराण, बृहत्कथा इत्यादि संस्कृत ग्रंथांत सांगितली आहे, व डायोडोरस सिक्युलस, स्तेत्रो, कर्षस अर्यन, जास्ति, प्लूटार्क इत्यादि ग्रीक व ल्याटिन ग्रंथकारांनीं वर्णन केली आहे.

या कथेवरून इतकें स्पष्ट होतें कीं, मुद्राराक्षस नाटक इतर नाटकांसारखें नव्हे. त्यांतील पात्रें देव किंवा इतर अपौरुष व्यक्ति नसतां, केवळ होऊन गेलेले खरे पुरुषच आहेत. दुसरें असें कीं, कथा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खरी असून नाटकांत सांगितलेल्याच प्रकारानें बहुत करून घडली आहे.

राक्षसास आपल्या पक्षास आणविण्याची जी युक्ति चाणक्यानें केली, ती राक्षसाची मुद्रा कपटसाधनानें संपादन करून, तिच्याद्वारें केली, यावरूनच या नाटकास मुद्राराक्षस हें नांव दिलें आहे. या मुद्राराक्षस नाटकांतील गोष्ट जरी अजमासें एकवीसशें किंवा बेवीसशें वर्षांपूर्वीं घडली, तरी हें नाटक कोणत्या वेळीं व कोठें रचिलें व रचणारा मनुष्य कोठचा कोण होता, हें बरावर समजत नाहीं. नाटकाच्या आरंभीं, विशाखदत्तानें हें नाटक रचिलें, असें लिहिलें आहे व हा कवि पृथु महाराजाचा मुलगा, व पृथु महाराज वटेश्वरदत्त या मांडलिक राजाचा नातू, असें लिहिलें आहे खरें, पण इतक्यावरून ते कोण होते, हें बरोबर कळत नाहीं. तरीहि कोणी अशी कल्पना करितात कीं, अजमीरचा पृथु नामें जो चवाण इसवी सनाच्या बाराव्या शतकाच्या शेवटीं मुसलमान लोकांनीं मारला, तोच हा असावा.

वर लिहिलेला मजकूर फार करून प्रोफेसर उइल्सन यांच्या ग्रंथांतून घेतला आहे.

शंकर पांडुरंग पंडित."

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या नाटकांतील पात्रें.

सूत्रधार.	नाटकाचा कर्त्ता.
चाणक्य.	चंद्रगुप्त राजाचा प्रधान.
राक्षस.	नंदाचा प्रधान.
चंद्रगुप्त.	पाटलीपुत्र नगराचा राजा.
मलयकेतु.	पर्वतक राजाचा पुत्र.
भागुरायण.	चाणक्याचा फितुरी. पण बाहेरून मलयकेतूचा मित्र ह्मणविणारा.
सिद्धार्थक.	चाणक्याचा फितुरी असून बाहेरून राक्षसाचा नोकर ह्मणविणारा.
समिद्धार्थक.	सिद्धार्थकाचा मित्र.
दीर्घश्रृंग.	चाणक्याचा नोकर.
क्षपणक.	चाणक्याचा फितुरी असून बाहेरून राक्षसाचा मित्र ह्मणविणारा.
चर.	चाणक्याचा गुप्त बातमीदार.
शार्ङ्गरव.	चाणक्याचा शिष्य.
विराधगुप्त.	गारुडयाचें सोंग घेऊन हिंडणारा राक्षसाचा गुप्त बातमीदार मित्र.
करभक.	राक्षसाचा गुप्त बातमीदार.
प्रियंवदक.	राक्षसाचा नोकर.
शकटदास. चंदनदास.	राक्षसाचे मित्र.
कंचुकी.	चंद्रगुप्ताचा भालदार.
स्तुतिपाठक.	चंद्रगुप्ताचे भाट (राक्षसाचे फितुरी.)
भासुरक.	भागुरायणाचा नोकर.
चाण्डाळ.	मारेकरी.
पुत्र.	चंदनदासाचा.
नटी.	सूत्रधाराची स्त्री.
शाणोत्तरा.	चंद्रगुप्ताची द्वारपालिका.
विजया.	मलयकेतूची द्वारपालिका.
स्त्री.	चंदनदासाची.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुद्राराक्षस नाटक.

अंक १ ला.

मंगलाचरण.

[सूत्रधार प्रवेश करितो.]

"श्रीकंठा[1] ! तुमच्या शिरावरि असे ही कोण धन्या ? मला
सांगा." "पार्वति, ही असे शशिकला अत्यंत जी कोमला."
"हीचें नामाचि काय? हे पशुपते!" "होतेचि कां तूजला
ही भ्रांती ? सहवास नित्य असतां कां नेणशी हीजला ?" १
"मी नारीस विचारितें; न पुसतें चंद्रास." "सांगो तरी
तूतें ती विजया[2]; नसे शशि असा विश्वास तूला जरी!"
गंगेतें लपवावया करि अशी जो पार्वतीवंचना[3],
तत्कापट्य[4],– हरोनि दुःख अवघें,– रक्षो सदा सज्जना. २

पद.

रक्षो तें नृत्य तुह्मातें, त्या त्रिपुरासुर विजयीचें. ।धृ०।
थइ थइ थइ थइ स्वच्छंदानें पाय टाकितां भारी
भूमी लवतां संभाळुनियां नाचतसे कामारी. १
अभिनयकालीं ब्रह्मांडावरि जातां भुजदंडांतें
आटोपुनि जो नाचत नाचत पावे आनंदातें. २
तृतीय नेत्रांतुनि निघतां ती भडभड वन्हिज्वाला
क्षणांत जाळुनि टाकितील ज्या निश्चित सकल जगाला. ३
यास्तव दृष्टी संकोचुनियां लक्ष्याप्रति[5] जो पाहे,
आधारातें[6] संभाळुनियां थइ थइ नाचत आहे. ४
रक्षो तें नृत्य तुह्मातें, त्या त्रिपुरासुर विजयीचें.

---

१ हे शंकरा. २ पार्वतीची सखी. ३ पार्वतीस ठकविणें. ४ त्या शिवाचें कापट्य, ५ दृष्टिविषय. ६ पृथ्व्यादि सृष्टि.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सूत्रधार—(पुढें होऊन) हो हो! फार विस्तार कशाला पाहिजे? झालें इतकें मंगलाचरण पुरे. सामंतवटेश्वरदत्त नांवाचा जो एक महाकवि होऊन गेला त्याचा पौत्र व लोकांत जो महाराज ह्या शब्दानें विख्यात असलेला पृथु नांवाचा कवि त्या पृथु कवीचा पुत्र महाकवि, ज्याला विशाखदत्त असें ह्मणतात, त्यानें रचिलेल्या **'मुद्राराक्षस'** नामक नाटकाचा खेळ करून दाखविण्याविषयीं सभेनें आज मला आज्ञा केली आहे. अहाहा! काय हो ही सभा! खरेंच सांगतों, अशा रसिकजनांच्या सभेपुढें ह्या नाटकाचा खेळ करून दाखविण्याला माझ्याहि अंतःकरणास फारच उल्हास वाटत आहे. कारण—

> सुक्षेत्रीं[1] मूढेंही टाकियलें बीज वृद्धि पावतसे,
> साळी उत्तम पिकती, गुण हा जो पेरणार त्यास नसे! १

बरें असो.आतां मी घरीं जातों आणि घरधनीनीस बोलावून गायनास आरंभ करितों. (इकडेतिकडे फिरून पाहून) हें आमचें घर. (घरांत जाऊन व चोहींकडे पाहून) कायहो! आज आमच्या घरीं कांहीं मोठा समारंभ दिसत आहे! घरचीं सर्व माणसें मोठ्या गडबडीनें आपापलीं कामें करित आहेत. पहा—

> टाकोनियां बहुत सत्वर पाउलांतें
> ही आणिते सुनयना विमला जलातें;
> ही गंध घासित असे, न गणी श्रमाला,
> ही चंद्रबिंबवदना करि पुष्पमाला. १
> झाडोनि ही करितसे गृहमार्जनातें,
> ही रेंगवल्लि[2] लिहिते रमणीय हातें;
> घेऊनि,– कांडण करी,– मुसलास हातीं,
> 'हुं हुं' करी प्रतिपदीं प्रमदोत्तमा ती. २

असो. बायकोस हाक मारून विचारितों, ह्मणजे समजेल.

> प्रिये माझे गुणवति त्वरित ये गे!
> उपायांची खाण तूं मनोरंगे[3]!
> तुझ्या योगें मद्गृहस्थिती झाली,
> त्रिवर्गाची[4] सिद्धिही करीं आली. १
> नीतिविद्येची मद्गृहीं मूर्ति होशी,
> कार्यभागीं संशयीं स्फूर्ति देशी—

---

१ उत्तम भूमींत. २ रांगोळी. ३ मनास रमविणारे. ४ धर्म, अर्थ, काम ह्यांची.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नटी—(प्रवेश करून) प्रिया, ही मी आल्यें. काय आज्ञा आहे ?

सूत्रधार—सांप्रत आज्ञा करणें असूंदे. मी तुला जें विचारितों तें अगोदर सांग. आज घरीं कांहीं ब्राह्मणभोजन आहे कीं काय ? किंवा कोणी पाहुणे आले आहेत ? कारण, पाकशाळेंत स्वयंपाकाचा मोठा खटला दिसत आहे !

नटी—प्रिया, घरीं कोणी पाहुणे आले नाहींत. कांहीं ब्राह्मण मात्र जेवायास बोलावले आहेत खरे.

सूत्रधार—आज किंनिमित्त ब्राह्मणभोजन आरंभिलें आहे ?

नटी—चंद्रग्रहण आहे ह्मणून.

सूत्रधार—आज चंद्रग्रहण आहे, असें तुला कोणीं सांगितलें ?

नटी—असें गांवांतील लोक बोलतात.

सूत्रधार—मीं चवसष्ठ अंगांसहित ज्योतिषशास्त्रांत परिश्रम केला आहे त्यावरून सांगतों कीं, ब्राह्मणाच्या उद्देशानें स्वयंपाकास आरंभ केला आहे त्याप्रमाणें पाकसिद्धि करावी; परंतु चंद्रग्रहण आहे ह्मणून तुला जें कोणीं सांगितलें तें मात्र खोटें सांगितलें. पहा—

संपूर्णमंडलाच्या[1] चंद्राच्या[2] परिभवा करूं पाहे
स्वबळें राक्षस केतू[3]—

(असें अर्धेंच बोलतो, तों पडद्यांत शब्द होतो "हां! अरे, मी जीवंत असतां चंद्रगुप्ताचा पराभव करणार कोण आहे पाहूं बरें ?")

सूत्रधार—

—परि तद्रक्षक समीप बुध[4] आहे. १

नटी—प्रिया, पृथ्वीवर असतां चंद्राचें रक्षण करण्यास इच्छितो, हा कोण आहे ?

सूत्रधार—मलाहि हा कोण आहे हें बरोबर समजलें नाहीं. आतां मी पुन्हा ती आर्या ह्मणतों, ह्मणजे हा पुन्हा बोलेल; मग ह्याच्या स्पष्ट स्वरावरून हा कोण आहे तें कळेल. ('संपूर्णमंडलाच्या' ही आर्या पुन्हा ह्मणतो.)

(इतक्यांत पुन्हा पडद्यांत शब्द होतो " हां, मी जीवंत असतां चंद्रगुप्ताचा पराभव करण्यास कोण समर्थ आहे रे ?")

---

१ संपूर्ण आकाराच्या; पक्षीं संपूर्ण परिवाराच्या. २ चंद्राच्या; पक्षीं चंद्रगुप्तराजाच्या. ३ केतु ह्मणजे ग्रह; राक्षस हें केतूचें विशेषण; पक्षीं मलयकेतु व राक्षसनामक चंद्रप्रधान. ४ बुध नामक ग्रह; पक्षीं बुध शाहणा (चाणक्य).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सूत्रधार--(शब्द ऐकून) हां हां, आतां समजलों; हा कौटिल्य आहे.
नटी--(भयभीत होऊन) प्रिया, कौटिल्य तो कोण ?
सूत्रधार--

तो हा कौटिल्य द्विज, कोपाग्नीमाजि जाळिलें ज्यानें
नंदाचें सकलहि कुल, जो कीं परिपूर्ण कपटनीतीनें. १
'चंद्रग्रहण' अशा मम शब्दां परिसूनि, चंद्रराजाचें
ग्रहण रिपूपासुनियां शंकुनि, झालें सरोष मन याचें. २

आतां ह्याला अत्यंत क्रोध आला आहे, तर आपण ह्याच्यासमोर उभें राहण्याची ही वेळ नाहीं. येथून जावें हें बरें.

[नटी व सूत्रधार जातात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवेश १ ला.

[**स्थळ**—चाणक्याचें घर. चाणक्य आपल्या मोकळ्या सोडलेल्या शेंडीवरून हात फिरवित उभा आहे, असा प्रवेश.]

चाणक्य--आं:! अरे, मी जीवंत असतां चंद्रगुप्तराजाचा पराभव करावयास इच्छिणारा असा कोण आहे ?

जी ही नंदकुलाची कालभुजंगीच नीलधूमशिखा,
कोपाग्निची जणुं का मुक्तचि आहे मदीय दीर्घशिखा; १
ती अजुनि न बांधावी, हें इच्छी कोण हा नराधम रे ?
[१]मत्क्रोधाग्निमुखीं तो पडुनि मरेलचि पतंग जेविं मरे. २

नंदाच्या [२]कुळकाननास समुळीं जेणें पहा जाळिलें,
चंद्राचें कुळ सर्वही प्रतिपदीं जेणें असे राखिलें,
[३]मद्रोषाग्नि अजूनि तो जळतसे; त्याच्या समुल्लंघना
हा उद्योग करोनि कोण न कळे टाकूं बघे जीवना ! १

शार्ङ्गरवा, अरे शार्ङ्गरवा–

शिष्य—(प्रवेश करून) गुरुजी, काय आज्ञा आहे ?

चाणक्य—वत्सा, क्षणभर वसावें असें माझ्या मनांत आहे, आसन आण.

शिष्य--गुरुजी, या ठिकाणीं वेताचें आसन मांडलेलेंच आहे, यावर वसावें.

चाणक्य---वत्सा, कामामुळें माझें चित्त फारच व्यग्र झालें आहे, त्यामुळें आसन जवळ असूनहि मीं पाहिलें नाहीं, ह्मणून तुला आसन आणावयास सांगितलें. ह्यावरून, गुरु शिष्यास उगाच त्रास देत असतात, त्यांतला तूं मला समजूं नको ! (आसनार बसून स्वगत) आह्मीं नंदकुळाचा नाश केल्यामुळें राक्षस क्रोधयुक्त होऊन, आपल्या पित्याला मारल्यामुळें क्रोधयुक्त झालेला जो मलयकेतु त्याच्यापाशीं "आपण तुला नंदाचें सर्व राज्य मिळवून देतों' अशी प्रतिज्ञा करून व तेणेंकरून त्याला उत्तेजन देऊन त्याच्या स्नेहानें त्याच्यापाशीं असलेलें मोठें म्लेंच्छ सैन्य हाताखालीं घेऊन वृषलावर स्वारी करण्याच्या बेतांत आहे, अशी वार्ता लोकांत कशी वरें फुटली? (थोडा वेळ विचार करून) अं:, वार्ता फुटली ह्मणून काय चिंता आहे ? ज्यानें नंदवंशाचा नाश करीन अशी भरसभेंत प्रतिज्ञा करून ती दुष्कर प्रतिज्ञा शेवटास

---

१ माझा क्रोध हाच अग्नि त्याच्या मुखांत. २ कुळ हेंच अरण्य. ३ माझा रोष हाच अग्नि.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नेलीं तो मी चाणक्य, राक्षस स्वारी करून आला तरी त्याचा प्रतिकार करण्यास असमर्थ आहें कीं काय ? पहा—

काळे,—शत्रुस्त्रियांचे,— करुनि मुखशशी[1], संततें[2] शोकधूमें;
मंत्रीहीं अंध केले नयपवनवळें[3] फुंकुनी मोहभस्में;
जाळोनी नंदवंशांकुर[4], पुढतिं नसे दाह्य[5] ह्या कारणानें
मत्क्रोधाग्नी निवे हा दवसम; न निवे जाळण्याच्या श्रमानें. १
पूर्वीं अग्रासनाच्यावरुनि मज बळें ओढितां दुर्जनांनीं,
तोंडें घालोनि खालीं भिउनि नृपतिला पाहिलें ज्या जनांनीं,
'धिग् धिग्' बोलोनि,ते,हे वघुत गिरिसमा[6] आसनापासुनीयां
त्या नंदातें गजेंद्रापरि हरिसम[7] मी टाकितां ओढुनीयां ! २

आतां माझी प्रतिज्ञा तर शेवटास गेली. तींतील कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं. तथापि ह्या वृषलासाठीं अद्यापि हातांत शस्त्र धरिलें आहे. मी स्वतःविषयीं कृतकृत्य झालों आहें; कां कीं—

पृथ्वीरोगचि जे, तयां नवमितां[8] नंदांस उच्छेदिलें;
मौर्यीं श्री करुनी स्थिरा सुख तया मीं पाहिजे तें दिलें;
प्रेमक्रोधफळें सुहृद्रिपुजनीं[9] वांटूनियां दीधलीं;
हीं कार्यें द्विविधें[10] कठीणहि तरी म्यां बुद्धिनें साधिलीं. १

अथवा जोंपर्यंत तो राक्षस माझ्या हातीं आला नाहीं तोंपर्यंत नंदवंशाचें माझ्या हातून कांहींच वांकडें झालें नाहीं, आणि चंद्रगुप्ताच्या लक्ष्मीचें स्थैर्यहि कांहीं झालें नाहीं, असेंच मी समजतों. (पुनः थोडा विचार करून) काय हो, ह्या राक्षसाची नंदवंशावर भक्ति तरी ! नंदवंशांतील कोणी एखादाहि जिवंत आहे तोंपर्यंत त्याच्याकडून वृषलाची प्रधानकी पत्करणें अशक्य असें समजून ती अडचण मोडण्याकरितां, तो विचारा सर्व सोडून तपोवनांत गेलेला नंदवंशांतला सर्वार्थसिद्धि, त्यालाहि मीं मारविला. राक्षसानेंतर मलयकेतूचा अंगीकार करून आमच्या नाशाकरितां प्रयत्न चालविलाच आहे. (आकाशाकडे तोंड करून) शाबास, अमात्यराक्षसा शाबास ! हे मंत्रिश्रेष्ठा हे मंत्रिबृहस्पते, शाबास ! तुझ्यासारखे पुरुष फार दुर्लभ आहेत.

---

१ मुखचंद्र. २ प्रसार पावलेल्या. ३ नीति हाच वारा त्याच्या बळानें. ४ कुळ हेच अंकुर; पक्षीं वेळूचे मोड. ५ जाळावयास योग्य. ६ पर्वतासारख्या. ७ सिंहासारखा. ८ नवसंख्यापरिमित. ९ मित्रांस आणि शत्रूंस. १० दोन्हीं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संपत्कालीं प्रभूतें भजति बहुत, ते स्वार्थ साधावयाला;
आपत्काळांत कोणी भजति, धरुनियां भावि आशा, तयाला;
भर्त्यामागेंहि त्याची स्मरुनि उपकृती भक्तिनें कारभार
घेती अंगावरी ते; सचिव तुजपरी थोडके जाण फार! १

ह्मणूनच आह्मी तुझ्या प्राप्तीविषयीं असा यत्न करित आहों. वृषलास तुझ्यासारखा मंत्रि मिळाल्यास तो मोठाच दैववान् समजला पाहिजे. ही गोष्ट घडेल काय?

मूढें आणिक कातरें गुण नव्हे भक्तेंहि भृत्यें तसा,
प्रज्ञाशौर्ययुतेंहि भक्तिरहितें होईल तो कायसा?
प्रज्ञाविक्रमभक्तियुक्त असती ते भृत्य भूतिप्रद,
अन्य, स्त्रीसम पोषणीय, सदसत्काळीं दयेचें पद. १

आतां मीहि उगाच बसलों नाहीं. राक्षस हातीं लागण्याविषयीं यथाशक्ति प्रयत्न चालविलाच आहे. अगोदर ही मसलत केली आहे कीं—'वृषल आणि पर्वतेश्वर ह्या दोघांतून कोणाचाहि नाश केला तरी त्यांत चाणक्याचें नुकसानच होईल असें समजून राक्षसानें आमचा अत्यंत मित्र तो विचारा पर्वतेश्वर विषकन्येच्या द्वारें मारविला' असा मीं जनापवाद उठविला आहे; आणि तो लोकांस खरा वाटावा ह्मणून 'तुझा पिता चाणक्यानें मारविला' असें भागुरायणाकडून मलयकेतूला एकांतीं सांगवून त्याला येथून पळवून लाविलें आहे. आतां तो मलयकेतु सांप्रत राक्षसाच्या बुद्धीस लागून आह्मांवर उठला आहे; तथापि कांहीं चिंता नाहीं! आपण बुद्धिबळानें त्याचेंहि निवारण करूं. जर त्याला येथें आह्मीं प्रतिबंधांत ठेविलें असतें, तर पर्वतेश्वरास आह्मींच मारविलें अशी लोकांत आमची अपकीर्ति झाली असती. दुसरी मसलत—आमच्या पक्षांत आणि शत्रूच्या पक्षांत प्रेमानें कोण वागतात आणि द्वेषानें कोण वागतात हें समजण्याकरितां अनेक देशांतील भाषा, वेष आणि चालीरीति जाणणारे असे अनेक वातमीदार अनेक सोंगें देऊन मीं पाठविले आहेत व ह्या नगरांत नंदाच्या अमात्याचे मित्र राहत आहेत ते काय करित असतात व केव्हां कोठें जात असतात हाहि शोध ठेविलाच आहे. चंद्रगुप्तास जे उपयोगीं पडले त्या भद्रभटादिक सरदारांस मोठमोठीं कामकाजें सांगून संतुष्ट ठेविलें आहे. शत्रूनें विषप्रयोग करण्यासाठीं जे कोणी पाठविले आहेत त्यांच्या बंदोवस्ताकरितां

१ पुढें आपलें कल्याण होईल अशी आशा धरून. २ उपकार. ३ भित्र्यानें. ४ बुद्धी आणि शौर्य ह्यांनीं युक्तानें. ५ गुण. ६ ऐश्वर्यप्रद. ७ संपत्काळीं आणि विपत्काळीं. ८ पात्र.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अत्यंत सावध असे आप्तपुरुष राजाजवळ जिकडेतिकडे योजिले आहेत. इंदुशर्मा नांवाचा आमचा एक सहाध्यायी ब्राह्मण आहें, तो शुक्रोक्त राजनीतींत आणि चवसष्ट अंगांसहित ज्योतिषशास्त्रांत अत्यंत प्रवीण आहें, त्याला मीं नंदवंशाच्या वधाची प्रतिज्ञा केल्यानंतर लागलीच कुसुमपुरास आणून त्याची आणि नंदाच्या अमात्यांची मैत्री करविली होती. त्याच्यावर राक्षसाचा फारच विश्वास बसला आहे. त्याच्या हातून आह्माला मोठें कार्य करून घ्यावयाचें आहे. याप्रमाणें आमच्या हातून मसलतींत कांहींएक चुकलें नाहीं. हा वृषल मात्र कांहीं उद्योग करित नाहीं. केवळ आह्मांवरच सर्व राज्याचा भार ठेवून आपण स्वस्थ बसतो. अथवा, स्वतः खटपट करण्याचीं दुःखें ज्या राज्यांत नसतात, तेंच राज्य सुखप्रद होतें; कारण—

चली स्वभावें जरि हे नरेंद्र,
आणीक तैसेच जरी गजेंद्र,
झटोनि अंगें जरि भोग घेती,
ते सर्वदा दुःखचि भोगिताती. १

[स्वतःशींच विचार करित बसतो.

प्रवेश २ रा.

[स्थळ—चाणक्याच्या घराजवळील राजरस्त्यावरून हातांत यमपट घेऊन एक चर* गात गात चालला आहे, असा प्रवेश.]

चर—

नमा हो नमा पाय तुह्मी यमाचे,
नसे काम तुह्मा दुज्या देवतांचें !
हरी अन्यभक्तांचिया जीविताला,
ह्मणोनी भजा हो, भजा त्या यमाला. १

भक्ती करितां क्रूरापासुनिही मनुज जीवना करितो,
मारी सर्व जगातें यम, त्या आह्मि भजुनियां जगतों. १

आतां मी ह्या समोरच्या घरांत जाऊन हा यमपट दाखवून गाणीं गातों. (इकडे तिकडे फिरतो.)

शिष्य—(पुढें होऊन) कोणरे तूं ? घरांत शिरूं नको !

---

* सोंग घेतलेला गुप्त बातमीदार.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चर—अरे ब्राह्मणा, हें कोणाचें घर आहे ?

शिष्य—हें घर आमच्या गुरुजींचें आहे, ज्यांचें चाणक्यभट्ट असें लोकांत नांव गाजत आहे.

चर—(हंसून) वाहवा, तरमग फार चांगलें झालें. हें घर आमच्याच धर्मभावाचें आहे; त्यांत मला जाण्याला काय चिंता आहे ? मला आंत जाऊंदे, मी आंत जाऊन हा यमपट दाखवून तुझ्या गुरूला धर्मोपदेश करीन.

शिष्य—(क्रोधयुक्त होऊन) जा मूर्खा ! तुला आमच्या गुरुजींहून धर्माचें ज्ञान अधिक आहे काय ?

चर—अरे ब्राह्मणा, असा रागावूं नको. सर्वांनां सर्व कळत असतें, असें नाहीं; कोणाला कांहीं कळतें, कोणाला कांहीं कळतें. कांहीं तुझा गुरु जाणतो, आह्मासारखेहि कांहीं जाणतात !

शिष्य—(क्रोधयुक्त होऊन) हा मूर्खा ! आमच्या गुरूजींच्या सर्वज्ञतेला न्यूनत्व आणूं पहातोस काय ?

चर—अरे ब्राह्मणा, जर तुझा गुरु सर्वज्ञ आहे, तर त्याला हें ठाऊक आहे काय, कीं, चंद्र कोणास आवडत नाहीं तें ?

शिष्य—हा मूर्खा, इतकेंच का ? वेड्या, आमच्या गुरुजींस हें समजलें आणि न समजलें तर त्यांत काय अधिक आहे ?

चर—अरे ब्राह्मणा, मीं जें विचारिलें तें समजलें असतां अधिक काय आहे तें तुझ्या गुरुजींलाच माहित आहे. तुझी बुद्धि स्थूल आहे ह्मणून तुझ्या तें लक्ष्यांत येत नाहीं. तूं इतकेंच समजतोस कीं, चंद्र कमलास आवडत नाहीं; अरे पहा—

> **शील नसे कमलातें, रूपानें मात्र रम्य तीं दिसती,**
> **संपूर्णमंडलाशीं चंद्राशींही विरोध जीं करिती. १**

चाणक्य—(आंतून ऐकून स्वगत) चंद्रगुप्तराजाशीं विरुद्ध कोण वागतात हें आपण जाणतों, असें ह्यानें ह्या आर्येंत सुचविलें.

शिष्य—हा मूर्खा, हें रे काय असंबद्ध, मनास येईल तें बडबडतोस ?

चर—अरे ब्राह्मणा, मी जें बोललों तें सर्व सुसंबद्धच होईल.

शिष्य—काय असल्यानें सुसंबद्ध होईल.

चर—कोणी श्रोता आणि ज्ञाता असेल तर.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चाणक्य—(आंतून) अरे बावा, खुशाल घरांत ये, तुला श्रोता आणि ज्ञाता मिळेल.

चर—तर मग हा घरांत आलों.

[आंत जातो.

प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—चाणक्याचें घर. चाणक्य आसनावर बसला आहे, चर आंत येत आहे, असा प्रवेश.]

चर—(प्रवेश करून) भटजींचा जयजयकार असो.

चाणक्य—(स्वगत) अरे, हातर निपुणक आहे. परंतु कामें फार ह्यामुळें मीं ह्याला कोणत्या कामाकरितां पाठविलें होतें हें माझ्या ध्यानांत येत नाहीं. (आठवून) अरे हो, आतां आठवलें. लोकांचें मन ह्या चंद्रगुप्तराजाविषयीं कसें आहे ही बातमी घेण्यासाठीं मीं ह्या निपुणकाला पाठविला होता. (उघड) बावा निपुणका, चांगलें झालें आलास तें. ये, बैस.

चर—आज्ञा भटजीमहाराज.

चाणक्य--कारे बावा, तुला ज्या कामासाठीं पाठविलें होतें त्या कामाचें काय झालें तें सर्व सांग. चंद्रगुप्तराजावर प्रजा खूष आहे ना ?

चर—होय, खूष आहे महाराज. वाईट वाटण्याचीं जीं जीं कारणें होतीं तीं सर्व आपण काढून टाकल्यामुळें आतां सर्व लोक चंद्रगुप्तमहाराजांनां फार चाहतात; परंतु ह्या नगरांत राक्षसाचे पुरातन स्नेही तिघे पुरुष आहेत, त्यांनां मात्र चंद्रगुप्त महाराजांची राज्यलक्ष्मी सहन होत नाहीं.

चाणक्य—अरे, त्यांनां आपले प्राण सहन होत नाहींत असें ह्मण! पण तुला त्यांचीं नावें ठाऊक आहेत ?

चर—हो, नांवें ठाऊक असल्याशिवाय मी आपणाजवळ कसा बोलेन ?

चाणक्य—तरमग सांग त्यांचीं काय नांवें तीं ?

चर—भटजीमहाराज, सांगतों, ऐकावें. त्या शत्रुपक्षांतील पहिला जीवसिद्धि नामक क्षपणक—

चाणक्य--(हर्षयुक्त होऊन स्वगत) अं:, तोतर आमचाच पक्षपाती आहे. (उघड) क्षपणक शत्रुपक्षांतला आहे, हें तुला कसें समजलें ?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चर—सरकारचा मित्र जो पर्वतक राजा, त्याला मारण्याकरितां राक्षसानें पाठविलेली विषकन्या जीवसिद्धीच्या हातून पाठविली, त्यावरून तो शत्रुपक्षी आहे असें मी ह्मणतों.

चाणक्य—(स्वगत) जीवसिद्धितर आमचाच वातमीदार आहे. (उघड) बरें, दुसऱ्याचें नांव काय?

चर—दुसऱ्याचें नांव शकटदास. तो जातीचा कायस्थ आहे आणि राक्षसाचा अत्यंत मित्र आहे.

चाणक्य—(हंसून स्वगत) अं:, कायस्थ हा कोण मनुष्य आहे! त्याचें फारसें भय नाहीं; परंतु सामान्य शत्रु असला तरी तो शत्रु खरा; त्याची उपेक्षा करणें योग्य नाहीं; ह्मणून मीं त्याच्यावर सिद्धार्थकाची योजना करून त्याच्याशीं कपटानें सख्य करून वागण्याविषयीं सिद्धार्थकास सांगितलें आहे. (उघड) बरें, तिसऱ्याचें नांव काय रे?

चर—तिसऱ्याचें नांव चंदनदास. तोतर राक्षसाचें केवळ काळीजच आहे. तो पुष्पपुरांत राहत असतो आणि सर्व जवाहीरगारांत श्रेष्ठ आहे. राक्षस त्याच्या घरीं आपलीं मुलेंमाणसें ठेवून नगरांतून निघून गेला.

चाणक्य—(स्वगत) खरेंच, चंदनदासाचें आणि राक्षसाचें फारच सख्य असेल. नाहींतर तो आपली स्त्री त्याच्या हवालीं कशी करता? (उघड) बरें, चंदनदासाच्या घरीं राक्षसानें आपलीं मुलेंमाणसें ठेविलीं आहेत, हें तुला कसें समजलें?

चर—भटजीमहाराज, मला तें कसें समजलें हें ही अंगुलींतलि मुद्रिकाच आपणास सांगेल. (मुद्रिका चाणक्याच्यापुढें टाकतो.)

चाणक्य—(मुद्रिका घेऊन तिच्यावरील राक्षसाच्या नांवाचीं अक्षरें वाचून हर्षानें स्वगत) हो हो, आतां माझ्या हातांत ही मुद्रिका आली असें नाहीं, तर तो राक्षसच हातांत आला असें ह्मणावयास चिंता नाहीं! (उघड) अरे, ही मुद्रिका तुझ्या हातीं कशी लागली, तें सविस्तर सांग.

चर—ऐकावें महाराज. नगरांतील लोकांत काय वर्तमान आहे याचा सुगावा घेण्याकरितां आपण मला आज्ञा केल्यानंतर मीं चित्रकथ्याचा वेष घेऊन हातांत हा यमपट घेऊन फिरूं लागलों, तेव्हां कोणाच्याहि घरांत शिरलों असतां हा अनोळखी मनुष्य कोण घरांत शिरतो अशी माझ्याविषयीं कोणासहि शंका येत नसे; कारण,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ते माझ्या हातांतील यमपट पाहून हा कोणी चित्रकथी आहे असें समजत. त्याप्रमाणें घरोघर हिंडत हिंडत आज चंदनदासशेटजींच्या घरीं गेलों, आणि हा यमपट पसरून गाणीं गाऊं लागलों.

चाणक्य—मग पुढें काय झालें ?

चर—तदनंतर सुरूप आणि सुकुमार असा एक मुलगा बाळपणांत साहजिक असणाऱ्या मौजा पाहण्याच्या इच्छेनें मोठ्या हर्षानें घरांतून बाहेर येऊं लागला; तितक्यांत 'हां हां! बाहेर गेला! अहो बाहेर गेला!' असा सशंकपणानें स्त्रीजनांचा मोठा गलबला त्या घरांतून उत्पन्न झाला. मग एका स्त्रीनें भीतभीत दारांत येऊन तो मुलगा बाहेर निघत होता त्याला दटावून मोठ्या गडबडीनें आपल्या हातानें ओढून आंत नेलें. त्या गडबडींत पुरुषाच्या बोटांत मावावयाजोगी मुद्रिका त्या स्त्रीच्या हातून तिला नकळत गळून खालच्या देवडीवर पडली, आणि तेथून गडगडत माझ्या पायाजवळ येऊन, वडील माणसांस नमस्कार करावयासाठीं जशी एखादी सासुरवासी कुलांगना येऊन स्तब्ध होते, तशी स्तब्ध झाली. मींहि ती मुद्रिका पाहिली तों तिच्यावर राक्षसाच्या नांवाचीं अक्षरें आहेत हें जाणून ती घेतली आणि आपल्या चरणांजवळ सादर केली. हा मुद्रिकेचा वृत्तांत आहे.

चाणक्य—बरें आहे, समजलें सर्व. ह्या कामाविषयीं तूं फार श्रम घेतले, हें आमच्या ध्यानांत आहे. तुझ्या श्रमाचें सार्थक लवकरच होईल. जा आपल्या कामास.

चर—आज्ञा भटजीमहाराज.

[जातो.

चाणक्य—शार्ङ्गरवा, अरे शार्ङ्गरवा—

शिष्य—(प्रवेश करून) गुरुजी, काय आज्ञा आहे ?

चाणक्य—दऊत, लेखणी आणि कागद घेऊन ये.

शिष्य—आज्ञा गुरुजी. (आंत जाऊन पुन्हा बाहेर येऊन) गुरुजी, ही दऊत लेखणी आणि हा कागद.

[जातो.

चाणक्य—(दऊत लेखणी आणि कागद घेऊन स्वगत) पत्रांत मजकूर काय लिहावा बरें ? ह्या लेखानें राक्षसास जिंकावयाचें आहे.

(इतक्यांत द्वारपालिका प्रवेश करिते.)

द्वारपालिका—(पुढें होऊन) भटजीमहाराजांचा जय असो !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चाणक्य--(हर्षयुक्त होऊन स्वगत) हिनें जय शब्दाचा उच्चार केला हातर उत्तम शकून झाला! (उघड) शोणोत्तरे, कां आलीस?

द्वारपालिका--भटजीमहाराज, चंद्रासारखी ज्यांची कांति आहे असे चंद्रगुप्त महाराज, कमलमुकुलासारखा अंजलि मस्तकावर ठेवून गुरूजींस विज्ञापना करित आहेत कीं, भटजीमहाराजांची आज्ञा असल्यास, आपला प्रिय मित्र जो पर्वतेश्वर त्याचें उत्तरकार्य करावें आणि त्याच्या अंगावरील भूषणें ब्राह्मणांस द्यावीं, अशी आपली इच्छा आहे.

चाणक्य--(हर्षयुक्त होऊन स्वगत) शाबास! राजा, शाबास! जशी कांहीं माझ्या मनांतलीच मसलत समजून तूं हा निरोप पाठविला! (उघड) शोणोत्तरे, जा, वृषलास आमचा निरोप सांग कीं, वत्सा, शाबास! तूं लोकव्यवहारांत प्रवीण आहेस. तूं जें मनांत आणिलें तें लवकर कर. परंतु पर्वतेश्वराचीं भूषणें अमोलिक आहेत तीं उगाच भलत्यासलत्याला देऊं नये. चांगले चांगले सत्पात्र ब्राह्मण पाहून त्यांनां दिलीं पाहिजेत. मी इतक्यांत चांगले सत्पात्र ब्राह्मण पाठवून देतों.

द्वारपालिका—आज्ञा महाराज.

[जाते.

चाणक्य—शार्ङ्गरवा, अरे शार्ङ्गरवा—

शिष्य—(प्रवेश करून) गुरुजी, काय आज्ञा आहे?

चाणक्य—विश्वावसु आणि त्याचे दोघे बंधु ह्या तिघांनां जाऊन सांग कीं, वाड्यांत जाऊन राजा दानें देईल तीं घेऊन आमची भेट घ्यावी.

शिष्य—आज्ञा गुरुजी.

[जातो.

चाणक्य—(पत्रांत लिहावयाच्या मजकुराचें मनन करून) हा मजकूर पुढें लिहावयाचा; परंतु पहिल्यानें कोणता मजकूर लिहावा बरें? (विचार करून) हं सुचलें! मला वातमीदारांनीं येऊन सांगितलें आहे कीं, म्लेंछराजाच्या सैन्यांतील मुख्य राजे पांच आहेत, ते राक्षसास कायावाचामनांनीं अनुकूल आहेत; ते हे—

कौलूत देशाचा चित्रवर्मा, सिंहनाद नृसिंह मलयधामा,
पुष्कराक्ष, क्षतरिपुमहिमा, काश्मीर देशाचा जो स्वामी. १
सिंधुदेशाचा नरपती, सुषेण जो महाख्याति,
पारसीकांचा अधिपति, पांचवा हा मेघाक्ष. २

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या पांचां जणांचीं नांवें, लिहीं जों येथें कपटभावें,
वहींतूनि आपुल्या काढावें त्यांस यापुढें [१]चित्रगुप्तें ! ३

(किंचित विचार करून) अथवा नांव लिहित नाहीं. सर्व गोष्टी मोघमच असूंद्या. (उघड) शार्ङ्गरवा, अरे शार्ङ्गरवा—

शिष्य—(प्रवेश करून) गुरुजी, काय आज्ञा आहे ?

चाणक्य—वत्सा, भिक्षुकांनीं मोठा श्रम करून जरी पत्र लिहिलें तरी त्यांचें अक्षर दुसऱ्यास नीट वाचतां येत नाहीं; याकरितां सिद्धार्थकाकडे जा, आणि— (कानांत कांहीं सांगून) या मजकुराचें पत्र शकटदासाकडून लिहवून तें माझ्याकडे घेऊन ये ह्मणून त्याला सांग. शिवाय त्याला असेंहि कळीव कीं, हें पत्र चाणक्यानें लिहावयास सांगितलें आहे हें मात्र शकटदासास कळूं देऊं नको.

शिष्य—आज्ञा गुरुजी.

[जातो.

चाणक्य—(स्वगत) अं: आतां मलयकेतु कोण पदार्थ आहे ! तो मीं जिंकलाच असें समजतों.

[स्वत:शींच विचार करित बसतो.

(कांहीं वेळानें सिद्धार्थक हातांत पत्र घेऊन प्रवेश करितो.)

सिद्धार्थक—(आंत येऊन) भटजीमहाराजांचा जय असो ! भटजीमहाराज, आपण सांगितलेलें पत्र शकटदासानें माझ्या सांगण्यावरून कांहींएक संशय न घेतां लिहून दिलें, हें घ्यावें.

चाणक्य—(पत्र घेऊन पाहून) वाहवा ! काय सुंदर अक्षर आहे हें ! जसें मुक्ताफळच ! अरे सिद्धार्थका, ह्या मुद्रिकेनें ह्या पत्रावर मोहर कर.

सिद्धार्थक—आज्ञा महाराज. (पत्रावर मोहर करून) भटजीमहाराज, पत्रावर मोहर केली. आणखी काय आज्ञा आहे ?

चाणक्य—सिद्धार्थका, अत्यंत आप्तजनांनीं करावयाजोगें एक काम तुला सांगावें, असें माझ्या मनांत आहे.

सिद्धार्थक—(हर्षयुक्त होऊन) महाराज, ही मजवर मोठी कृपाच आहे ! सांगावें दासाला काय काम करावयाचें आहे तें ?

चाणक्य—सिद्धार्थका, तूं असें कर कीं, शकटदासाला सुळीं देण्याच्या ठिकाणीं नेलें असतां तेथें तूं जा. आणि रागानें उजवा डोळा मिचकावून मारेकऱ्यांस खूण

---

१ यांचें पुढील दैव माझ्या हातीं आहे, चित्रगुप्ताचे हातीं नाहीं, असें तात्पर्य.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कर. तसें केलें असतां ते तुझी खूण समजून भयाच्या मिषानें इकडेतिकडे पळून जातील. नंतर तूं शकटदासास पळवून राक्षसाकडे पोंहचीव. राक्षसाचा परममित्र जो शकटदास त्याला तूं वांचविल्यामुळें राक्षस प्रसन्न होऊन तुला वक्षीस देईल तें तूं घे आणि कांहीं दिवस राक्षसाजवळच चाकरी करून रहा. पुढें शत्रु जवळ आल्यावर मग तूं हें काम कर. (त्याच्या कानांत कांहीं सांगतो).

सिद्धार्थक—ठीक आहे, आज्ञेप्रमाणें करतों.

चाणक्य—शार्ङ्गरवा—

शिष्य—(प्रवेश करून) काय आज्ञा आहे गुरुजी ?

चाणक्य—कालपाशिक आणि दंडपाशिक ह्या दोघांनां सांग कीं, राक्षसानें पाठविलेल्या विषकन्येस सहाय होऊन तिच्या हातून जीवसिद्धीनें पर्वतेश्वरास मारलें, तर त्याच्या या घोर अपराधाबद्दल त्याची धिंड काढून त्याला शहरच्या हद्दपार करून द्यावें, अशी चंद्रगुप्तराजाची आज्ञा आहे.

शिष्य—ठीक आहे महाराज, आज्ञेप्रमाणें करतों. (जाऊं लागतो.)

चाणक्य—वत्सा, अंमळ थांब, आणखी कांहीं सांगावयाचें आहे. दुसरा एक मनुष्य कायस्थ जातीचा शकटदास ह्मणून ह्या नगरांत आहे, तो राक्षसाचा मित्र असून सरकारचा घात करण्याच्या मसलतींत असतो, तर त्याच्या अपराधाबद्दल त्याचीहि धिंड काढून त्याला सुळीं द्यावें, आणि त्याचीं सर्व मुलेंमाणसें बंदींत टाकावीं.

शिष्य—आज्ञा गुरुजी.

[जातो.

चाणक्य—(चिंताक्रांत होऊन स्वगत) अहो, या मसलतीनें तो दुरात्मा राक्षस आमच्या आटोक्यांत येईल काय ?

सिद्धार्थक—आला महाराज !

चाणक्य—(हर्षयुक्त होऊन स्वगत) काय ? या मसलतीनें तो दुरात्मा राक्षस आमच्या आटोक्यांत आला ? (उघड) सिद्धार्थका, कोण रे आला ?

सिद्धार्थक—मीं ह्मटलें कीं, आला आपला निरोप माझ्या ध्यानांत. जातों आतां मी सांगितलेली कामगिरी बजावण्याला.

चाणक्य—(मोहर केलेला लखोटा व जिनें मोहर केली तो अंगठी सिद्धार्थकाजवळ देऊन) सिद्धार्थका, जा, तुझी कार्यसिद्धि असो,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिद्धार्थक—आज्ञा महाराज.

[नमस्कार करून जातो.

शिष्य—(प्रवेश करून) गुरुजी, कालपाशिक आणि दंडपाशिक हे दोघे विनंति करितात कीं, आह्मी चंद्रगुप्त महाराजांच्या आज्ञेप्रमाणें करतों.

चाणक्य—वत्सा, ठीक आहे, पण चंदनदासाची भेट घ्यावयाची मनांत आहे. याकरितां त्याला घेऊन ये वरें.

शिष्य—आज्ञा गुरुजी.

[जातो.

प्रवेश ४ था.

[**स्थळ**—चाणक्याचें घर. चाणक्य आसनावर बसला आहे, शार्ङ्गरव आणि चंदनदास बाहेरून बोलत बोलत येत आहेत, असा प्रवेश.]

शिष्य—शेटजी, इकडे यावें, इकडे.

चंदनदास—(स्वगत) एखाद्या निरपराध मनुष्यासहि चाणक्याचें बोलावणें आलें असतां त्याच्यासुद्धां पोटांत असा धाक पडतो, मग मीतर अपराधीच आहें! यास्तव धनसेनादिक जे माझे तिघे गुमास्ते त्यांनां मीं सांगून ठेविलें आहे कीं, हा चाणक्य मोठा दुष्ट आहे; न जाणों, माझ्या घराचा झाडादेखील घेईल. याकरितां तुह्मी मोठ्या सावधपणानें अमात्य राक्षसाच्या कुटुंबास पळवा, मग माझेंच काय होणार तें होवो!

शिष्य—चंदनदासशेटजी, चला आंत.

चंदनदास—हा आलों.

शिष्य—(पुढें होऊन) गुरुजी, हे चंदनदासशेटजी आले आहेत.

चंदनदास—(आंत येऊन) भटजीमहाराजांचा जय असो.

चाणक्य—(चंदनदासाकडे पाहिलेंसें करून) यावें शेटजी, यावें, यावें, ह्या आसनावर बसावें.

चंदनदास—(नमस्कार करून) महाराज, योग्यतेहून अधिक सत्कार केला असतां तो जाणत्याच्या मनास अपमानापेक्षांहि अधिक दुःख देतो. माझी योग्यता भुईवर बसण्याचीच आहे याकरितां मी भुईवरच बसतों.

चाणक्य—नाहीं नाहीं शेटजी, असें नाहीं. आह्मासारख्यांच्या बरोबरीनें बसावें, हेंच आपणास योग्य आहे. तर आपण आसनावर बसावें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंदनदास—(स्वगत) ह्या दुष्टाला कांहींतरी समजलें आहे असें वाटतें. (उघड) महाराज, मी आपल्या आज्ञेबाहेर नाहीं ! (आसनावर बसतो.)

चाणक्य—कसें काय शेटजी, तुमच्या उदीमधंद्यांत नफा रगड आहे ना ?

चंदनदास—होय महाराज, आपल्या पायांच्या प्रसादानें रगड नफा आहे.

चाणक्य—काय हो शेटजी, चंद्रगुप्त राजाच्या दोषांवरून प्रजा कदाचित् मागील राजाचे गुण आठवित असतील, नाहीं बरें ?

चंदनदास—(कानांत बोटें घालून) शिवशिव! महाराज, असें काय बोलतां? महाराज, शरदृतूंतील चंद्राच्या उदयानें जसे सर्व लोक आनंद पावतात, तसे ह्या चंद्रगुप्तराजाच्या उदयानें प्रजा आनंद पावत आहेत.

चाणक्य—तर मग, प्रजा राजावर संतुष्ट असल्या ह्मणजे राजे त्यांपासून आपलें प्रिय इच्छित असतात, नाहीं का ?

चंदनदास—आज्ञा करावी भटजीमहाराज, या दासापासून सरकारास काय चाकरी पाहिजे ती ? आज्ञा होईल तितका पैसा हजर करण्यास सिद्ध आहें !

चाणक्य—शेटजी, हें नंदाचें नाहीं, चंद्रगुप्ताचें राज्य आहे! नंद धनलोभी असे, ह्मणून प्रजेनें धन दिलें असतां त्याला संतोष होई, तसें चंद्रगुप्ताचें नाहीं. तुह्मां प्रजेला क्लेश नसला ह्मणजे तेवढ्यानेंच चंद्रगुप्ताला संतोष आहे.

चंदनदास—(हर्ष पावून) महाराज, हा आह्मां प्रजांवर सरकारचा मोठा अनुग्रहच आहे !

चाणक्य—पण प्रजेला क्लेश नसणें हें कशापासून होतें, हें तुह्मीं विचारलें नाहीं?

चंदनदास—कशापासून होतें तें सांगावें महाराज !

चाणक्य—थोडक्यांतच सांगतों. राजाशीं अविरुद्ध वागल्यानें प्रजेचे क्लेश नाहींसे होतात.

चंदनदास—महाराज, असा कोण हतभाग्य आहे, कीं, जो राजाशीं विरुद्ध वागतो असें आपणास वाटतें ?

चाणक्य—लांब कशाला, तुह्मीच पहिले !

चंदनदास—(कानांत बोटें घालून) शिवशिव ! महाराज, तृणांनीं अग्नीशीं विरोध काय करावयाचा आहे ?

चाणक्य—विरोध असा कीं, तुह्मीं धडधडीत राजाचें वैर करणारा जो अमात्य राक्षस त्याचें कुटुंब आपल्या घरांत लपवून ठेविलें आहे; यापेक्षां दुसरा विरोध तो कोणता असतो ?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंदनदास—महाराज, कोणीं दुष्टानें ही खोटी गोष्ट आपणास सांगितली? मला ही वार्ताहि ठाऊक नाहीं !

चाणक्य—शेटजी, भिऊं नका ! राज्यान्तर झालें, म्हणजे नगरवासीलोक नको नको म्हणत असतांहि, पूर्वीच्या राज्यांतले अधिकारी वळेंच त्यांच्या घरीं आपलीं मुलेंमाणसें टाकून देशांतरास जात असतात, ही रीतीच आहे; त्यांत कांहीं विशेष नाहीं; परंतु तीं पुढें छपवून ठेवणें हा मात्र अपराध आहे.

चंदनदास—महाराज, त्या प्रसंगीं राक्षसाचीं मुलेंमाणसें आमच्या घरीं होतीं खरीं.

चाणक्य—शेटजी, तुम्हीं पहिल्यानें म्हणालां, कीं आपल्याला ही वार्ताहि ठाऊक नाहीं; आणि आतां म्हणतां कीं, त्या प्रसंगीं आपल्या घरीं राक्षसाचीं मुलें-माणसें होतीं; या दोन भाषणांत विरोध येतो.

चंदनदास—होय महाराज, थोडा विरोध आला खरा.

चाणक्य—अहो शेटजी, हें चंद्रगुप्ताचें राज्य आहे; येथें तिळभरहि लवाडी सोसत नाहीं. तर आतां राक्षसाचीं मुलेंमाणसें लवकर सरकारच्या हवालीं करा, म्हणजे त्यांत तुमचें कल्याण आहे.

चंदनदास—महाराज, त्या प्रसंगीं आमच्या घरीं राक्षसाचीं मुलेंमाणसें होतीं म्हणून मीं पूर्वीं विनंति केली आहे.

चाणक्य—बरें, तीं आतां कोठें गेलीं ?

चंदनदास—मला काय ठाऊक कोठें गेलीं तीं ?

चाणक्य—(किंचित् हंसून) शेटजी, आपणास ठाऊक नाहीं काय? अहो, मनांत विचार करा कीं, काळसर्प सन्निध आला आहे व त्याच्या निवारणाचा उपाय फार दूर पडला आहे. तुम्ही मनांत समजत असाल कीं, जसें नंदास [1]विष्णुगुप्तानें—(इतकेंच बोलून लाजल्यासारखें करून) राज्यावरून काढलें, तसें चंद्रगुप्तास राक्षस काढील. तर ती भ्रांति सोडून द्या ! पहा—

ते मंत्री वक्रनासादिक असुनि महानीतिमंत प्रतापी,
त्यांच्यानें नंदलक्ष्मी स्थिर न करवली भ्रष्ट होतां कदापि;
ती आतां चंद्रकांतीसदृश, शशिसमीं चंद्रगुप्तीं मिळाली,
तीतें न्याया समर्थ प्रबल सुत असा कोणती माय व्याली? १

---

१ चाणक्याचें दुसरें नांव.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हस्तीच्या शोणितातें[1] पिउनि मृगपती[2] जांभई देइ जेव्हां
अज्ञत्वें[3] साहसानें कर शिरवुनियां तन्मुखामाजिं तेव्हां
संध्यारक्ता शशीची नवउदित कला जेविं तत्तुल्य शोण,
सिंहाची वक्रदंष्ट्रा उपडिन ह्मणतो प्राण द्यायास कोण? २

चंदनदास—(स्वगत) जयच तुला मिळाला आहे, त्या अर्थी जी फुशारकी करशील ती तुला शोभेल! (इतक्यांत, बाहेर गर्दी करून जमलेल्या लोकांस कोणी पैस करित आहे, असा पडद्यांत गलवला होतो तो ऐकून शिष्यास) शार्ङ्गरवा, अरे शार्ङ्गरवा, बाहेर जाऊन पहा बरें काय गडबड आहे ती?

शिष्य—आज्ञा गुरुजी. (बाहेर जाऊन थोड्या वेळानें पुन्हा येऊन) गुरुजी, सरकारचें वैर करणारा क्षपणक जीवसिद्धि याला महाराजांच्या आज्ञेनें अधिकारी नगराबाहेर हाकून देत आहेत, त्याचा हा गलबला आहे.

चाणक्य—हं, जीवसिद्धीला हाकून देतात काय? अरेरे, फार वाईट! अथवा वाईट काय आहे? ज्यानें राजाचें वैर केलें, तो आपल्या कर्माचें फल भोगित आहे. (चंदनदासास) शेटजी, हा चंद्रगुप्त राजा आपलें वैर करणारांस असा उग्र दंड करित असतो, पाहिलें? तर मित्रत्वानें तुह्मांला मी जें सांगतों तें ध्यानांत आणून बरेपणानें राक्षसाचीं मुलेंमाणसें सरकारच्या हवालीं करा आणि—

चंदनदास—महाराज, राक्षसाचीं मुलेंमाणसें माझ्या घरांत नाहींत, मग मी तीं कोठून देऊं?

(बाहेर पुन्हा गलबला होतो.)

चाणक्य—शार्ङ्गरवा, हा पुन्हा गलबला कशाचा रे? जा, पहा बरें.

शिष्य—आज्ञा गुरुजी. (पुन्हा बाहेर जाऊन परत येऊन) महाराज, हा दुसरा, राजाचें वैर करणारा कायस्थ जातीचा शकटदास, याला राजाच्या आज्ञेवरून सुळीं द्यावयास नेत आहेत.

चाणक्य—भोगो रांडलेक आपलें कर्म! (चंदनदासास) ऐका शेटजी, ऐका, ह्या राजाचा दंड फार तीव्र आहे! तुह्मीं राक्षसाची स्त्री पाठीशीं घालून ठेविली आहे हें राजाला सहन होणार नाहीं. याकरितां त्याची स्त्री द्या आणि तुह्मीं आपली स्त्री व जीव यांचें रक्षण करा.

---

१ रक्तातें. २ सिंह. ३ मूर्खत्वानें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंदनदास—भटजी, तुह्मी मला इतकें भय कशाला घालतां ? राक्षसाचीं मुलेंमाणसें माझ्या घरीं असलीं तरी मी देणार नाहीं, मग नसतांना कोठून देऊं?

चाणक्य—चंदनदास, हा तुझा निश्चय कायम आहे ना रे ?

चंदनदास—होय, माझा हाच निश्चय आहे.

चाणक्य—(स्वगत) शाबास, चंदनदासा, शाबास !

सुलभार्थलाभ टाकुनि परदुःखें कळवळूनियां पोटीं,
कोण शिबीपरि याविण अति दुष्कर गोष्ट ही करिल मोठी? १

(उघड) शेटजी, तुह्माला पुनः विचारतों, हाच तुमचा निश्चय आहे ?

चंदनदास—होय, हाच माझा निश्चय खचीत आहे.

चाणक्य—(तरवारीस हात घालून रागानें) अरे दुष्टा वाणगंडा! बरें तर, राजाचा क्रोध कसा आहे त्याचा आतांच अनुभव घे !

चंदनदास—(दोन्ही हात जोडून) महाराज, हा मी तयार आहें. आपण आपला अधिकार मजवर बजवावा.

चाणक्य—(रागानें) शार्ङ्गरवा, अरे शार्ङ्गरवा, कालपाशिक आणि दंडपाशिक ह्या दोघांनां जाऊन सांग कीं, ह्या वाणगंडाचें डोकें मारून टाका. अथवा तें नको! दुर्गपाल आणि विजयपाल ह्या दोघांनां जाऊन सांग कीं, मी हें वर्तमान राजाच्या कानांवर घालून येईपर्यंत ह्याच्या मुलांमाणसांसुद्धां याला बंदींत ठेवा, व याची सर्व मालमत्ता सरकारांत आणा. राजाच स्वतः याचें सर्वस्व लुटून प्राण घेण्याची शिक्षा करवील.

शिष्य—आज्ञा महाराज. (चंदनादासास) हं, शेटजी, चलावें माझ्यावरोबर, यावें, इकडून यावें.

चंदनदास—चल बाबा, हा मी आलों. (स्वगत) मी दैववान कीं, मित्राकरितां माझे प्राण जात आहेत, स्वतःच्या अपराधानें जात नाहींत.

[शिष्यासह जातो.

चाणक्य—(हर्षानें) सांपडला हातीं आतां तो दुरात्मा राक्षस ! कारण—

स्वप्राण हा तृणसमान गणून, जेवीं
तत्संकटा त्यजितसे हरण्यास, तेवीं
येतांच तो, बघुनि संकट यावरील,
प्राणांवरी न ममता अपुल्या करील. १

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(इतक्यांत बाहेर पुनः गलबला होतो.)

चाणक्य—शार्ङ्गरवा, हा पुनः गलबला कसला आहे, तो पहा पहा बरें ?

शिष्य—(बाहेर जाऊन पुन्हा धावऱ्या धावऱ्या येऊन) गुरुजी, अपराधी मारण्याच्या ठिकाणाहून सिद्धार्थक शकटदासाला घेऊन पळून गेला !

चाणक्य—(स्वगत)शावास, सिद्धार्थका, शावास! तूं कार्यास आरंभ तर केला. (उघड) काय, सिद्धार्थक पळून गेला ? (रागानें) वत्सा शार्ङ्गरवा, भागुरायणाला जाऊन सांग कीं, लवकर सिद्धार्थकाचा पाठलाग करून त्याला धरून आण.

शिष्य—(जाऊन कांहीं वेळानें परत येऊन खेदानें) अहो गुरुजी, मोठा अनर्थ झाला कीं हो! तो भागुरायणहि पळून गेला !

चाणक्य—(स्वगत) जाऊंद कार्यसिद्धीकरतां. (उघड रागानें) जा जा जा लवकर आणि भद्रभट, पुरुषदत्त, हिंगुरात्त, बलगुप्त, राजसेन, रोहिताक्ष आणि विजयवर्मा यांनां मीं सांगितलें आहे ह्मणून सांग कीं, त्या दुरात्म्या भागुरायणाचा पाठलाग करून त्याला लवकर धरून आणा !

शिष्य—होय महाराज, आज्ञेप्रमाणें करतों. (बाहेर जाऊन कांहीं वेळानें परत येऊन खेदानें) गुरुजी, फारच विपरीत गोष्ट झाली! सगळेंच तंत्र बिघडलें कीं हो! महाराज, ते भद्रभटादिक सारेच पहिल्यानेंच आज पहांटेस पळून गेले !

चाणक्य—(स्वगत) फार चांगलें झालें, सर्वांची कार्यसिद्धि होवो. (उघड) वत्सा शार्ङ्गरवा, खेद करूं नको. ते पळून गेले ह्मणून चिंता काय आहे? एक माझी बुद्धि मात्र न जावी, ह्मणजे झालें.

पूर्वीं निश्चय जे धरोनि हृदयीं गेले पळोनी भयें,
ते गेलेच; करोत उर्वरितही उद्योग जाया स्वयें;
राहो मन्मतिमात्र कार्यकरणीं[1] सेनाशता आगळी,
नंदोच्छेदविधींत दृष्टमाहिमा[2] झाली जगीं आगळी. १

(उठून उभा राहून) पहा, हा मी आतां त्या दुरात्म्या भद्रभटादिकांस धरून आणतों. (स्वगत) अरे दुरात्म्या राक्षसा ! तूं आतां माझ्या हातांतून कोठें जातोस ? पहा—

---

१ कार्य करण्याविषयीं. २ जिचें सामर्थ्य अनुभविलें आहे अशी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वच्छंद एकचि सदा फिरणार दानी
जो वन्य हस्तिसम तूं बलयुक्त मानी,
त्यातें धरूनि मतिनें, नृपकार्यभारा
लावोनियां, उतरितों तव गर्व सारा! १

[जातात.

[पहिला अंक समाप्त.]

---

१ असहाय. २ दाता; पक्षीं मदोदकानें युक्त. ३ रानांतला. ४ मानयुक्त.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**—अमात्य राक्षसाच्या वाड्याजवळील राजमार्ग.
गारुड्याचें सोंग घेतलेला विराधगुप्त प्रवेश करितो.]

गारुडी—

जे सकळ तंत्रे[१]युक्ति जाणती, आणि यथास्थित मंडल लिहिती,
जे मंत्ररक्षणीं तत्पर असती, तेचि सेविती सर्पनरेंद्रां. १

(आपणाशीं कोणी बोललेंसें कल्पून) काय रे दादा, 'मी कोण?' ह्मणून विचारितोस होय ? दादा, मी गारुडी आहें, मला जीर्णविष ह्मणतात. (पुन्हा कोणी बोलतोसें कल्पून) काय ह्मटलेंस 'तूंहि सर्पांशीं खेळावयास इच्छितोस ?' बरें, तुझा धंदा काय आहे ? (पुन्हा कोणी बोलतोसें कल्पून) हं हं, राजसेवा हा तुझा धंदा का ? तर मग सर्पांशीं तूं खेळत आहेसच ! कसें ह्मणशील तर सांगतों ऐक. ज्याला मंत्र आणि ओषधि यांचें ज्ञान नाहीं असा गारुडी, हातीं अंकुश नसून उन्मत्त हत्तीवर बसतो असा माहुत, अधिकार प्राप्त होऊन आपणास कृतकृत्य मानतो असा राजसेवक, हे तिघे विनाश पावतात. —अरे, हा आतांच दृष्टि पडला आणि इतक्यांत दिसेनासा झाला! (पुन्हा कोणी बोललेंसें कल्पून) दादा, ह्या पेटाऱ्यांत काय आहे ह्मणून विचारितोस होय ? हा माझ्या पोटाचा धंदा आहे दादा. ह्या पेटाऱ्यांत साप आहेत. सर्प पाहण्याची तुझी इच्छा आहे ह्मणतोस ? बरें आहे, पण दादा, साप दाखविण्याची ही जागा नाहीं. तुझ्या मनांत साप पाहण्याची इच्छाच असेल तर ये, हें येथें समोर घर आहे, यांत चल आपण जाऊं, ह्मणजे तेथें तुला मी दाखवितों. (पुनः कोणी बोलतोसें कल्पून) काय ? हें अमात्य राक्षसाचें घर आहे, यांत आह्मासारख्यांचा प्रवेश होणार नाहीं, ह्मणतोस ? बरें आहे, तूं जा तर, माझा हा पोट भरण्याचा धंदा फार चांगला आहे. ह्याच्या योगानें माझा सर्व ठिकाणीं प्रवेश आहे. (चोहोंकडे पाहून स्वगत) काय

---

१ या ठिकाणीं तंत्र, मंडल आणि मंत्र हे शब्द श्लिष्ट आहेत. तंत्र ह्मणजे सर्पपक्षीं ग्रंथविशेष, व राजपक्षीं काम करण्याची शैली; मंडल ह्मणजे सर्पपक्षीं जादूंतल्या विशेष आकृति, राजपक्षीं कारभाऱ्यांचा वगैरे समुदाय; मंत्र ह्मणजे सर्पपक्षीं अद्भुत शक्तीचे शब्द, व राजपक्षीं मसलत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हो चमत्कार ? चाणक्याच्या बुद्धीनें चालणारा जो चंद्रगुप्त त्याला पाहत असलें ह्मणजे असें वाटतें कीं, राक्षसाचा सर्व प्रयत्न व्यर्थ आहे! तसेंच राक्षसाच्या बुद्धीनें चालणारा जो मलयकेतु त्याला पाहिलें ह्मणजे असें भासतें कीं, चंद्रगुप्ताचें राज्य गेलेंच ! पहा—

चाणक्याच्या [१]प्रज्ञापाशें बळकट बांधुनि गेली
जाणो लक्ष्मी [२]मौर्यकुलाची सुस्थिर होउनि ठेली; १
उपायहस्तेंकरुनि राक्षसें ओढुनि आणुनि तिजला
अधीन केलें मलयकेतुच्या हेंही वाटे मजला. २

याप्रमाणें आपापल्या अद्भुत बुद्धिबलानें वागणारे असे जे हे दोघे सचिव ह्यांची टक्कर लागली असतां राज्यलक्ष्मी संशयांत पडल्यासारखी झाली आहे. कोणाचा आश्रय करावा याचा तिला निश्चय होत नाहीं. कारण—

वनीं हस्तिनी अपुल्यासाठीं दोघे गज झुजतांना,
दोघांमध्यें इकडुनि तिकडे भागे बहु फिरतांना; १
तशी बापुडी राज्यश्री ही जाऊं येऊं करितां
पडुनि संशयामाजि भागली; झाली ही बहुभीता. २

वरें असो. अगोदर अमात्य राक्षसाची भेट तर घेऊंया.

[जातो.

प्रवेश २ रा.

[**स्थळ**—अमात्य राक्षसाचा वाडा. राक्षस आसनावर चिंताक्रांत बसला आहे, बाहेर दाराजवळ एक सेवक उभा आहे, असा प्रवेश.]

राक्षस—(वर पाहून डोळ्यांत पाणी आणून) फारच वाईट गोष्ट झाली !

[३]वृष्णींशीं सम नीतिविक्रमगुणें ज्यांनीं रिपू मारिले,
त्या नंदांस समूळ निर्दयपणें दैवें कसें नाडिलें !
चिंताव्याकुळ मी अहर्निश असा निद्रा त्यजोनी असें,
[४]भित्तीवांचुनि चित्रकर्मरचना ही मत्कृती होतसे ! १

---

१ दोरी. २ चंद्रगुप्ताच्या कुळाचें नांव. ३ यादवांशीं. ४ भिंतीवांचून जशीं चित्रें काढणें व्यर्थ, तसा माझा प्रयत्न व्यर्थ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अथवा,

भक्ती आठवुनी, त्यजूनि विषयप्रीति प्रतिष्ठा जनीं,
प्राणाचें भय सोडुनी, सतत मीं नीती धरूनी मनीं,
घेऊनी परदास्यहो, झटतसें मी, स्वर्गलोकीं जरी
होईल प्रभु तुष्ट कीं, रिपुवधा ऐकूनियां मत्करीं ! १

(वर पाहून) हे लक्ष्मी, तुला गुणांची अगदींच पारख नाहीं! कारण—

पद.

आनंदाचा निधान नंद कुलीन असतां, तूं मतिमंद!
त्यातें टाकुनियां स्वच्छंद मौर्या कां धरिशि ? । ध्रु० ।
मकरंदातें टाकुनि भृंगी, एरंडाच्या राहे संगीं,
ऐसें झालें; तुझिया अंगीं पारखची नाहीं ! १
घरोघरीं तूं कांगे फिरशी, चपळे! एके जागीं नसशी;
दोष तुझा तुज नकळे, कैशी लज्जा तुज नाहीं ? २
नाश पावतां प्रमत्त हस्ती, जेथिलतेथें जाशि मदपंक्ति
विलय पावती, तशीच रीति केली कां नाहीं ? ३

आणखी ऐक, अकुलीने!

अहा पापे ! अकुलीन मौर्यराजा,
तयाची तूं झालीस कशी भाजा ?
कुलज राजे भूतळीं दग्ध झाले
ह्मणुनि चित्तीं काय हें तुझ्या आलें ? १
पुरूषाचा गुणदोष ओळखाया
ज्ञान नाहीं कामिनीजनाला या
खपुष्पाच्यासारखी मती त्यांची
कुठुनि समजुत त्यांजला निजहिताची ! २

अग दांडगे, पण आतां मी तुझा आश्रयच समूळ उपडून तुझा मनोरथ व्यर्थ करतों! (थोडेंसें चिंतन करून) मी कुसुमपुरांतून बाहेर निघते वेळेस माझा परम मित्र जो चंदनदास त्याच्या घरीं माझीं सर्व मुलेंमाणसें ठेवून नगराबाहेर आलों, ही एक मीं मसलतच केली आहे. कां कीं, कुसुमपुरावर स्वारी करण्याचा उद्योग मीं सोडला नाहीं असें समजून नगरांत आमच्या पक्षांतील व त्याचप्रमाणें पूर्वराजभक्त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जे जे लोक आहेत त्यांचें या कार्याविषयींचें झटणें कमी होणार नाहीं. तसेंच चंद्रगुप्ताला मारण्याकरितां विषप्रयोग करणारे पुरुष मीं तिकडे पाठविले आहेत, त्यांच्या हातून काय होतें तें पाहण्याकरतां आणि शत्रुपक्षांत फितूर करण्याकरतां पुष्कळसा पैसा देऊन शकटदासाला त्या नगरांत ठेविलें आहे. तसेंच प्रतिक्षणीं शत्रूची बातमी लागावी आणि त्यांच्या जुटांत फूट पडावी यासाठीं जीवसिद्धि प्रभृति मित्र-मंडळीची योजना केली आहे; तर आतां—

इष्टपुत्र[1] जो भूपति सान्वय[2], व्याघ्रशिशूपरि ज्यातें
पोसुनि आपण नष्ट जाहला ज्या दुष्टाच्या हातें; १
खचित भेदितों स्वमतिशरानें त्या अधमाचा काय,
अदृष्ट रूपें दुष्ट दैव तें ढाल न त्या जरि होय. २

(इतक्यांत बाहेर कंचुकी प्रवेश करितो.)

कंचुकी—(स्वगत)

चाणक्याच्या जसें नीतिनें निर्दाळुनि नंदास,
कुसुमपुरीच्या राज्यपदावरि बैसविलें मौर्यास; १
तसें जरेनें ममहृदयांतुनि काढुनियां कामास,
प्रभुत्व दिधलें पूर्ण तेथचें, देत देत धर्मास; २
सेवायोगें राक्षसापरी लोभ तपा जिंकाया,
बहुत झटतसे, तथापि त्याचा यत्न जातसे वायां. ३

(इकडे तिकडे फिरून) हें अमात्य राक्षसाचें घर. चला आंत जाऊं. (पुढें होऊन) प्रधानजी, आपलें कल्याण असो.

राक्षस—(वर पाहून) जाजले, मी नमस्कार करतों. अरे प्रियंवदका, यांनां बसावयास आसन दे.

प्रियंवदक—(पुढें येऊन) महाराज, हें आसन आहे, येथें बसावें.

कंचुकी—(आसनावर बसून) प्रधानजी, मलयकेतु महाराजांनीं प्रार्थनापूर्वक आपल्याला सांगितलें आहे कीं, आपण बहुत दिवसपर्यंत अलंकारभूषणें यांचा त्याग केला असल्यामुळें महाराजांनां फार खेद होत आहे. आतां आपल्याला पूर्वीच्या यजमानांच्या गुणांचा एकाएकीं विसर पडणार नाहीं हें खरें आहे, तथापि

---

१ ज्याचें पुत्रावर अत्यंत प्रेम. या विशेषणाचा अभिप्राय हा कीं, चंद्रगुप्त हा नंदाचा दासीपुत्र असतां त्यानें कृतघ्नपणें मित्रवध केला. २ वंशासहित.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रधानजींनीं महाराजांच्या विनंतीला मान देऊन महाराजांच्या संतोषाकरतां हीं भूषणें घातलीं पाहिजेत. (भूषणें पुढें ठेवून) प्रधानजी, हीं भूषणें महाराजांनीं आपल्या अंगावरून काढून आपणाकरितां पाठविलीं आहेत, हीं आपण धारण करावीं.

राक्षस—आर्या, जाजले, राजपुत्रास विनंति करावी कीं, वापा, मी तुझे गुण पाहून पूर्व प्रभूचे गुण विसरलों; तथापि—

वधून अवघे रिपू, कुसुमपट्टनीं[1] जोंवरी
नसे वसविलें प्रभो ! तुज नृपासनीं तोंवरी
पराभव सहून जीं उगिच पोसलीं आयतीं
अशा अबल अंगकीं उचित भूषणें काय तीं ! १

कंचुकी—प्रधानजी, राजनीतींत धुरंधर असे आपण मंत्री असतां राजपुत्रास तें प्राप्त होणें सहज आहे, त्याची कांहीं मोठिशी काळजी वाळगायाला नको; तर त्यांनीं प्रथमच प्रीतिपुरःसर पाठविलेल्या या भेटीचा आपण स्वीकार करावा.

राक्षस—आर्या, जसें राजपुत्राचें तसें आपलेंहि वचन मला मोडतां येत नाहीं. कुमाराच्या आज्ञेप्रमाणें करतों.

कंचुकी—(राक्षसाच्या अंगावर अलंकार घालून) प्रधानजी, आपलें कल्याण असो. आतां मी येतों.

राक्षस—ठीक आहे, मी नमस्कार करतों.

कंचुकी—आपला जय असो.

[जातो.

राक्षस—प्रियंवदका, पहा पहा, आमच्या भेटीच्या इच्छेनें वाहेर कोण आला आहे तो ?

प्रियंवदक—आज्ञा महाराज. (वाहेर जाऊन गारुड्यास पाहून) कोणरे दादा तूं ?

गारुडी—वावा, मी गारुडी आहें, माझें नांव जीर्णविष. प्रधानजींपुढें सर्पांचा तमाशा करून दाखवावा, असें माझ्या मनांत आहे.

प्रियंवदक—अंमळ थांव तर मग, मी अमात्यांस जाऊन कळवितों. (राक्षसाजवळ येऊन) महाराज, कोणी गारुडी वाहेर आला आहे व आपल्यापुढें सर्पांचा तमाशा करून दाखवावा अशी त्याची इच्छा आहे.

---

१ नंदाच्या राजधानीचें नांव.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—(डावा डोळा लवल्यासारखें सुचवून स्वगत) हा काय अपशकुन! कार्यारंभींच सर्पाचें दर्शन? (उघड) बावा, प्रियंवदका, मला सर्पांचा खेळ आवडत नाहीं, जा आणि त्या गारुड्याला कांहींतरी देऊन वाटेस लाव.

प्रियंवदक—आज्ञा महाराज. (गारुड्याजवळ येऊन) गारुडीदादा, तुझी भेट न घेतांच अमात्यांनीं तुला हें बक्षिस दिलें आहे, हें घे. तूर्त ते तुझ्या सापांचा खेळ पाहूं इच्छित नाहींत.

गारुडी—बावा, अमात्यांला मी अशी विनंति करतों ह्मणून सांग कीं, मी केवळ साप बाळगणारा गारुडीच आहें असें नाहीं, तर प्राकृत कवीहि आहें. अमात्यांच्या मनांत माझें दर्शन घ्यावयाचें नसल्यास चिंता नाहीं; परंतु मी देतों हें पत्र तरी कृपा करून त्यांनां वाचावयास सांग.

प्रियंवदक—(पत्र घेऊन राक्षसाकडे येऊन) महाराज, तो गारुडी विनंति करित आहे कीं, आपण केवळ सापांवर पोट भरणारा गारुडीच नसून प्राकृत कवि आहें. धन्याच्या मनांत आपल्याला भेटण्याचें नसल्यास कृपा करून हें पत्र तरी वाचावें.

राक्षस—(पत्र घेऊन वाचतो.)

कुसुमरसाचें शोषण कुशलपणें भ्रमर करुनि टाकितसे,
त्यापासुनि सर्वहि जन अपुला उपयोग करुनि घेत असे. १

(स्वगत) अरे, ह्या आर्येवरून तो सुचवितो आहे कीं, आपण कुसुमपुरांतील सर्व वृत्तांत जाणणारा तुमचा वातमीदार आहें. होय. काय सांगावें? मनाच्या व्यग्रत्वामुळें व गुप्त वातमीदार बहुत असल्यामुळें मी अगदीं विसरून गेलों होतों, परंतु आतां स्मरण झालें; विराधगुप्त नांवाच्या वातमीदारास गारुड्याच्या वेषानें मीं कुसुमपुरास पाठविला होता, तो तेथून परत आलेला असावा. होय, यांत संशय नाहीं. (उघड) बावा, प्रियंवदका, त्याला आंत घेऊन ये. कारण, तो मोठा कवि आहे, त्याची सुंदर कविता ऐकिली पाहिजे.

प्रियंवदक—आज्ञा महाराज. (गारुड्याकडे येऊन) यावें, गारुडी बावा, यावें.

गारुडी—(आंत येऊन पाहून स्वगत) अरे, हा येथें अमात्य राक्षस, काय ज्याचा पराक्रम व दरारा!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डावी घालुनि ही गळां भुजलता, मागें वळोनी बघे,
स्कंधीं ठेवियली वळेंहि उजवी शंकूनि काढूनि घे,
चित्तीं उत्सुक फार ही असुनियां, अद्यापि ज्याच्या भयें
गाढालिंगन द्यावयास न धजे मौर्यास लक्ष्मी स्वयें. १

(उघड) अमात्यांचा जयजयकार असो.

राक्षस—(पाहून) अरे हा विराध-(असें अर्धें बोलून शुद्धीवर येऊन) प्रियंवदका, आह्मांला आतां सापांचा तमाशा पहावयाचा आहे, याकरितां चाकरांस बाहेर बसावयास सांग आणि तूंहि आपल्या कामास जा.

प्रियंवदक—आज्ञा महाराज.

[चाकरांसह जातो.

राक्षस—मित्रा विराधगुप्ता, हें येथें आसन आहे, त्यावर बसावें. (तो बसल्यावर त्याच्याकडे खेदपूर्वक पाहून) काय हो, नंदराजाच्या पदरच्या माणसांची अशी दशा व्हावी काय? असो. दैवगतीपुढें उपाय नाहीं! (डोळ्यांना पदर लावतो).

विराधगुप्त—प्रधानजी, खेद कां करितां? हेहि दिवस निघून जातील आणि लवकरच आपण आह्मांला पूर्वदशेस आणाल.

राक्षस—मित्रा विराधगुप्ता, कुसुमपुरांतील वृत्तांत कसा काय आहे तो ऐकूं दे.

विराधगुप्त—प्रधानजी, कुसुमपुरांतील एकंदर वृत्तांत फारच मोठा आहे, तो सर्व सांगावयास फार वेळ लागेल. याकरितां कोठून आरंभ करूं?

राक्षस—मित्रा, चंद्रगुप्तानें नगरांत प्रवेश केल्यावर मीं त्यावर विषप्रयोग करण्याकरितां कांहीं लोक नगरांत ठेविले होते, त्यांनीं काय केलें, तेथून आरंभ कर.

विराधगुप्त—ठीक आहे, ऐकावें तर मग. शक, यवन, किरात, कांबोज, पारसी, वाल्हीक, हे लोक ज्यांत मुख्य आहेत, व चाणक्याच्या मसलतीनें चालणारीं जीं चंद्रगुप्त आणि पर्वतेश्वर यांचीं सैन्यें, त्या सैन्यांनीं प्रळयकाळीं खवळलेल्या चारी समुद्रांच्या विशाळ कल्होळाप्रमाणें कुसुमपुर चोहोंकडून वेढलें असतां—

राक्षस—(आवेशानें तरवार उपसून) आं! मी जीवंत असतां कुसुमपुराला कोण वेढणार आहे? प्रवीरका, अरे प्रवीरका, लवकर जलदी कर—

प्राकाराच्या सभोंवतीं, धनुष्यें धरोनियां हातीं,
धनुर्धर एकचित्तीं, सावध उभे राहोत. १

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रत्येक द्वारीं [१]वेतंड, शत्रूंच्या गजांचे गंड,
भेदावया प्रचंड, तोंडें धरोनि राहोत. २
जीवित आहे चंचल, कीर्ति ही राहे अढळ,
संपादावी ती सोज्वळ, ऐसें चित्तीं जयांच्या; ३
ते करोनि एकमन, मृत्यूचें भय टाकून,
शत्रु दुर्बळ मानून, माझ्यासवें येवोत. ४

विराधगुप्त—हां हां, प्रधानजी, स्वस्थ व्हा; स्वस्थ व्हा, ही झालेली गोष्ट मी सांगत आहें.

राक्षस—काय, ही गोष्ट झाली ? (उसासा टाकून) मी असें समजलों कीं, आतांच तो प्रसंग होत आहे. (हातांतील तरवार टाकून डोळ्यांत अश्रु आणून) हर हर! राजा सर्वार्थसिद्धे! नंदा! तुझी अपार कृपा हा राक्षस अद्यापि स्मरत आहे! त्या प्रसंगीं केवढा तुझा मजवर भरंवसा—

जेथें ही [२]मेघनीला [३]समद [४]गजघटा राक्षसें तेथ जावें,
अश्वांची पंक्ति जेथें [५]प्लुतचपलजलोद्दीन तेथें असावें;
रक्षावें [६]पत्तिसैन्याप्रति, सकल असा भार ठेवोनि माथा,
एका मातें सहस्रा अधिक समजसी प्रेमयोगें समर्था. १

असो. विराधगुप्ता, चालूं दे तुझी गोष्ट.

विराधगुप्त—कुसुमपुरास शत्रूंनीं चोहींकडून वेढा घातला असतां, तें पाहून राजा सर्वार्थसिद्धीला बहुत दिवसपर्यंत पौरजनांस झालेला तो उपद्रव पहावेना, झणून तशाहि संकटावस्थेंत प्रजेचा कळवळा येऊन तो दयाळू राजा सुरंगाच्या वाटेनें तपोवनास गेला. तदनंतर धनी नाहींसा झाल्यानें फौजेची हुषारी मोडून ती झटून लढेनाशी झाली. आपल्या पक्षांतील जे लोक चोरून नगरांत राहिले होते त्यांनीं शत्रु आल्याची दंवडी फिरण्यास हरकत वगैरे केली, त्यावरून ते उघडकीस आले. तसेंच पुनः स्वराज्य स्थापावें झणून उद्योग करण्यासाठीं तुह्मी सुरंगाच्या वाटेनें बाहेर गेलां. चंद्रगुप्ताला मारावयासाठीं आपण जी विषकन्या पाठविली होती, तिनें विचारा पर्वतेश्वर मारला गेला. याप्रमाणें झालें असतां—

राक्षस—मित्रा, ही दैवगति काय विचित्र आहे पहा—

---

१ हत्ती. २ मेघासारखी नीलवर्ण. ३ मदसहित. ४ गजांची पंक्ति. ५ वर उडणाऱ्या आणि चंचल जलासारखी. ६ पायदळ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कर्णें [1]जिष्णुवधार्थ [2]शक्ति सबला राखोनियां ठेविली,
ती मारोनि घटोत्कचास [1]विजया क्षेमप्रदा जाहली;
मीं ही योजियली विषांग युवती त्या चंद्रगुप्तीं, अहा,
तीनें पर्वतका वधूनि अरिचें कल्याण केलें पहा ! १

विराधगुप्त—प्रधानजी, दैव स्वतंत्र आहे, त्यापुढें कोणाचा उपाय चालणार आहे ?

राक्षस—पुढें काय झालें ?

विराधगुप्त—तदनतर पित्याचा वध झाल्यामुळें मलयकेतु शोकाविष्ट होऊन कुसुमपुरांतून निघून गेला; तेव्हां वैरोचनक नांवाच्या पर्वतकाच्या भावाला 'तुमचा बंधू मेला त्या अर्थीं त्याला देऊं केलेलें अर्धराज्य तुह्मांलाच देतों, ' असें सांगून त्याचा आपल्यावर विश्वास बसवून घेतला व चंद्रगुप्त नंदराजाच्या वाड्यांत प्रवेश करणार, अशी चोहींकडे बातमी उठविली. नंतर त्या दुष्ट चाणक्यानें नगरांत राहणारे सर्व शिल्पी बोलावून आणून त्यांनां सांगितलें कीं, आजच मध्यरात्रीं ज्योतिष्यांनीं मुहूर्त सांगितला असल्यामुळें त्या मुहूर्तावर चंद्रगुप्त नंदाच्या वाड्यांत प्रवेश करणार आहे, याकरितां थोरल्या दरवाजापासून सर्व राजवाडा तोरणादिकांनीं शुशोभित करावा. तदनंतर शिल्प्यांनीं उत्तर केलें, 'भटजी महाराज, चंद्रगुप्त महाराजांचा लौकरच नंदाच्या वाड्यांत प्रवेश होईल असें अटकळीनें ताडून दारुवर्मा नांवाच्या मुख्य शिल्प्यानें आपल्या आज्ञेच्या पूर्वीच सोन्याचीं तोरणें लावून व सुंदर चित्रविचित्र रंग देऊन राजवाड्याचें प्रथम द्वार फारच शृंगारून ठेविलें आहे. आतां आंतली तयारी करणें मात्र आह्माकडे राहिलें आहे, ती आह्मी करतों.' तदनंतर आपण सांगितल्यावांचून दारुवर्म्यानें प्रथम द्वार सुशोभित केलें हें ऐकून चाणक्य संतुष्ट झाला, आणि दारुवर्म्याच्या ह्या दक्षतेची तारीफ करून बोलला कीं, दारुवर्म्याला ह्या दक्षतेचें फळ लवकरच प्राप्त होईल.

राक्षस—(त्रासानें) मित्रा, त्या चाणक्याला संतोष कोठून होणार आहे ? ह्या दारुवर्म्याचा प्रयत्न फुटक गेला असावा; अथवा, त्याचें कांहींतरी वाईट फळ त्याला मिळालें असावें, असें मला खचीत वाटतें; कारण, दारुवर्म्यानें मूर्खपणानें ह्मणा, किंवा नंदराजाविषयींच्या अतिशय भक्तीनें ह्मणा, आज्ञेची वाट न पाहतां हें

---

१ अर्जुन २ एका प्रकारचें शस्त्र.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काम केलें या योगानें त्यानें त्या संशयी व धूर्त चाणक्याच्या मनांत आपणाविषयीं उगीच वहीम आणिला. असो. पुढें काय झालें ?

विराधगुप्त—तदनंतर त्या दुष्ट चाणक्यानें आज अनुकूल लग्नावर मध्यरात्रीं चंद्रगुप्ताचा नंदाच्या वाड्यांत प्रवेश होणार, याकरितां सर्वांनीं आपआपल्या कामावर तयार असावें, असें सर्व अधिकाऱ्यांनां आणि नगरांतील इतर लोकांनां कळवून तत्काळ पर्वतेश्वराचा भाऊ वैरोचनक याला चंद्रगुप्तासहवर्तमान एका आसनावर बसवून पृथ्वीचें अर्ध राज्य दिलें.

राक्षस—हं हं ! पर्वतकास पूर्वी देऊं केलेलें पृथ्वीचें अर्ध राज्य त्याच्या भावास दिलें ?

विराधगुप्त—होय महाराज.

राक्षस—(स्वगत) तो चाणक्य मोठा कावेबाज आहे. त्यानें त्या बापड्या वैरोचनकाचा घात करण्याची कांहीं गुप्त योजना केल्यावांचून ही गोष्ट खचीत केली नाहीं. बाह्यात्कारें हें अर्ध राज्य देण्याचा इतकाच मतलब कीं, त्या बिचाऱ्या पर्वतेश्वरास मारविल्याचा वहीम लोकांनीं आपणावर घेऊं नये. (उघड) बरें, पुढें काय झालें ?

विराधगुप्त—तदनंतर आज मध्यरात्रीं चंद्रगुप्त नंदाच्या वाड्यांत प्रवेश करणार असें पूर्वी प्रसिद्ध केलें होतेंच. मग पर्वतेश्वराचा भाऊ वैरोचनक याला अभिषेक केला. सुंदर शुक्ती व मोठमोठीं मोत्यें ज्यास जोडलीं आहेत असा चित्रविचित्र रंगाच्या वस्त्राचा झगा त्याच्या अंगांत घातला; त्याच्या मस्तकावर जडावाचा मुकुट घालून त्याच्या गळ्यांत सुगंध पुष्पांचे हार घातले; सारांश, त्या वैरोचनकास त्यांनीं असा सजिवला कीं, त्याला रात्रंदिवस पाहणारांसदेखील हा वैरोचनकच आहे असें ओळखतां येइनासें झालें. मग त्या दुष्ट चाणक्याच्या आज्ञेनें चंद्रगुप्ताची नेहमीं बसावयाची चंद्रलेखा नामक जी हत्तीण तिच्यावर त्याला बसविलें, व त्याच्या मागून चंद्रगुप्ताच्या पाठीमागें चालणारे सर्व राजे चालूं लागले. याप्रमाणें मोठ्या थाटानें तो वैरोचनक नंद राजाच्या वाड्यांत प्रवेश करित असतां, आपण योजिलेल्या दारुवर्मा नांवाच्या कारागिरानें हाच चंद्रगुप्त असें समजून वैरोचनकावर पाडण्याकरितां तें तोरणयंत्र तयार केलें. इतक्यांत चंद्रगुप्तामागें चालणाऱ्या सर्व राजांनीं आपआपलीं वाहनें दरवाजाबाहेर आखडून धरलीं, आणि आपला फितुरी बर्बरक नांवाचा जो चंद्रगुप्ताचा माहूत त्यानें या गर्दीत वैरोचनकास

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मारण्याकरितां सोन्याच्या छडींत ठेवलेली गुप्ति उपसावी ह्मणून सोन्याच्या सांखळांला गुंतिवलेली ती सोन्याची छडी हातीं घेतली—

राक्षस—(स्वगत) ह्या दोघांनीं भलत्या वेळीं यत्न केला. (उघड) बरें, पुढें काय झालें?

विराधगुप्त—तदनंतर बर्बरकानें छडींस हात घालतांच माराच्या भयानें ती हत्तीण अधिक जलद चालूं लागली. इकडे दारुवर्म्यानें त्या हत्तिणीच्या चालीवर सारें लक्ष्य ठेवून असा बेत धरला होता कीं, ती हत्तीण त्या दरवाज्यांत आल्याबरोबर तो दरवाजा, मागें बसलेला व त्याला चंद्रगुप्त वाटलेला जो वैरोचक ह्याच्यावर पडावा; परंतु हत्तीण धावूं लागल्यामुळें वेळ चुकला व तो दरवाजा वैरोचकावर न पडतां पुढें बसलेल्या त्या विचाऱ्या बर्बरकावर पडून तो मात्र ठार झाला, आणि त्याच्या हातांतील ती गुप्ति जागचे जागींच राहिली. इकडे दरवाजा पडला असतां आपणास अपाय न व्हावा ह्मणून दारुवर्मा पूर्वींच त्या दरवाज्याच्या बाजूस उंच ठिकाणावर चढला होता. त्यानें यंत्राचें धोरण चुकलेंसें पाहून आपल्या हातची यंत्र जोडण्याची लोखंडी खीळ जोरानें नम धरून फेंकली, ती वर्मीं लागून तो विचारा वैरोचक मारला गेला!

राक्षस—अरेरे, दोन्ही गोष्टी वाईट झाल्या! पहा, चंद्रगुप्त बचावला आणि विचारे वैरोचक आणि बर्बरक फुकट मारले गेले (दुःखानें स्वगत) ते दोघे कशाचे मेले? त्या दुष्ट दैवानें आह्मांलाच ठार केलें! (उघड) बरें, त्या दारुवर्म्याची तरी काय वाट झाला?

विराधगुप्त - वैरोचकाच्यापुढें चालणाऱ्या पायदळानें दारुवर्म्याला दगड मारमारून ठार केला!

राक्षस—(डोळ्यांत अश्रु आणून) हरहर! केवढें हें दुःख! आमचा परम मित्र आणि अत्यंत मायाळु असा दारुवर्मा आज आह्मांला नाहींसा झाला! दैवगति विचित्र आहे. बरें, त्या अभयदत्त नांवाच्या वैद्याला कांहीं गुप्त काम सांगून तेथें ठेवला होता, त्यानें काय केलें?

विराधगुप्त—प्रधानजी, त्यानें आपण सांगितल्याप्रमाणें सर्व केलें.

राक्षस—(हर्ष पावून) मित्रा, चंद्रगुप्ताला मारला कारे?

विराधगुप्त—प्रधानजी, केवळ दैव सबळ असल्यानेंच तो मेला नाहीं.

राक्षस—(खेद पावून) अरे, चंद्रगुप्ताला मारला नाहीं, तर मग काय मोठ्या संतोषानें सांगतोस कीं, त्या वैद्यानें सर्व केलें ह्मणून?

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विराधगुप्त—प्रधानजी, त्या अभयदत्तानें चंदगुप्ताला देण्याकरितां विष घालून औषध तयार करून दिलें; परंतु तें त्या गुलामा चाणक्यानें सोन्याच्या भांड्यांत ठेवून पाहिलें, तों त्याचा रंग पालटला. त्यावरून चाणक्यानें चंद्रगुप्तास सांगितलें कीं ' चंद्रगुप्ता ! ह्या औषधांत विष आहे बरें, हें तूं घेऊं नको.'

राक्षस—तो गुलाम मोठा कावेबाज आहे! बरें, त्या वैद्याची काय वाट झाली?

विराधगुप्त—तदनंतर तेंच औषध चाणक्यानें त्या वैद्याकडून पिवविलें, तेणेंकरून तो प्राणास मुकला.

राक्षस—(दुःखानें) हरहर! आज केवळ ज्ञानसूर्यच मावळला! बरें विराधगुप्ता, राजा निजावयाच्या जागीं प्रमोदकाची योजना केली होती, त्याचें वर्तमान काय झालें ?

विराधगुप्त—जें इतरांचें, तेंच त्याचें !

राक्षस—(दुःख पावून) इतरांसारखें, तें कसें ?

विराधगुप्त—तुह्मीं त्याच्यापाशीं पुष्कळ द्रव्य दिलें होतें, तें त्या मूर्खानें झांकूनपाकून खर्चावें, तें सोडून यथेष्ट डामडौलानें तो खर्च करूं लागला. तेव्हां चाणक्यानें त्याला विचारलें कीं, तुला इतकें द्रव्य कोठून मिळालें? तेव्हां तो पूर्वापारविरुद्ध कांहींतरी सांगूं लागल्यावरून चाणक्यानें हालकरकरून त्याला मारलें.

राक्षस—(खेद पावून) हं ! दैवानें येथेंहि आह्मालाच हात दाखविला? बरें, चंद्रगुप्त निजला असतां त्याला मारावें ह्या बेतानें आह्मीं बीभत्सकादिक कांहीं लोक राजवाड्यांतल्या भिंतींतल्या चोरखोल्यांत ठेविले होते, त्यांची काय बातमी ?

विराधगुप्त—प्रधानजी, त्यांच्या स्थितीची आठवण झाली ह्मणजे अंगावर शहारे येतात !

राक्षस—(दुःख पावून) शहारे आणणारी काय गोष्ट ? ते बीभत्सकादिक त्या चोरखोल्यांत लपून असलेले त्या दुष्ट चाणक्यास कळले नाहींत ना ?

विराधगुप्त—कळले नाहींत कसे ? कळले.

राक्षस—कसे बरें ?

विराधगुप्त—महाराज, ऐकावें.चंद्रगुप्त त्या महालांत निजावयास जाण्याच्या पूर्वीं चाणक्य त्या महालांत गेला, आणि त्यानें ती सर्व जागा न्याहाळून पाहिली, तों एका भिंतीच्या छिद्रावाटे दाण्यांचे कण तोंडांत धरून मुंग्यांची रांग जात होती. ती पाहून त्या धूर्त चाणक्यानें अनुमान केलें कीं, येथें दाण्यांचा संबंध आहे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

च तो माणसांवांचून असणार नाहीं. येथें मनुष्यें असलींच पाहिजेत. आणि त्याला असें वाटतांच त्यानें त्या महालाला आग लावून दिली. मग तो महाल जळूं लागला तेव्हां आंत धूर कोंडला व त्यामुळें आंत राहिलेल्या लोकांच्या डोळ्यांस कांहीं दिसेनासें झालें. बाहेर निघावयास जी वाट होती तीहि त्या धांदलींत त्यांनां सांपडली नाहीं, आणि ते तेथल्यातेथेंच जळून मेले!

राक्षस—(डोळयांत अश्रु आणून) मित्रा, पहा त्या वेड्या चंद्रगुप्ताचें दैव केवढें प्रबळ तें! त्याच्यापुढें आमच्या सर्व मसलती फसून उलट्या आमच्याच नाशास कारण झाल्या! (चिंतायुक्त होऊन) मित्रा, पहा, त्या दुरात्म्या चंद्रगुप्ताचें दैव—

विषकन्येनें नकळत जाउनि चंद्रगुप्त मारावा,
ह्मणोनि मीं ती पाठविली; परि दैवानें कां व्हावा १
पर्वतकाचा वध? जो असता जिवंत जरि, तरि भागी
होता राज्यार्धाचा; पण जो गेला मरुन अभागी! २

विराधगुप्त—अमात्या, किती जरी संकटें आलीं, तरी थोरांनीं जें कार्य एक वेळ आरंभिलें, तें शेवटासच नेलें पाहिजे.

विघ्नभयानें न करिति कार्यप्रारंभ, अधम जे असती;
मध्यम आरंभिति परि, विघ्नें येतां उगेच मग बसती; १
वारंवारहि विघ्नें आलीं जरि तरिहि उत्तमप्रकृती
नेतीच शेवटाला आरब्धा जी असेल इष्ट कृती. २

नाहीं भार ह्मणूनि शेष महितें खालीं न टाकीतसे;
थांबेना फिरतां रवी ह्मणुनियां कीं शीण त्यातें नसे;
श्रेष्ठ स्वीकृतपालनास अपुला हा धर्मसें जाणती,
अंगीकारुनि एकदा मग तया सोडावया लाजती. १

राक्षस—मित्रा, आरंभिलेलें कृत्य सोडूं नये हा नियम मी कसा पाळित आहें, हें तूं प्रत्यक्ष पहातच आहेस! बरें, पुढें काय झालें?

विराधगुप्त—तेव्हांपासून चाणक्य चंद्रगुप्ताला पहिल्यापेक्षां हजारपट जपूं लागला. मग त्यानें ह्यांच्यापासून अशीं अरिष्टें होतात असा निश्चय करून कुसुमपुरांत राहणारे तुमच्या पक्षाचे ह्मणून जे जे लोक होते, त्या सर्वांचा शोध करकरून त्यांनां शिक्षा केली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—(त्रास पावून) मित्रा, सांग सांग बरें, कोणाकोणास कायकाय शिक्षा केला तो?

विराधगुप्त—पहिल्यानें क्षपणक जीवसिद्धी याची धिंड काढून त्याला नगराबाहेर हांकून लाविलें.

राक्षस—(स्वगत) अंः यावद्दल कांहीं फारसें वाईट वाटत नाहीं. कारण, जो सडा असतो त्याला हद्दपार केल्यानं त्याची मोठीशी हानि नाहीं. (उघड) मित्रा, त्या जीवसिद्धीस कोणत्या अपराधावरून हा दंड केला रे?

विराधगुप्त—या दुरात्म्या जीवसिद्धीनें राक्षसानें पाठविलेल्या विषकन्येच्या योगानें आपला मित्र पर्वतेश्वर याला मारिलें, असा त्याच्यावर गुन्हा ठेवून त्याला ही शिक्षा केली.

राक्षस—(स्वगत) वाहवा! शाबास! कौटिल्या शाबास!! याचें नांव मसलत!

अपयश देउनि आह्मां, यश घेउनि आपणास, पर्वतक
मारियला; तव होता राज्यार्धाचा प्रसिद्ध जो हरक.[१]
ह्मणणें भाग पडे हें, कीं, अप्रतिमा असे तुझी वा![२]धी;
एका यत्नामध्यें अनेक कार्यास जी सहज साधी! २

(उघड) बरें, पुढें काय झालें?

विराधगुप्त—तदनतर, चंद्रगुप्ताचा घात करावयाकरितां दारूवर्मादिकांस प्रवृत्त केलें असा गुन्हा ठेवून शकटदासास सुळावर दिलें.

राक्षस—(डोळ्यांत अश्रु आणून) हे मित्रा शकटदासा! तुला असा अयोग्य मृत्यु यावा काय रे? अथवा, तुझें चांगलेंच झालें! कारण, स्वामीकार्यार्थ त्वां प्राणत्याग केला. आह्मी वरीक हतभाग्य खरे! कारण, सर्व नंदकुलाचा नाश झाला असतां अद्यापि वांचण्याची आशा आह्मांला सोडित नाहीं!

विराधगुप्त—प्रधानजी, असें नाहीं. छे छे, आपण हतभाग्य नव्हे! आपणासारख्यांनीं जिवंत असून स्वामीकार्यार्थ झटावें, हेंच योग्य आहे.

राक्षस—मित्रा विराधगुप्ता—

हेतूस याचि योजुनि, आशेतें जीविताचिया धरितों,
होउनि कृतघ्नही परलोकगता स्वामिला न अनुसरतों. १

---

१ हरण करणारा. २ बुद्धि.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विराधगुप्त—खरें आहे. ('हेतूस याचि योजुनि' ही आर्या पुनः ह्मणतो.)

राक्षस—बरें मित्रा, आणखी कांहीं इष्टमित्रांचें दुःख असल तें सांग. मी हतभाग्य तें ऐकावयास तयार बसलों आहें.

विराधगुप्त—शकटदासाची ही अवस्था पाहून तुमचा परम मित्र चंदनदास यानें आपल्या घरीं असलेलीं तुमचीं मुलेंमाणसें दुसरीकडे पळविलीं.

राक्षस—मित्रा, परंतु त्या चाणक्याशीं चंदनदासानें वैर केलें हें नीट केलें नाहीं.

विराधगुप्त—खरें, परंतु त्याच्याशीं विरोध केल्यापेक्षां मित्राशीं विश्वासघात करणें हें तर फारच वाईट होय!

राक्षस—बरें, पुढें काय झालें ?

विराधगुप्त—मग चाणक्यानें बहुतप्रकारें त्याच्यापाशीं तुमचीं मुलेंमाणसें मागितलीं; परंतु चंदनदासानें तीं त्याच्या हवाला केलीं नाहींत. तेव्हां चाणक्यास अत्यंत क्रोध येऊन त्यानें—

राक्षस—(त्रास पावून) त्याला मारला नाहीं ना ?

विराधगुप्त—नाहीं, मारला नाहीं. पण त्याचें घरदार सर्व लुटून घेऊन पोरांबाळांसुद्धां त्याला बिड्या घालून बंदींत टाकिलें.

राक्षस—तर मग मोठ्या संतोषानें काय सांगतोस, चंदनदासानें माझीं मुलेंमाणसें आपल्या घरून पळविलीं ह्मणून? असें कां ह्मणनास कीं, पोरांबाळांसुद्धां राक्षसासच चाणक्यानें बंदींत टाकिलें ह्मणून?

(इतक्यांत प्रियंवदक प्रवेश करितो.)

प्रियंवदक—अमात्यांचा जयजयकार असो. महाराज, शकटदास बाहेर आले आहेत.

राक्षस—(हर्ष पावून) बावा, प्रियंवदका खरेंच कायरे.?

प्रियंवदक—महाराज, आपल्या चरणांपाशीं रात्रंदिवस वागणाऱ्या आह्माला खोटें बोलणें माहित तरी आहे काय ?

राक्षस—(विराधगुप्तास) मित्रा, हा काय सांगतो रे ?

विराधगुप्त—प्रधानजी, कदाचित् तसेंहि असेल; कारण, दैव अनुकूळ झाल्यास तें काय करणार नाहीं!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—प्रियंवदका, जर तूं ह्मणतोस असें आहे, तर मग विलंब कां करतोस? जा लवकर, आणि शकटदासाला घेऊन ये. त्या मित्राला पाहून निवूं दे माझे डोळे लवकर. (विराधगुप्तास) मित्रा, तूंहि अमळ बाहेर जा.

प्रियंवदक—आज्ञा महाराज.

[प्रियंवदक आणि विराधगुप्त जातात.

(तदनंतर शकटदास आणि त्याच्यामागून सिद्धार्थक असे येतात.)

शकटदास—(स्वगत) अहो! हा येथें अमात्य राक्षस बसला आहे! जो—

नंदक्षय झाला तरि, ठेवुनि अक्षीण त्यावरी भक्ती,
साधाया स्वास्यर्था, आहे तितुकीहि योजितो शक्ती. १
भूमंडळांत अवघ्या आहेत स्वामिभक्त जे मोठे,
त्या सर्वांत धुरंधर हाचि; नसे देखिला दुजा कोठें! २

(पुढें होऊन) अमात्यांचा जयजयकार असो!

राक्षस—(हर्ष पावून) मित्रा, शकटदासा, त्या दुष्ट चाणक्यानें तुला घेरलें होतें; परंतु दैवानें पुन्हा माझ्या दृष्टी पडलास! ये, मित्रा, मला लवकर भेट. (कडकडून शकटदासास भेटून) हें येथें आसन आहे, ह्यावर बसावें. (तो बसल्यावर) मित्रा, शकटदासा, माझ्या ह्या हृदयास आनंद देण्यास कारण कोण झाला रे?

शकटदास—(सिद्धार्थकाकडे बोट करून) प्रधानजी, ह्या माझ्या मित्रानें घातकांस पळवून सुळीं देण्याच्या जाग्यावरून काढून मला आणिलें.

राक्षस—शावास, सिद्धार्थका शावास! तुझ्या ह्या कामागिरीस हें वक्षीस फारच थोडें आहे, तरी तूं हें मानून घे. (आपल्या अंगावरील भूषणें काढून त्याला देतो)

सिद्धार्थक—(भूषणें घेऊन राक्षसाच्या चरणांवर मस्तक ठेवून) प्रधानजी, ह्या ठिकाणीं मी पहिल्यानेंच आलों आहें, ह्यामुळें आपण कृपा करून दिलेलें हें वक्षीस ज्यापाशीं ठेवावें असा येथें कोणीहि माझ्या ओळखीचा नाहीं. याकरितां ह्यांच्यावर मी ही माझी मुद्रा करून आपल्याच जामदारखान्यांत तूर्त हीं भूषणें ठेवतों. मला जेव्हां कारण पडेल तेव्हां मी घेईन.

राक्षस—सिद्धार्थका, कांहीं चिंता नाहीं. तूं ह्मणतोस तसें कर. (शकटदासास) ठेवा त्याचीं भूषणें.

सिद्धार्थक—आज्ञेप्रमाणें करतों. (दागिन्यांच्या थैलीवर मुद्रा करून शकटदासाच्या स्वाधीन करतो).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शकटदास—(मुद्रा पाहून, राक्षसास) प्रधानजी, या मुद्रेवर आपलें नांव आहे.

राक्षस—(पाहून खेद पावून, तर्कानें स्वगत) मी नगरांतून बाहेर पडतांना माझ्या आठवणीकरतां बायकोनें ही माझ्या बोटांतून काढून घेतली होती. ती ही मुद्रा तिच्या हातून ह्याच्या हातांत कशी आली बरें ? (उघड) अरे सिद्धार्थका, ही मुद्रा तुझ्या हातीं कोठून आली ?

सिद्धार्थक—महाराज, कुसुमपुरांत चंदनदासशेट ह्मणून एक जवाहीरगार राहत असतो; त्याच्या दरवाज्यांत ही मुद्रा पडली होती, ती मला सांपडली.

राक्षस—होय, जुळतें खरें.

सिद्धार्थक—महाराज, काय जुळतें ?

राक्षस—श्रीमंतांच्या घरीं असे जिन्नस असतात, ह्मणून तेथें ती तुला सांपडली ही गोष्ट जुळते, असें मी ह्मणालों.

शकटदास—मित्रा सिद्धार्थका, ह्या मुद्रेवर अमात्यांचें नांव आहे. यास्तव ती तूं त्यांनां दे. तिजबद्दल ते तुला पुष्कळ किंमत देतील.

सिद्धार्थक—महाराज, ही मुद्रा अमात्य स्वीकारतात ही मी मोठी मेहरबानी समजतों. (मुद्रा पुढें ठेवितो.)

राक्षस—(मुद्रा घेऊन शकटदासास) मित्रा, शकटदासा, तूं ह्या मुद्रेनेंच आपलीं सर्व कामें करित जा.

शकटदास—प्रधानजी, ठीक आहे. आज्ञेप्रमाणें करतों.

सिद्धार्थक—महाराज, एक विनंति आहे. आज्ञा झाल्यास ती पायांजवळ निवेदन करीन.

राक्षस—बाबा, मनांत असेल तें खुशाल बोल, संकोच धरूं नको.

सिद्धार्थक—त्या दुष्ट चाणक्याशीं वैर करून पुन्हा त्या कुसुमपुरांत माझा प्रवेश होणार नाहीं, हें आपण जाणतच आहां. तर आपल्याच पायांपाशीं रहावें, अशी इच्छा आहे महाराज.

राक्षस—सिद्धार्थका, फार चांगलें, आह्मांसहि हें इष्टच आहे. इतकेंच कीं, हा तुझा अभिप्राय ठाऊक नसल्यामुळें ही गोष्ट आह्मींच होऊन तुला ह्मणावी, तें चुकलों. ठीक आहे, खुशाल रहा येथें.

सिद्धार्थक—(हर्ष पावून) महाराजांनीं मजवर ही मोठीच कृपा केली !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—मित्रा, शकटदासा, हा सिद्धार्थक दमला असेल, याची रहावयाची वगैरे तजवीज करीव.

शकटदास—आज्ञेप्रमाणें करतों.

[शकटदास सिद्धार्थकास घेऊन जातो.

(तदनंतर विराधगुप्त प्रवेश करितो.)

राक्षस—मित्रा विराधगुप्ता, ये बैस. आतां उरलेला कुसुमपुरांतील वृत्तांत संपीव. कुसुमपुरांत जे चंद्रगुप्ताच अमात्य आहेत, त्यांत आमचा फितूर लागू पडतो काय रे?

विराधगुप्त—होय, पडतो लागू, असें वाटतं. कारण, त्याप्रमाणें चिन्हें घडत आहेत.

राक्षस—मित्रा, अशी फूट पडण्यास कारण काय बरें?

विराधगुप्त—प्रधानजी, त्याचें कारण असें कीं, मलयकेतु कुसुमपुरांतून पळून गेल्यापासून चंद्रगुप्ताला चाणक्याचा फार राग आला आहे. आण चंद्रगुप्त स्वतंत्र झाल्यापासून आपली सत्ता दाखविण्याकरितां चाणक्याची आज्ञा वरचवर मोडतो, यामुळे चाणक्यहि चद्रगुप्तावर रागावला आहे.

राक्षस—(हर्ष पावून) वाहवा, फार नामी झालें! जें हवें तेंच! तर मित्रा विराधगुप्ता, तूं ह्याच गारुड्याच्या वेषानें पुनः कुसुमपुरास जा तेथें माझा प्रिय मित्र स्तनकलश हा स्तुतिपाठकाच्या वेषानें राहत असतां त्याची भेट घे. व चाणक्य ज्या ज्या वेळीं चंद्रगुप्ताची आज्ञा मोडील, त्या त्या वेळीं त्या परस्परांमधलें वैर अधिक चेतेल अशा रीतीनें चंद्रगुप्ताची स्तुति करित जाण्याविषयीं मीं सांगितलें आहे म्हणून त्याला सांग, आणि जे कांहीं अधिकउणें वर्तमान होईल, तें अत्यंत गुप्तपणानें करभकाकडून वरचेवर आम्हास कळवित जा.

विराधगुप्त—ठीक आहे, आज्ञेप्रमाणें करतों.

[जातो.

(इतक्यांत प्रियंवदक प्रवेश करितो.)

प्रियंवदक—अमात्यांचा जयजयकार असो महाराज, शकटदास विनंति करित आहेत कीं, हे तीन दागिने विकावयास आले आहेत हे आपण पहावे. (दागिने पुढें ठेवितो)

राक्षस—(दागिने पाहून स्वगत) वाहवा! दागिने केवळ अमूल्य आहेत!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(उघड) अरे, जा आणि शकटदासाला सांग कीं, त्या मालधन्यास खुष करून त्यापासून दागिने विकत घ्यावे.

प्रियंवदक—आज्ञा महाराज.

[जातो.

राक्षस —(स्वगत) मीहि आतां जाऊन करभकाला कुसुमपुरास पाठवितों. (उभा राहून) त्या दुरात्म्या चाणक्यापासून चंद्रगुप्त फुटेल काय? अथवा झालें आमचें काम! संशय कशाला पाहिजे? कारण—

'आज्ञादायक मौर्य सर्वहि नृपालांतें असे जाहला,
राज्यप्राप्ति मदाश्रयें करुनियां झाली असे याजला;'
चाणक्यासहि गर्व यापरि असे, आतांच [1]लब्धांतरा
दोघांची कृतकृत्यताचि निपुणा पाडावया अंतरा.

[जातो

[दुसरा अंक समाप्त.]

---

१ जिला अवकाश फावला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

[स्थळ—चंद्रगुप्ताचा राजवाडा. कंचुकी प्रवेश करितो.]

कंचुकी—

पद.

तृष्णे तूं कां तृप्त न होशी, अजुनि किती तरी हांव धरीशी ?
जन्मवरी किती लोकांपाशीं, वाखाणिशि दैन्य ? १
[1]चक्षुःश्रोत्रत्वगादिकांनीं, [2]स्वस्वाविषय तुज ह्या पांचांनीं,
दावुनि वाढविलें बहु ज्यांनीं, अशक्त ते झाले. २
पांचांचीही शक्ति निमाली, विषयग्रहणीं कुंठित झाली,
अंगें [3]विकलें होऊनि गेलीं, परवश हीं सर्व. ३
शिरीं तुझ्या पद ठेवुनि आली, जरा, तिनें तुज वृथाचि केली,
तुझी प्रवृत्ति नसेचि धाली, तापचि पावशि तूं. ४

(इकडे तिकडे फिरून दुसऱ्याशीं बोलल्यासारखें दाखवून) अहो, ऐका हो ऐका, [4]सुगांग प्रासादावर जे तुह्मी अधिकारी लोक आहांत ते सर्व ऐका. सर्व लोकांनीं कुसुमपुरांत चंद्रिकोत्सव करावा आणि तो आपण पहावा अशी आपली इच्छा असल्याची चंद्रगुप्तमहाराज तुह्मां सर्वांनां आज्ञा करित आहेत. याकरितां सुगांग प्रासादावरील जागा बिछायती वगैरे टाकून सुशोभित कराव्या, ह्मणजे महाराज तेथें बसून नगरांतील चंद्रिकोत्सव पाहतील. (ऐकल्यासारखें करून) काय ? काय ह्मणतां ? चंद्रिकोत्सव बंद केला आहे हें महाराजांस विदित नाहीं कीं काय ? अरे, काय हें बोलतां ? मला तुमचीं शंभर वर्षें भरलींशीं वाटतात ! अरे, तुह्मा गरिबांला ह्या गोष्टी कशाला पाहिजेत? फुकट प्राणांस मुकाल ना बेटे हो ? तर मी सांगतों हें ऐकून निमूटपणें लौकर आपापल्या कामास लागा, अरे—

---

१ डोळे, कान, त्वचा, जिव्हा, आणि घ्राण ह्यांनीं. २ रूप, शब्द, स्पर्श, रस आणि गंध. ३ निर्बळ. ४ महालाचें नांव.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माळा बांधुनि, धूप देउनि, तसे स्तंभा बहु शोभवा,
टांगा मौक्तिक झालरी चहुंकडे, लावा मधें चांदवा;
ही सिंहासनधारणें जणु धरा झाली असे घावरी,
शिंपा चंदनमिश्रितोदक हिच्या अंगावरी सत्वरी. १

(कान देऊन ऐकलेंसें करून) हां, हे पहा आह्मी तयारीला लागतों असें ह्मणतां काय ? ठीक आहे, शावास! त्वरा करा, त्वरा करा. ही पहा चंद्रगुप्त महाराजांची स्वारी आलीच. जो हा—

अंगांनीं दृढ फार फार कठिण स्थानींहि जो नाचळे
त्या तातें गुरुभार जो उचलिला होता, तया स्वें वळें
घ्याया अल्पवयांत उद्यत, तरी शिक्षा जया पाहिजे,
वारंवार चुके खरा परि मनीं कृत्यें न लाजे निजें. १

(इतक्यांत 'महाराज, इकडून यावें.' असा पडद्यांत शब्द होतो व राजा आणि प्रतीहारी अशीं दोघें प्रवेश करितात.)

राजा—(स्वगत) राजधर्माप्रमाणें राज्य करणें ह्मणजे फारच दुःख आहे. पहा—

परार्थ साधावयास जातां स्वार्थ घडेना कांहीं,
जरि टाकावा स्वार्थ तरी तो यथार्थ नृपती नाहीं. १
अधिक स्वार्थाहुनि मानुनि जरि परार्थ केवळ जोडी,
परवशसंतोषाची कोणी असे घेतली गोडी? २

आणखी, राजे कितीहि दक्ष असले तरी त्यांस ही राज्यलक्ष्मी संभाळणें हें फार कठीण आहे. पहा—

क्रूरा त्रासे सदा जी, क्षणभरि मृदुचा[१] जी न घेईहि वारा,
मूर्खा पाण्यांत पाही, सुबुध[२] वर नसे जीस अत्यंत प्यारा,
शूरातें फार भी जी, बहुत करितसे भीरुची[३] जी टवाळी,
ऐशी श्री आणि वेश्या अति शठहृदया वश्य कोणा जहाली? १

मीं, गुरुजींशीं लटका कज्जा करून कांहीं दिवस स्वतंत्रतेनें वागावें आणि लोकांत माझा व त्यांचा अगदीं बिघाड झाला आहे असें दाखवावें, अशी खुद्द गुरुमहाराजांची मला आज्ञा झाली आहे, व ती आज्ञा मोठ्या नाखुषीनें मीं मान्यहि

१ नरम, गरीब. २ महा विद्वान. ३ भ्याड.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केली आहे. अथवा त्यांच्या शिक्षेनें सर्वकाळ वागणाऱ्या आह्मांला नेहमीं स्वातंत्र्यच आहे. कारण—

चाले सुमार्ग अवलंबुनि शिष्य जेव्हां,
नाहीं तयास गुरुचा प्रतिबंध तेव्हां;
सोडूनि सत्पथ जरी कुपथास जाई,
वारावया गुरु तया प्रतिबंध होई. १

संत स्वतंत्र विनयेंचि सदैव, त्यांस
नाहींच हेतु परतंत्र ह्मणावयास;
आह्मां तरी प्रिय असे परतंत्रता ही,
स्वातंत्र्य येउनि तयांत न अर्थ कांहीं ! २

(उघड) [1]वैहानरे, सुगांग प्रासादाकडे चल.

कंचुकी—आज्ञा महाराज, इकडून यावें. महाराज, हा सुगांग प्रासाद. हळुहळू महाराजांनीं वर चढावें.

राजा—(वर चढलेसें करून आणि चोहींकडे पाहून) अहाहा, कायहो ह्या शरदृतूची ही शोभा! आणि ह्या शोभेनें ह्या दिशा किती रमणीय दिसत आहेत! पहा, सांप्रतकाळीं—

लावणी.

शरत्समय हा रम्य पातला, जन हो सारे पहा !
आनंदप्रद पदार्थ येथें कितीक असती अहा !
[2]अखंडमंडल उदय पावतां [3]चंद्र, तया सन्मुख
जात असे ही रात्रिनायिका, पावुनि हृदयीं सुख.
[4]कुंकुमरागें तिलक मुखाला करुनी जणु नेसली
स्वच्छ चंद्रिका धवल वस्त्र हें ! आनंदें चालली.
नक्षत्रांच्या जाणों माला मुक्ताफलमालिका
लेवुनि अंगीं, त्वरित निघाली न घालितां चोलिका.
पतीकडे ही जाय ह्मणोनी उल्लासातें कशा
पावति हीच्या सखीच जाणों पहा पहा या दिशा !

---

१ भालदाराचें नांव. २ पूर्णमंडल; पक्षीं सपरिवार. ३ पक्षीं नायक. ४ संध्याकाळच्या रक्तवर्णानें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विकसित कमलें कुमुदें आणि नानापरिचीं फुलें,
पराग त्यांचा तोच अरगजा घेउनि तद्दतुफलें !
हें गगन जणु अमल रजताचें ताट तें,
त्यांत सुधारस मधु भरलेंसें वाटतें,
ज्यांस पीतां स्त्रीपुरुषप्रेम दाटतें,
हें भोतें भृंगीं संगीतक थाटतें,
ज्याला ऐकुनि विरहींचें मन फाटतें !
रम्य समय हा शृंगाराचा, यांतिल सर्वहि महा
बघुनि तरुणवयांचीं रसिकजनांचीं तृप्त इंद्रियें दहा. १
शरत्समय हा रम्य पातला, जन हो सारे पहा !
आनंदप्रद पदार्थ येथें कितीक असती अहा !

आणखी,

जलां उद्वृत्तांतें[1] ग्रहण उपदेशी स्वगतिचें[2],
उभ्या शालीतेंही स्वफलभरयोगें[3] विनतिचें[4];
हरी मोरांचाही विषसम अजीर्यन्मद[5]; अहा
शरत् जाणों सर्वां शिकवि विनयातें कशि पहा ! १

बहुवल्लभ प्रिय असे यास्तव हृदयांत कलुषिता[6] गंगा,
भर्त्याच्या विरहानें आली कृशता बहू जिच्या अंगा; १
तीतें प्रसन्न करुनी मार्गीं आणोनि रतिकथा चतुरा,
दूतीसमा शरत् ही सरिदीशा[7] मेळवी रसप्रचुरा[8]. २

(चोहोंकडे पाहिलेंसें करुन) अरे भालदार, हें काय रे ? ह्या नगरांत कोठेंहि चंद्रिकोत्सव दिसत नाहीं ! नगरांत सर्वांनीं चंद्रिकोत्सव करावा अशी माझी आज्ञा असल्याची ताकीद तूं सर्वांस केली होतीस ना ?

कंचुकी—होय महाराज, सर्वांस ताकीद केली होती.

राजा—वैहीनरे, तर मग लोकांनीं आमची आज्ञा मोडली काय ?

---

१ वाढलेलें; पक्षीं दुर्वृत्त. २ आपल्या गमनाचें; पक्षीं आपल्या वर्तणुकीचें. ३ फलभाराच्या संबंधानें. ४ नम्रतेचें. ५ न जिरणारा मद. ६ गढूळ; पक्षीं विमनस्क. ७ समुद्रास. ८ जलमय; पक्षीं शृंगाररसमय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कंचुकी—(कानांत बोटें घालून) शिव शिव, महाराज, हें काय अपूर्व ? ह्या सर्व पृथ्वीवर आजपर्यंत आपली आज्ञा कोणीं मोडली नाहीं, असें असून आपल्या नगरांतील लोकच आपली आज्ञा कशी मोडतील ?

राजा—तर मग नगरांत कोठेंच चंद्रिकोत्सव कां बरें दिसत नाहीं ?

हंस जसे वा गज जैसे वा धरुनी सुगमन भारी,
किमर्थ फिरति न रथ्यांमध्यें नटोनि वेश्यानारी ? १
निजाभिलाष प्रगट करोनी, चतुर धूर्त जन सारे,
रसिक कथेतें सांगत वेश्यांमागें न चलति कां रे ? २
रंग देउनी छतें लावुनी स्वमंदिरांच्या वरतें
स्त्रियांबरोबर सौधीं बैसुनि, करुनि लोकभय परतें; ३
परस्परांच्या चढोवढीनें सधन तरुण जे योग्य,
ते कां नकरिति कौमुद्युत्सव कामि जनां जो भोग्य ? ४

कंचुकी—होय महाराज, असेंच.

राजा—असेंच काय रे ?

कंचुकी—असेंच महाराज.

राजा—असेंच असेंच काय ह्मणतोस ? स्पष्ट सांग.

कंचुकी—महाराज, चंद्रिकोत्सव बंद केला आहे.

राजा—(रागावून) आं, कोणीं बंद केला ?

कंचुकी—महाराज, यापुढें सांगण्याची आमची शक्ति नाहीं !

राजा—सर्व जनांच्या नेत्रांस आनंदप्रद असा चंद्रिकोत्सव आर्य चाणक्यानें तर बंद केला नाहीं ना ?

कंचुकी—महाराज, ज्याला प्राणाची गरज आहे असा दुसरा कोणीहि आपली आज्ञा मोडण्यास समर्थ दिसत नाहीं!

राजा—(रागावून) शोणोत्तरे, क्षणभर बसावें असें मनांत आहे.

प्रतीहारी—महाराज, हें येथें सिंहासन आहे, ह्याजवर बसावें.

राजा—(सिंहासनावर बसून क्रोधयुक्त होऊन कंचुकीस) भालदार, चाणक्य भटजींची भेट घ्यावी असें मनांत आहे, तर त्यांनां बोलावून आण.

कंचुकी—आज्ञा महाराज.

[जातो.

---

१ रस्त्यांत. २ गच्चीवर. ३ चंद्रिकोत्सव. ४ द्वारपालिकेचें नांव.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवेश २ रा.

[**स्थळ**—चाणक्याचें घर. चाणक्य सचिंत मुद्रेनें आसनावर बसला आहे, असा प्रवेश.]

चाणक्य—(स्वगत) तो दुरात्मा राक्षस माझ्यावरोबर स्पर्धा करित आहे काय ? त्याला वाटत असेल कीं—

'चाणक्याचा अपमान, होतांचि तो नगरांतून,
भुजगापरी फूंफूं करून, निघोनि गेला बाहेरी. १
त्यानें मारून नंदास, राज्यीं स्थापिलें वृषलास,
तसा मीही त्या नीचास, मारोनि राज्य हरीन.' २
ऐशी कुमति धरोनि मनीं, अधिक माझ्या बुद्धीहुनी
प्रभाव दावावा ह्मणोनी, यत्न करी सर्वथा. ३

(वर पाहून प्रत्यक्ष बोलल्याप्रमाणें दाखवून) अरे राक्षसा, पहा पहा, तूं हा व्यर्थ व्यापार सोड; पहा—

दुर्मंत्र्यावरि सोंपुनि राज्याचा भार जो स्वयें निसुर,
तो हा नंद नव्हे रे, सन्मंत्री चंद्रगुप्त नयचतुर. १
चाणक्यहि तूं नसशी, कोण्या धर्में बरोबरी करिशी ?
माझें साम्य कराया, व्यर्थचि हें वैर मात्र तूं धरिशी! २

(विचार करून) अथवा मीं ह्या गोष्टीची फारशी काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. कारण—

केला पर्वतपुत्र किंकरजनीं संव्याप्त[1] भेदें[2], चर
सिद्धार्थादि नियुक्त सिद्धिविषयीं होती बहु तत्पर;
मौर्याशीं कपटप्रयुक्तकलहें भेदीन मी राक्षसा,
आहे कोण रिपुप्रभेदनिं दुजा माझ्यापुढें दक्षसा ? १

(इतक्यांत कंचुकी येतो.)

कंचुकी—(स्वगत) दुसऱ्याची सेवा करणें ह्यांत निरंतर कष्टच आहेत; कारण—

आधीं राजांस भ्यावें, मग नृपसचिवां, किंकरां भीत जावें,
[3]तत्प्रेमस्थां विटांही भिउनि परिजनां सेवकानें झिजावें,
पोटासाठीं मुखातें पसरुनि शुनकातुल्य दैन्यें वसावें
स्वामिद्वारीं, तयानें हडहड करितांही तया न त्यजावें ! १

---

१ अत्यंत व्यापिला. २ फितुरीनें. ३ राजाच्या प्रेमांतील जारांस.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(इकडे तिकडे फिरून पुढें पाहून) हें चाणक्य भटजींचें घर, चला आंत जावें. (आंत जाऊन पाहून) वाहवा, सार्वभौमाचा प्रधान असून केवढी पण ह्याची संपत्ति! पहा—

फोडावया कठिण [1]गोमयगोलकांतें
पाषाण हा सुबटुंनीं अणिला स्वहातें;
हे दर्भपुंज लवले समिधाभरानें,
हें झोपडें, उगवलीं बहु ज्यांत रानें ! १

इतका मोठा चंद्रगुप्त राजा असून त्याला हा चाणक्य वृषल, वृषल असें ह्मणत असतो, हें योग्य आहे. कारण, हा तसाच निस्पृह आहे—

विद्यासागर, फार थोर, कधिही मिथ्या न जे बोलती,
तेही नित्य उठूनियां गुण नृपीं खोटेहि वाखाणिती;
दैन्याचें घर एक लोभ, फल हें त्याचें असे; अन्यथा
राजाही तृणसा तया गमतसे निर्लोभ जो सर्वथा. १

(पुढें पाहून व दचकून) अरे, हा महात्मा चाणक्य येथेंच बसला आहे, जो हा—

पाडोनियां सकल लोक [2]विमोहजाळीं,
[3]नंदास्त आणि वृषलोदय एक काळीं
साधून, टाकित असे [4]निजनीतिमार्गें
[5]पर्यायपातितहिमोष्णरवीस मार्गें. १

(जमिनीवर गुडघे टेकून) भटजी महाराजांचा जयजयकार असो.

चाणक्य—(पाहिलेंसें करून) वैहीनरे, कां येणें झालें ?

कंचुकी—भटजी महाराज, ज्यांचें चरणकमलयुग्म नमस्कारासाठीं त्वरेनें पुढें पुढें येणाऱ्या राजांच्या मुकुटमणीकिरणांनीं आरक्त होत आहे, असे जे चंद्रगुप्त महाराज, त्यांनीं अत्यंत नम्रपणें विनंति केली आहे कीं, वेळ असल्यास आपल्याला एक वेळ दर्शनाचा लाभ द्यावा.

चाणक्य—हं हं, त्या वृषलाच्या मनांत माझी भेट घ्यावयाची आहे काय ? बरें, पण वैहीनरे, मीं चंद्रिकोत्सव बंद केला आहे तें त्याच्या कानांवर गेलें कीं काय ?

---

१ वाळलेले शेणाचे गोळे. २ अत्यंत मोह हेंच जाळें. ३ नंदाचा अस्त. ४ आपल्या नीतिमार्गानें. ५ जो अनुक्रमेंकरून थंडी आणि उष्ण हीं पाडतो अशा सूर्यास.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कंचुकी—होय महाराज, असेंच असेल.

चाणक्य—(रागावून) आं, त्याला हें कोणीं सांगितलें रे?

कंचुकी—(भयानें कांपत कांपत) महाराज, रागावूं नये. आज सरकारस्वारी जातीनें सुगांग प्रासादावर गेली होती; त्यावरून नगरांत चंद्रिकोत्सव कोठें चालू नाहीं हें महाराजांनीं स्वतःच पाहिलें; दुसऱ्या कोणीं सांगितलें नाहीं.

चाणक्य—हां समजलों, सांगणारे दुसरे कोण? तुह्मींच! मी नाहीं, अशी संधि पाहून त्याचे कान भरून त्याला संतापविलें आहे. कायहो, हा राजसेवकांचा चाणक्यावर द्वेष! वैहीनरे, तो वृषल कोठें बसला आहे रे?

कंचुकी—(भीत भीत) महाराज सुगांग प्रासादावर बसले आहेत. त्यांनीं तेथूनच मला पाठविलें आहे.

चाणक्य—(उठून उभा राहून) वैहीनरे, सुगांग प्रासादाकडे चल.

[जातात.

प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—सुगांग प्रासाद. कंचुकी व चाणक्य प्रवेश करितात.]

कंचुकी—इकडून यावें भटजी महाराज. (इकडे तिकडे फिरतात.) महाराज, हा सुगांग प्रासाद, याजवर हळुहळू चढावें.

चाणक्य—(वर चढून हर्षानें स्वगत) वृषल सिंहासनावर बसला आहे!

पाहति न राजवृत्ता, गेले ते मत्त नंद विलयास,
त्याचें राज्य मिळालें पराक्रमी दक्ष चंद्रगुप्तास. १
सिंहासनाहि झाला बहुकाळें संग योग्य राजाचा,
या तीन बघुनि गोष्टी मम हृदयीं हर्षपूर ये साचा. २

(जवळ जाऊन) वृषला, तुझा विजय असो.

राजा—(सिंहासनाखालीं उतरून चाणक्याचे पाय धरून) भटजी महाराज, मी चरणांप्रत वंदन करतों.

चाणक्य—(राजाच्या मस्तकावर हात ठेवून) वत्सा, ऊठ ऊठ. अरे—

हिमाचलापासुनि दक्षिणार्णवा-
पर्यंत सारे नृपती, गुणार्णवा!
स्वमौलिरत्नांशुभरें तुझ्या या
करोत आरक्त सदैव पाया. १

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजा—भटजी महाराज, ह्या गोष्टीची आशा करण्याची गरज राहिली नाहीं. आपल्या कृपेनें मी आतांच या आशीर्वादाच्या फळाचा अनुभव घेत आहें. आपण आसनावर बसावें. (चाणक्य आणि राजा दोघे यथायोग्य आसनावर बसतात.)

चाणक्य—वृषला, आह्मांला कां बोलाविलें ?

राजा—महाराज, आपल्या दर्शनानें ह्या नेत्रांस कृतार्थ करण्यासाठीं.

चाणक्य—(थोडेंसें हंसून) वृषला, आतां हा विनय पुरे! प्रभू अधिकाऱ्यास कामाशिवाय बोलावित नाहींत; तर खरें सांग, कां बोलाविलें तें ?

राजा—आपण चंद्रिकोत्सव कोणत्या प्रयोजनानें बंद केला ?

चाणक्य—वृषला, तर मग फजीत करण्यासाठीं बोलाविलें, असें कां ह्मणेनास!

राजा—शिवशिव ! महाराज, फजीत करण्यासाठीं नाहीं बोलाविलें.

चाणक्य—तर मग कशासाठीं ?

राजा—विनंति करण्यासाठीं.

चाणक्य—असें जर आहे, तर ज्यांस विनंति करावयाची त्या गुरूंची मर्जी शिष्यांनीं मोडूं नये !

राजा—होय महाराज, खरें आहे; परंतु आपली मर्जी निष्प्रयोजन कधींहि असत नाहीं. यास्तव आह्मांला प्रश्न करण्यास जागा आहे.

चाणक्य—वृषला, खरें बोललास; असेंच आहे. हा चाणक्य निष्प्रयोजन व्यापार स्वप्नांतहि करित नसतो.

राजा—महाराज, ह्मणूनच मला चंद्रिकोत्सव बंद करण्याचें प्रयोजन ऐकण्याची इच्छा आहे ?

चाणक्य—वृषला, तर मग ऐक. सिद्धि तीन प्रकारची आहे, असें राजनीतींत सांगितलें आहे. एक राजाधीनसिद्धि, दुसरी सचिवाधीनसिद्धि, आणि तिसरी उभयाधीनसिद्धि. तेव्हां तुझी सिद्धि सचिवाधीन आहे, यास्तव प्रयोजनाचा शोध करून वाणीला आणि मनाला त्रास देण्यापासून तुला कोणतें फळ ? राज्यकारभार आमच्या शिरावर आहे व आह्मी जें जें करतों तें तें प्रयोजन योजूनच करित असतों; तूं खुशाल बसून ऐषआरामाचें सुख भोगावें ह्मणजे झालें. नसत्या खटपटींत आपलें मन कशाला घालतोस ?

(राजा रागावल्यासारखें करून चाणक्याकडून तोंड फिरवितो. इतक्यांत पडद्यामध्यें स्तुतिपाठक स्तुति करितात).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पहिला स्तुतिपाठक—

हीं शुभ्रें काशभस्में गगन करितसे लिप्त चंद्रांशुपातें,
मेघातें, हस्तिचर्मोपरि बहु मलिना, देतसे आर्द्रतेतें;
ज्योत्स्नाकापालमाला धरि अति धवला जी शरत् हासहंसा
युष्मत्क्लेशांस वारो शिवतनुसम ही, शुभ्रचंद्रावतंसा. १

आणखी,

पद.

करि जी निमिषानें सृष्टि, राखो तुह्मा हरिदृष्टि. । ध्रु० ।
मृदुमृदु शेषाच्या शयनीं, गिरद्या फणाचक्र करुनी,
मंदक्षीरोदधिपवनीं, येतां निद्रा बहु नयनीं,
जीनें केली विश्वतुष्टि, राखो तुह्मा हरिदृष्टि. १
भुवनीं साधुतापशमन व्हावें ह्मणुनि कमलनयन
जागृत होतां दचकून, झाले रक्तवर्ण नयन,
जृंभा देतां बहुत कष्टी, राखो तुह्मा हरिदृष्टि. २
जागृति होतां क्षण एक, वारंवार उघडझांक
करितां जींतुनि ये उदक, जीचा दुष्टां बहु धाक,
शिष्टां देते बहुत पुष्टी, राखो तुह्मा हरिदृष्टि. ३
भोतीं रत्नदीप जळती, त्यांची देखुनियां ज्योति,
दिपतां नेत्रांचीं पातीं, उघडावया यत्न करिती,
देई स्वजनातें हृष्टि, राखो तुह्मा हरिदृष्टि. ४

दुसरा स्तुतिपाठक—

उत्कर्षाचे जणों का निधिच घडविले ज्यांस पद्मोद्भवानें,
गंडांतें फोडुनीयां समदकरिवरां जिंकिती जे बळानें,
ते दंष्ट्राभंग जैसे प्रबल मृगपती ना कधीं साहताती,
स्वाज्ञाभंगें तसेची नृपवरहि तुझ्यासारखे कोपताती. १

---

१ काशनामक गवताचे पांढरे तुरे तेंच कोणी भस्म, त्यानें. २ चंद्रकिरण पाडून. ३ ओलेपणा. ४ चंद्रिका हीच कपालमाला. ५ हंसपक्षी हेंच जिचें हास्य. ६ तुमच्या क्लेशांस. ७ शुद्ध चंद्र हेंच जिचें भूषण. ८ जांभई. ९ हर्ष.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणखी,

वस्त्रालंकारांनीं प्रभुचें प्रभुपण कधींहि नच साजे,
त्वत्तुल्य जो तया प्रभु ह्मणति यदाज्ञा जगीं सदा गाजे.१

चाणक्य—(ऐकून स्वगत) ह्या स्तुतिपाठकांनीं जी स्तुति केली, तींत अगोदर देवाची स्तुति आणि शरदृतूचें वर्णन व तद्गर्भ आशीर्वादवचन आहे. पुढें हें दुसरें काय तें कळत नाहीं! (विचार करून) हां, समजलें ! हें कृत्य राक्षसाचें आहे. अरे दुष्टा राक्षसा, समजलें तुझें कपट ! पण हा कौटिल्य निजला नाहीं, जागा आहे बरें !

राजा—वैहीनरे, ह्या दोघां स्तुतिपाठकांस सहस्र मोहरा बक्षीस दे.

कंचुकी—होय महाराज. (उठून जाऊं लागतो).

चाणक्य—(क्रोधयुक्त होऊन) वैहीनरे, थांब, जाऊं नको. (राजास) वृषला, अरे वृषला, भलत्याच वेळीं पाहिजे तितकें द्रव्य उधळतोस, हें रे काय ?

राजा—हें काय बाबा ? तुह्मीं जेथें तेथें माझा असा प्रतिबंध करितां, ह्यावरून मला हें राज्य केवळ बंदीखान्यासारखें झालें आहे, हें वास्तविक राज्य नव्हे !

चाणक्य—वृषला, जे राजे स्वतः कारभार पाहत नसतात त्यांस निरंतर दुसऱ्याच्या प्रतिबंधांत वागावें लागतें हें खरें; तर तुला जर दुसऱ्याचा प्रतिबंध सोसत नसेल तर आजपासून तूं आपलें काम आपणच पहात जा, ह्मणजे झालें.

राजा—हं हं, असें आहे काय ? बरें तर, फार चांगलें! अतःपर आमचें काम आह्मीच पाहूं !

चाणक्य—बरें झालें, पीडा चुकली! आह्मालाहि आमचीं कामें पुष्कळ आहेत!

राजा—बरें, असें झालें तरी चिंता नाहीं; परंतु चंद्रिकोत्सव बंद करण्याचें प्रयोजन समजलें पाहिजे ?

चाणक्य—वृषला, चंद्रिकोत्सव करण्याचें तरी प्रयोजन काय, हें पहिल्यानें आह्मांला समजलें पाहिजे.

राजा—(उपरोधपूर्वक) आह्मीं आज्ञा करावी आणि लोकांनीं ती ऐकूं नये, हें पहिलें प्रयोजन !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चाणक्य—वृषला, तुझी आज्ञा मोडावी हेंच मीं चंद्रिकोत्सव बंद करण्याचें प्रथम प्रयोजन; कां ह्मणशील तर ऐक--

ज्यांची [1]वेला [2]तमालप्रभवकिसलयें श्याम, नक्रादिकांनीं
यत्तीरें [3]क्षुब्ध होतां ध्वनि कठिण करी त्रास अत्यंत कानीं;
त्या चारी अब्धिपर्यंतहि नृप शिरसा मानिती जी त्वदाज्ञा,
ती मीं मोडोनि केला विनय जगिं तुझा सर्व विख्यात सुज्ञा! १

राजा--बरें, दुसरें प्रयोजन कोणतें?

चाणक्य--तेंहि सांगतों. (प्रतीहारीस) शोणोत्तरे, त्या कायस्थजातीच्या अचल दूतास जाऊन सांग कीं, भद्रभटादिकांचें जें पत्र आलें आहे तें पाहिजे.

प्रतीहारी—आज्ञा महाराज. (कांहीं वेळानें परत येऊन) महाराज, हें पत्र आणलें आहे, हें घ्यावें.

चाणक्य--(पत्र घेऊन) वृषला, ऐक.

राजा— हं, ऐकतों, वाचावें.

चाणक्य--(पत्र वाचतो) " ज्याचें नाम सर्वत्र विख्यात आहे असा जो चंद्रगुप्तराजा, यास;-त्याचे सरदार, हत्तीखान्यावरील भद्रभट, घोड्यांच्या पागेवरील पुरुदत्त, सर्व द्वारपाळांचा नायक जो चंद्रसेन त्याचा भाचा हिंगुरात, महाराजांचा नातलग महाराज बलगुप्त, महाराजांचा कुमारसेवक राजसेन, सिंहबल नांवाचा जो सेनापति त्याचा कनिष्ठ बंधु भागुरायण, मालव राजाचा पुत्र लोहिताक्ष, आणि क्षत्रगणांत मुख्य विजयवर्मा हे सारे कळवितात कीं, आह्मी आपणाकडून निघून मलयकेतूला मिळालों— "

राजा--भटजी महाराज, यांचें मन आम्हापासून उडावयाचें कारण काय, तें कळवावें.

चाणक्य--वृषला, ठीक आहे, ऐकावें. ह्या मंडळीपैकीं भद्रभट नांवाचा गजाध्यक्ष आणि पुरुदत्त नांवाचा अश्वाध्यक्ष हे दोघे स्त्रिया, दारू आणि शिकार ह्यांच्या व्यसनांत गर्क होऊन, हत्ती घोडे ह्यांजवर दृष्टि ठेवीनातसे झाले; ह्यांमुळें त्यांनां त्यांच्या अधिकारावरून काढून पोटापुरता पगार देऊन ठेविलें होतें. ह्मणून ते रागावून मलयकेतूला जाऊन मिळाले. त्यांनां त्यांचा त्यांचा अधिकार देऊन मलयकेतूनें आपल्याजवळ ठेविलें आहे. हिंगुरात आणि बलगुप्त हे दोघे फार लोभी

१ मर्यादा. २ ताडवृक्षांच्या पल्लवांनीं. ३ खळबळलीं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असल्यामुळें आह्मांकडील पगार त्यांनां फार थोडा वाटूं लागला, व पूर्वी देऊं केलेलें दिलें, तथापि त्यांचा संतोष होईना. त्यामुळें अधिक लाभाच्या आशेनें येथून निघून ते मलयकेतूजवळ राहिले आहेत. तुझा कुमारसेवक जो राजसेन, त्याला तुझ्या कृपेमुळें अकस्मात हत्ती घोडे इत्यादि ऐश्वर्य मिळालें, त्यामुळें त्याला असा धाक पडला कीं, हें ऐश्वर्य आपणास एकाएकीं मिळालें, हें कदाचित् आपल्याजवळून जाईल; आणि त्या धाकानें तो मलयकेतूला जाऊन मिळाला. सिंहदत्त नामक सेनापतीचा कनिष्ठ भ्राता जो भागुरायण, त्याचें पूर्वीपासून पर्वतक राजाशीं सख्य झालें होतें; त्यामुळें त्यानें पर्वतकाचा पुत्र जो मलयकेतु याला 'तुझ्या पित्याला चाणक्यानें मारविलें' असें एकांतीं सांगून पळवून लाविलें. पुढें नंदनदासादिक तुझा द्रोह करणारांस पकडलें व शिक्षा केली. तेव्हां 'आपण अपराधी आहों, यामुळें आपलीहि अशीच व्यवस्था होईल' या भीतीनें भागुरायण येथून निघून मलयकेतूकडे गेला. 'या भागुरायणानें आपले प्राण वांचविले, आणि हा आपल्या पित्याचाहि परम मित्र होता.' असें समजून मलयकेतूनेंहि आपली प्रधानगिरी त्याला दिली. आतां लोहिताक्ष आणि विजयवर्मा हे दोघे मोठे गर्विष्ठ आहेत. तूं आपल्या नातलगांस पुष्कळ द्रव्य दिलें, हें त्यांनां सहन झालें नाहीं, ह्मणून ते मलयकेतूकडे गेले. या कारणांनीं त्यांचीं मनें इकडून उडालीं, समजलास ?

राजा—भटजी, ह्या सर्वांची आह्मावर अप्रीति होण्याचीं कारणें ठाऊक असतां, तुह्मीं त्या गोष्टीचा प्रतिकार लवकर कां केला नाहीं ?

चाणक्य—वृषला, प्रतिकार करतां येईना.

राजा—सुचेना ह्मणून, अगर तो करण्यास खरोखर कांहीं अडचण होती?

चाणक्य—प्रतिकार असल्यास सुचणार कसा नाहीं ? तो करण्यास खरोखरीच अडचणी होत्या.

राजा—हं, तर मग त्या अडचणी कोणत्या, तें समजलें पाहिजे.

चाणक्य—वृषला, ऐक. राजाशीं प्रजा बिघडल्या असतां त्यावर दोन उपाय आहेत. अनुग्रह किंवा निग्रह. अनुग्रह करणें ह्मणजे भद्रभट आणि पुरुदत्त यांचा पूर्वी काढलेला अधिकार त्यांनां दिला पाहिजे. पण तशा व्यसनी पुरुषांस पुन्हा अधिकार द्यावा, तर ज्यांच्या योगानें सर्व राज्यास मुख्य वळकटी, अशा सर्व हत्ती घोड्यांची माती व्हावयाची! ह्मणून तसें केलें नाहीं. हिंगुरात आणि बलगुप्त ह्यांचा स्वभाव अति लोभी, ह्यामुळें सर्व राज्य जरी दिलें तरी त्यांचा संतोष होणें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कठीण. ह्यामुळें त्यांच्यावर अनुग्रह करणें अशक्य होय. राजसेन आणि भागुरायण ह्या दोघांपैकीं एकास आपली संपत्ति जाण्याचा व दुसऱ्यास आपला जीव जाण्याचा पराकाष्ठेचा धाक पडला होता, तेव्हां ते येथें कसे राहतील ? आतां लोहिताक्ष आणि विजयवर्मा यांनां, त्यांच्या बंधुजनांचा पुष्कळ द्रव्य देऊन तूं मान केलास तो न साहून राग आला, आणि आह्मीं त्यांचा कितीहि मान केला तरी तो ते अपमानच मानूं लागले, तेव्हां असल्या अत्यंत अभिमानी पुरुषांचा संतोष कोठून होणार ? अशा कारणांवरून अनुग्रह पक्ष उपयोगी नव्हता, हें उघड आहे. आतां निग्रह करावा, तर तोहि करतां येईना. कारण, आह्मांला नुकतेंच नंदाचें राज्य मिळालें आहे, तें राज्य मिळवण्यास जे मुख्यत्वें आह्मांला उपयोगीं पडले, त्यांनां इतक्यांतच आह्मी तीव्र शिक्षा करूं लागल्यास नंदाच्या घराण्यावर प्रीति ठेवणाऱ्या प्रजांचा आमच्यावरून विश्वास उडेल. ह्याप्रमाणें सांप्रत आपल्या पक्षांतील लोक मलयकेतूला मिळाले आहेत, आणि तो तर पित्याच्या वधानें अत्यंत रुष्ट झाला आहे. तसेंच, त्याच्या कुमकीला म्लेंछ राजाचें सैन्य मिळालें आहे, आणि तो निरंतर राक्षसाच्या मसलतीनें वागत आहे. तेव्हां जबरदस्त शत्रु आपल्या नगरावर चाल करण्याच्या बेतांत असतां, फौजेची तयारी करण्याचा, शहराची बंदोबस्ती वाढविण्याचा, युद्धसामग्री सिद्ध आहे कीं नाहीं हें पाहण्याचा हा प्रसंग होय. ख्यालीखुशाली करण्याचा व मौज मारण्याचा नव्हे, ह्मणून आह्मी चंद्रिकोत्सव बंद केला.

राजा—भटजी, ह्याविषयीं माझ्या मनांत आपणास आणखी पुष्कळ विचारावयाचें आहे.

चाणक्य—वृषला, खुशाल विचार. माझ्याहि मनांत तुला आणखी पुष्कळ सांगावयाचें आहे.

राजा—भटजी, आमच्या सर्व प्रकारच्या या संकटांस कारण जो मलयकेतु, तो जेव्हां येथून जाऊं लागला तेव्हां तुह्मीं त्याची उपेक्षा कां केली ?

चाणक्य—अरे वृषला, मलयकेतूची उपेक्षा न करतों, तर दोहोंतून एक करावें लागतें. एक अनुग्रह किंवा दुसरा निग्रह. त्यांतून अनुग्रह करतों, तर पूर्वी त्याच्या बापाला देऊं केलेलें अर्धें राज्य द्यावें लागतें. बरें, निग्रह करतों, तर अर्धें राज्य द्यावें लागेल ह्मणून आह्मीं त्याच्या पित्याला मारलें, असा लोकापवाद आपल्या हातानें करून घ्यावा लागता. बरें मलयकेतूला पूर्वसंकेताप्रमाणें अर्ध राज्य देतों

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर पर्वतकाला मारण्याचें फल काय होतें? केवळ कृतघ्नताच पदरीं येती कीं नाहीं? या सर्व विचारावरून मलयकेतूस येथून जाऊं दिलें, समजलास?

राजा—भटजी, मलयकेतूला जाऊं देण्याचें हें कारण झालें. पण राक्षसहि ह्या नगरांतच होता. तो जाऊं लागला तेव्हां त्यांचीहि उपेक्षा आपण कां केली, ह्याचें कारण काय वरें सांगतां?

चाणक्य—पूर्वीच्या राजावर राक्षसाचें अत्यंत प्रेम असे ह्मणून, व पुष्कळ काळ एकत्र सहवास असल्याकारणानें ह्या नगरांत त्या नंदाच्या घराण्यास चाहणाऱ्या प्रजेचा त्याच्यावर अत्यंत विश्वास आहे. तसेंच, तो मोठा मसलती व पराक्रमी असून या ठिकाणीं मित्रवळ व द्रव्यवळहि त्याला अनुकूळ होतें. तेव्हां जर आह्मीं त्याला नगरांतच राहूं दिलें असतें, तर तो उगाच वसला नसता; प्रजेंत मोठा भयंकर फंदफितुर कांहींतरी करता. आतां, वाहेरूनहि तो उपद्रव करील, तरी त्या उपद्रवाचें निवारण करणें अशक्य नाहीं; असें समजून त्याला नगरांतून वाहेर जाऊं दिलें.

राजा—राक्षस इतका उपद्रव करील असें आपणास वाटलें होतें, तर तो नगरांत होता तेव्हांच याविषयीं इलाज कां नाहीं केला?

चाणक्य—इलाज केला नाहीं तर काय? इलाज करूनच, जसें हृदयांतून शल्य उपटून काढावें, तसें त्या राक्षसाला नगरांतून वाहेर काढून दिलें; व त्याला दूर करण्याचें प्रयोजन तुला पूर्वींच सांगितलें आहे.

राजा—पण त्याला जवरीनें धरून कैद कां केलें नाहीं?

चाणक्य—वृषला, तो नांवाचा राक्षस आहे, त्याच्यावर जवरी चालविली असती तर तो आपण तरी मरून गेला असता, किंवा तुमच्या सैन्याची तरी खरावी करता. आणि तसें झालें असतें तर दोहींकडून वाईटच होतें. पहा—

झुंजोनी, धरण्यास यत्न करितां, जातां मरोनी रणीं
तूं कीं तो मुकता शिवीरवर जो नीतिज्ञ चूडामणी;
तेंही नीट न, तो जरी [1]निदळिता सेनापती आपले,
घ्यावें युक्तिवळेंच आकळुनियां त्यातें असे हें भलें. १

[1] मारता.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजा--भटजी, आपल्याशीं बोलून आमचा टिकाव लागणार नाहीं. माझ्या बुद्धीनें असें वाटतें कीं, अमात्यराक्षस हा तारीफ करण्यासारखा पुरुष खरा!

चाणक्य--(रागावून) तो तारीफकरण्यासारखा, ह्मणजे 'तुह्मीं तसे नव्हां' हाच तुझ्या बोलण्याचा भाव कीं नाहीं? त्या राक्षसानें तारीफ करण्याजोगें कोणतें कृत्य केलेंरे?

राजा--आपल्याला आठवत नसल्यास सांगतों, ऐकावें. त्या पराक्रमी पुरुषानें हीं कृत्यें केलीं, कीं--

पुरी करोनि वश्य, पाय आमुच्या शिरावरी
धरोनि, राहिला इथें तयास इष्ट जोंवरी;
जयीं जयप्रघोष सैन्य आमुचें करावया
प्रवृत्त जाहलें, तयीं जयें निवारिलें तया. १
वदोनि काय फार! नीति योजुनी सुलक्षणीं,
असा मतीस आमुच्या विमोहितो प्रतिक्षणीं;
करूनि टाकि कीं अह्मां स्वकीय आणि दूसरा,
न ओळखे कळेहिना असेल कोणता खरा! २

चाणक्य--(हंसून) वृषला, राक्षसानें तारीफ करण्याजोगें जें कृत्य केलें, तें हेंच काय?

राजा--होय, अमात्यराक्षसानें हेंच कृत्य केलें. हें काय लहान झालें?

चाणक्य--वृषला, मला तर असें वाटलें होतें कीं, जसें नंदाप्रमाणें तुला समूळ उपडून टाकून तुझ्याप्रमाणें राज्यपदावर त्यानें मलयकेतूलाच बसविलें!

राजा--भटजी, हें खोंचून बोलणें कशाला पाहिजे? नंदराज्यावर मी बसलों, याचें यश दुसऱ्याकडेच आहे! त्यांत आपण काय केलें?

चाणक्य--अरे, कृतघ्ना--

पद.

मूर्खा! विस्मृति तुज कैशी? राज्यमदें भुललाशी.।ध्रु०।
कोपावेशें विषमांगुलिनीं शिखा सोडिली काळी,
नंदकुळाच्या प्राणवायुला सर्पिण झाली काळी. १
चित्तीं उठतां खवळुनि उज्ज्वळ कोपानळ, मीं केला
'समूळ उपडिन नंदकुळातें' पण, तो सिद्धिस नेला. २

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुवर्ण कोटी नव्याण्णवही होत्या नंदापाशीं,
तथापि त्यांतें कोणीं वद रे! घातियलें यमपाशीं? ३
राक्षस पाहत असतां सवळहि नंदपशू परि सारे
मारुनि, तत्पद तुजला दिधलें; विसरलाशि कैसा रे! ४

मूर्खा विस्मृति तुज कैशी? राज्यमदें भुललाशी.
नंदांचे [1]चैत्य अग्नी, गळुनि [2]वहु वेसा, पेटले जे तयांची
शांती अद्यापि नाहीं; [3]पितृवनवसतिप्राणियां [4]तुष्टि यांची;
धूमें दिग्मंडलातें करिति [5]सघनसें झांकिती सूर्यकांती;
पाहें, गृध्र स्वपक्षें वलय करुनियां आणिती फार खंती. १

राजा—अहो भटजी, हें सारें कृत्य दुसऱ्यानेंच केलें आहे!

चाणक्य—दुसऱ्या कोणीं केलेंरे?

राजा—नंदकुलास विपरीत झालेलें जें दैव, त्यानें!

चाणक्य—वृषला, जे मूर्ख असतात तेच दैवावर भंरवसा ठेवितात!

राजा—भटजी, जे विद्वान् असतात तेहि स्वस्तुति करित नसतात!

चाणक्य—(क्रोधयुक्त झाल्यासारखें दाखवून) वृषला, अरे वृषला, मला चाकरासारखें मानून माझ्या डोक्यावर बसावयास पाहतोस काय?

माझ्या [6]वद्धशिखेस हात अणखी सोडावया धावतो!

(भूमीवर पाय हापटून)

तैसा पायहि हा पुन्हा पण करायाला पुढें चालतो!
नंदप्राणविनाशनें शमित जो क्रोधाग्नि माझा, तया
मूर्खा! पेटवुनी पुन्हा यमगृहीं जाशी कसा दुर्नया? १

राजा—(भिऊन स्वगत) अरे, भटजी महाराजांस खरोखरीच कोप आला वाटतें!

[7]संरंभस्तब्धपक्ष्मांतुनि जळ गळतां [8]क्षालिता दृष्टि झाली,
क्रोधें [9]भ्रूभंगधूमें धगधगुनि पुन्हा जीस अत्यंत लाली

---

१ चितासंबंधी. २ अस्थिगततैल. ३ स्मशानांतील प्राण्यांस. ४ संतोष. ५ मेघांनीं आच्छादिलेल्या सारखें. ६ बांधलेल्या शेंडीस. ७आवेशानें स्तब्ध झालेल्या पापण्यांतून. ८ धुऊन गेलेली. ९ उर्ध्व केलेली भ्रकुटि हाच धूम.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आली, [1]रौद्रप्रकाराभिनयकरशिवोत्तांडवाच्या स्मृतीनें
याचा हा पादघात क्षणभरि धरिला संकटें ह्या क्षितीनें. १

चाणक्य—(कृत्रिम कोप आटोपून) वृषला, पुरेपुरे, उगेंच बोलण्यानें बोलणें वाढवून काय फळ आहे? जर आह्मांहून तुला तो राक्षस चांगला वाटत असेल, तर आह्मीं हें शस्त्र ठेविलें, हें घेऊन त्यालाच दे, ह्मणजे झालें. (शस्त्र पुढें टाकून, उठून, प्रत्यक्ष एखाद्याशीं बोलल्याप्रमाणें वर तोंड करून, स्वगत) अरे गुलामा राक्षसा! तूं ह्या चाणक्याच्या बुद्धीचा जय करून आपली बुद्धि चालविण्याचा उपाय मांडिला आहेस काय?

चाणक्यभक्ती सुटतांचि सौख्यें
जिंकीन मौर्यांस; ह्मणोनि मौर्ख्यें
त्वां योजिला जो कुमते! उपाय,
तुलाच तो देइल रे अपाय. १

[जातो.

राजा—वैहीनरे, सर्व प्रजेस कळवावें कीं, आजपासून चाणक्याला कार...रा-वरून दूर करून राजा सर्व कारभार आपण स्वतःच पाहणार आहे!

कंचुकी—(स्वगत) काय, गुरु वगैरे मानाचें उपपद न लावतां नुसतें चाणक्य असें एकेरीच महाराज बोलले, यावरून खरोखरच चाणक्याचा अधिकार काढला असें वाटतें! अथवा महाराजांकडे यांत काय दोष आहे—

नृपति अनादर करितो जैं सचिवाचाचि दोष तो जाणा;
माहुत सावध नसतां गज घे व्यालत्व पावुनी, प्राणा. १

राजा—वैहीनरे, विचार कशाचा करतोस?

कंचुकी—महाराज, विचार कांहीं करित नाहीं. महाराजांचा पराधीनपणा सुटून खरें राजेपण आलें हें फार चांगलें झालें.

राजा—(स्वगत) भटजी महाराजांनीं आमचा आणि त्यांचा विघाड झाला असें ज्या कार्यासाठीं दाखविलें, तें कार्य सिद्धीस जावो ह्मणजे झालें. मग दोन दिवस त्यांचा आमचा विघाड झाला आहे असें लोकांत दिसलें तरी चिंता नाहीं, (उघड) वैहीनरे, लवकर जारे, लवकर जा.

कंचुकी—होय महाराज, आज्ञेप्रमाणें करतों. [जातो.

---

१ रौद्ररसाचा अभिनय करणारा असा जो शिव त्याच्या अत्यंत तांडवनृत्याच्या.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजा--शोणोत्तरे, ह्या शुष्क कलहानें माझें कपाळ उठलें आहे, तर शयनमंदिराकडे चल.

प्रतीहारी—महाराज, इकडून यावें, शयनमंदिराकडे चलावें.

राजा—(आसनावरून उठून स्वगत)

गुरुजींची मज आज्ञा यास्तव तद्वज्ञा मीं केली,
तरिही माझी बुद्धि फारचि लज्जित होउनि गेली. १
वाटे मजला धरणीविवरांमध्यें शिरोनि जावें,
जगांत गुरुची आज्ञा मोडुन तोंड कसें दावावें ? २
गुरुशीं कृत्रिम कलह करोनी मजला लज्जा वाटे,
सत्यचि गुरुशीं कलह करिति तत्हृदय न कैसें फाटे ! ३

[जातात.

[तिसरा अंक समाप्त.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**—राक्षसाच्या वाड्यापुढील राजमार्ग. वाटसरूच्या वेपानें करभक येतो, असा प्रवेश.]

करभक—कायहो चमत्कार?

योजनशत जायाचा दुर्गम देशीं प्रयास कोण करी?
आज्ञा प्रभुची दुर्घट कृत्यीं जरि सेवकांस न प्रेरी. १

असो. आतां अमात्य राक्षसाच्याच घरीं जावें. (श्रमयुक्त झाल्यासारखें दाखवून इकडेतिकडे फिरून) येथें देवडीवर कोणी आहां काय हो? कोणी असाल, तर अमात्य राक्षसास जाऊन सांगा कीं, उंटाप्रमाणें त्वरेनें चालणारा करभक कुसुमपुरांतून मोठ्या निकडीनें आला आहे.

द्वारपाळ—(प्रवेश करून) अरे वावा, मोठ्यानें बोलूं नकोस. आमचे धनी अमात्य राक्षस, यांनां कांहीं कामाच्या चिंतेनें रात्रीं जागरण झाल्यामुळें त्यांचें कपाळ फार दुखत होतें, नुकताच कोठें त्यांचा डोळा लागला आहे; तर तूं गडवड करूं नको. जा, दोन घटका तिकडे वैस, सरकार उठल्यावर ये, मग मी तूं आल्याचें त्यांच्या कानांवर घालीन.

करभक—वरें आहे वावा, तुझ्या मर्जीस येईल तसें कर.

[जातात.

प्रवेश २ रा.

[**स्थळ**—राक्षसाच्या वाड्यांतील दिवाणखाना. राक्षस विछान्यावर सचिंत मुद्रेनें पडला आहे, जवळच शकटदास एका आसनावर बसला आहे, असा प्रवेश.]

राक्षस—(स्वगत)

प्रारंभीं प्रतिकूलतेस विधिच्या चित्तांत मी जाणतों,
चाणक्यप्रकृति स्वभावकुटिला हेंही मनीं आणितों;
हें हें कृत्य असेल का करियलें त्यानें? इथें या अशा,
चिंतेनें मज जातसे प्रतिदिनीं निद्रेविणेंची निशा. १

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणखी,

कार्योपेक्षप आधीं लघु करुनि, पुढें विस्तरा त्यास नेतों,
बीजाचें गर्भिताचें गहन बहु फल स्पष्ट दावूनि देतों,
बुद्धीनें योग्यकाळीं प्रकटहि घडल्या झांकतो कार्यजाता;
जाणे हा क्लेश माझ्यासम नर, अथवा नाटकाचाहि कर्त्ता.१

पण तो वेटा दुरात्मा चाणक्य—(इतक्यांत द्वारपाळ येतो.)

द्वारपाळ—जय पावो, जय पावो !

राक्षस—ठकला जाईल ?

द्वारपाळ—अमात्य राक्षस !

राक्षस—(डावा डोळा लवला असें दाखवून स्वगत) 'चाणक्य जय पावो,' आणि 'अमात्य राक्षस ठकला जाईल!' असा वाग्देवीनें दोन वाक्यांच्या मिश्रणानें अर्थ सुचविला, असें माझा डावा डोळा लवल्यावरून वाटतें, असो. असें असलें तरी उद्योग सोडतां येत नाहीं ! (द्वारपाळाकडे पाहून) कायरे बावा, काय बोलावयाचें आहे ?

द्वारपाळ—महाराज, हा करभक कुसुमपुरांतून आला आहे, हा आपणास भेटावयास इच्छितो.

राक्षस—त्याला लवकर आंत घेऊन ये.

द्वारपाळ—आज्ञा महाराज. (बाहेर येऊन करभकास) दादा, हे अमात्य बसले आहेत, जाऊन भेटावें.

[जातो.

करभक—(प्रवेश करून) अमात्यांचा जयजयकार असो !

राक्षस—(करभकाकडे पाहिलेंसें करून) करभका, आलास, बैस.

करभक—आज्ञा महाराज.

राक्षस—(स्वगत) ह्या करभकास मीं कोणत्या कामासाठीं बरें पाठविलें होतें? आठवण कांहीं होत नाहीं. कारण, अनेक कार्यांमुळें अनुसंधान राहिलें नाहीं.

[चिंतन करित बसतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—राक्षसाच्या वाड्याजवळील राजमार्ग. हातांत छडी घेऊन एक राजसेवक येतो, असा प्रवेश.]

राजसेवक—अहो महाजन हो, मार्ग सोडून बाजूला व्हा, अहो, बाजूला व्हा. बावांनों, दाटी मोडा. पहा—

भूदेव आणि नरदेव महान, यांचे
कल्याण वास गृह जे असती तयांचें
पाप्यांस दर्शनहि दुर्लभ, संगतीची
वार्ता कशास मग दायक सद्गतीची? १

(आपणाशीं) बाजूला व्हा असें कां सांगतोस असें ह्मणतां काय? अमात्य राक्षस कपाळदुखीनें फार बेजार आहे, ह्मणून त्याच्या समाचारासाठीं मलयकेतूची स्वारी इकडेच येत आहे, याकरितां बाजूला व्हा ह्मणून सांगतों.

[जातो.

(तदनंतर ज्याच्या पाठीमागें भागुरायण आणि कंचुकी हे दोघे आहेत, असा मलयकेतु येतो.)

मलयकेतु—(श्वासोच्छ्वास टाकून स्वगत) शिव शिव! व्यर्थ, व्यर्थ आह्मी पराक्रमाचा अभिमान वाहतों! अरे, आज आमच्या पित्याला परलोकास जाऊन दहा महिने झाले, आह्मीं त्याच्या नांवानें श्राद्ध किंवा तर्पण देखील केलें नाहीं. अथवा हा खेद कां करावा? कारण, आह्मीं पूर्वीच प्रतिज्ञा केली आहे, कीं—

मातांचीं जशि, ऊर बडवितां, रत्नकंकणें सारीं
फुटून गेलीं; नेत्र कोरडे झाले, गळतां वारि. १
अंगावरचें वस्त्रहि गेलें किंवा आहे त्यांना,
शुद्धी जैशी उरली नाहीं, हाय हाय करितांना! २
आर्त्तस्वर काढुनी तयांनीं जैशी ओरड केली,
जशी लोळतां वेणी त्यांची रुक्ष धुळीनें झाली. ३
पतींस मारुनि वैधव्याच्या तैशा हीन दशेतें
देउनि शत्रुस्त्रियांस; मग जल द्यायाचें तातातें! ४

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणखी,

शिरीं सैन्याचा घेउनी भार सारा,
ह्मणति योद्धे जो "उचित असे वीरा;"
रणामाजी शूरत्व करुनि ठावें,
तातपंथें पडुनियां रणीं जावें. १

एक ऐसें हें, उचित असे किंवा
दुजें मातेचा बाष्पपूर न्यावा
शत्रुमहिलांच्या[1] नयनीं; हा विडा घ्यावा,
तरिच माझ्या स्वस्थता होय जीवा. २

जाजले ! माझ्यामागून जे राजे येत आहेत त्यांनां सांग कीं, पुढें सांगून वगैरे न पाठवितां मीं एकटाच अमात्य राक्षसाची अकल्पित भेट घेणार आहें. तसें केल्यानें त्याला मोठा संतोष होईल. तर मजबरोबर येण्याचा कोणींहि श्रम घेऊं नये.

कंचुकी—आज्ञेप्रमाणें करतों. (इकडे तिकडे फिरून) अहो, राजांनों, राजकुमार तुह्मांला आज्ञा करित आहे कीं, आपल्या पाठीमागें तुह्मीं कोणी येऊं नये. (पाहून हर्षयुक्त होऊन) कुमारा, कुमारा, तुझी आज्ञा होतांच हे सर्व राजे माघारे फिरले. पहा—

उंच स्कंध, लगाम ओढुन, कसे झाले खुनम्राकृति,
जे वाजी गगनींच चालति असें वाटे, तयांची गति
रोधोनी वळले किती, कितिक हे जाती गजांच्या वरी,
मर्यादा बहु मानिती तव पहा राजे समुद्रापरी ! १

मलयकेतु—जाजले, तूंहि परिजनांस घेऊन माघारी जा. एकटा भागुरायण मात्र मजबरोबर येईल.

कंचुकी—आज्ञा महाराज.

[परिजनांसह जातो.

---

१ शत्रुस्त्रियांच्या.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलयकेतु—मित्रा भागुरायणा, भद्रभटादिक चंद्रगुप्ताकडून जेव्हां इकडे आले, तेव्हां त्यांनीं मला सांगितलें कीं, 'महाराज, आह्मी अमात्य राक्षसाच्या द्वारानें आपल्या आश्रयास आलों नसून शिखरसेन नांवाच्या आपल्या सेनापतीच्या द्वारानें आलों आहों. त्या चंद्रगुप्ताचा अमात्य फार दुष्ट आहे, आणि राज अमात्याच्या तंत्रानेंच वागत असल्यामुळें आह्मीं त्याला कंटाळून उत्तम गुणांनीं युक्त अशा आपला आश्रय केला आहे.' त्यांच्या या ह्मणण्याचा अर्थ मला बरोबरसा समजला नाहीं. तो काय बरें असावा ?

भागुरायण—कुमारा, त्यांच्या ह्मणण्याचा अर्थ उघडच आहे. कोणालाहि थोराचा आश्रय करणें झालें तर त्याचे हितेच्छु आणि इष्ट जे असतील, त्यांच्या द्वारानें करणें हें युक्तच आहे !

मलयकेतु—मित्रा, पण अमात्य राक्षस आमचा अत्यंत हितकर्ता आणि इष्ट असा आहे !

भागुरायण—तें खरें; परंतु अमात्य राक्षसाचें चाणक्याशीं मात्र वैर आहे, चंद्रगुप्ताशीं नाहीं. ह्मणून कदाचित् पुढेंमागें असाहि प्रसंग येईल कीं, चाणक्य मोठा गर्विष्ठ व वरचढपणानें वागणारा असल्यामुळें त्याचा तो वरचढपणा चंद्रगुप्ताला न साहून तो चाणक्याला प्रधानगिरीवरून काढून टाकील. बरें, राक्षसाची पूर्वीपासून नंदकुलावर अतिशय भक्ति आहे आणि चंद्रगुप्तहि नंदवंशांतलाच आहे. तसेंच, राक्षसाची सर्व धनदौलत व सर्व इष्टमित्र चंद्रगुप्ताच्या नगरांतच आहेत. ह्या सर्व कारणांवरून राक्षस चंद्रगुप्ताशीं कदाचित् संधि करील व हा आपला कुलपरंपरागत प्रधान आहे असें समजून चंद्रगुप्त राजाहि राक्षसाशीं सख्य करील. आणि असें झालें असतां आपण राक्षसाच्या संबंधाचे आहों असें समजून आपल्यावरूनहि तुझा भरंवसा उडेल, असा त्या भद्रभटादिकांच्या बोलण्यांतील भावार्थ असावा.

मलयकेतु—मित्रा, भागुरायणा, तूं ह्मणतोस हें खरें आहे. असो. पण चल, आपण अमात्य राक्षसाच्या घराकडे जाऊं.

भागुरायण—ठीक आहे, कुमारा, इकडून यावें. (दोघेहि पुढें जातात.) कुमारा, हें अमात्य राक्षसाचें घर. आंत चलावें.

[आंत जातात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवेश ४ था.

[**स्थळ**—राक्षसाच्या वाड्यांतील दिवाणखाना. राक्षस विचार करित पडला आहे, जवळच शकटदास आणि करभक बसले आहेत, मलयकेतु आणि भागुरायण आंत शिरत आहेत, असा प्रवेश.]

राक्षस—(स्वगत) हो, आठवलें! (उघड) करभका, तूं कुसुमपुरांत जाऊन स्तनकलश नांवाच्या वैतालिकाची भेट घेतलीस का ?

करभक—होय महाराज, घेतली.

मलयकेतु—(भागुरायणाला हळूच) मित्रा भागुरायणा, कुसुमपुरांतीलच वृत्तांत चालला आहे, त्या अर्थी आपण अमळ येथेंच उभे राहून ऐकूं. कारण—

मसलत फुटेल यास्तव नृपापुढें सचिव अन्यथा वदती,
स्वच्छंद कथा माजी मंत्रार्थातेंहि व्यक्त ते करिती. १

भागुरायण—(हळूच) वरें आहे, आपणांस रुचेल तसें करावें.

राक्षस—करभका, तुला ज्या कामासाठीं पाठविलें होतें, तें काम झालें कायरे?

करभक—होय महाराज, आपल्या प्रसादानें तें काम सिद्ध झालें.

मलयकेतु—(हळूच) मित्रा, भागुरायणा, तें कोणतें वरें काम असेल ?

भागुरायण—राजकुमारा, सचिवांच्या मसलती खोल असतात. कोणतें काम आहे तें इतक्यांत समजणार नाहीं. अमळ चित्त देऊन पुढें ऐकूं, ह्मणजे समजेल.

राक्षस—करभका, सर्व वृत्तांत सविस्तर सांग.

करभक—अमात्या, ऐकावें. कुसुमपुरांत जाऊन तो गुलाम चाणक्य जेव्हां जेव्हां चंद्रगुप्त राजाची आज्ञा मोडील तेव्हां तेव्हां चाणक्याविषयीं त्याच्या मनांत कोप येण्यासारखी राजाची स्तुति करून त्याला उत्तेजन देत जाण्याविषयीं स्तनकलश नांवाच्या वैतालिकास सांगण्याची आपण मला आज्ञा केली होती—

राक्षस—होय, पुढें काय झालें ?

करभक—त्याप्रमाणें मीं कुसुमपुरांत जाऊन आपला निरोप त्या वैतालिकास सांगितला—

राक्षस—मग ?

करभक—मग, नंदकुळाचा नाश झाल्यामुळें अत्यंत दुःखित झालेल्या कुसुमपुरांतील लोकांनां संतोष व्हावा ह्मणून सर्व लोकांनीं चंद्रिकोत्सव करावा अशी चंद्रगुप्तानें नगरांत दवंडी पिटविली होती. हें ऐकून राजानें हा आपला मोठा मान केला असें लोकांनां वाटलें व त्यांनीं ती राजाची आज्ञा आनंदानें मान्य केली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस--(डोळ्यांत पाणी आणून)

कुमुदानंदप्रद हा चंद्रहि असतां, जगास आनंदा
देणारा तूं नसतां, व्यर्थचि ही चंद्रिका असे नंदा ! १

करभका, बरें पुढें काय झालें ?

करभक---तदनंतर, सर्व लोकांचें मन चंद्रिकोत्सव करण्याविषयीं अत्यंत उत्कंठित झालें असतां, सर्व लोकांच्या नेत्रांस आनंदप्रद होणारा तो चंद्रिकोत्सव त्या दुष्ट चाणक्यानें बंद केला. इतक्यांत स्तनकलशानें चंद्रगुप्तास उत्तेजन येण्यासारखे श्लोक करून वर्णनास आरंभ केला.

राक्षस—(हर्षयुक्त होऊन) शाबास, मित्रा स्तनकलशा, शाबास ! तूं समयीं जें बीज लाविलें ह्यापासून विवक्षित फळ उत्पन्न होईल यांत संदेह नाहीं. कारण—

स्वच्छंद क्रीडेचा भंग न सोशी मनुष्य सामान्य,
कैसा साहिल नृपती लोकोत्तरतेज सूर्यसामान्य ? १

मलयकेतु—(स्वगत) खरें आहे.

राक्षस—बरें पुढें काय झालें ?

करभक—तदनंतर, आपल्या आज्ञेचा भंग केल्यामुळें चंद्रगुप्त मनांत रुष्ट झालें, आणि फार वेळपर्यंत तुमच्या गुणांची प्रशंसा करून त्यानें चाणक्याला अधिकारावरून दूर केलें.

मलयकेतु—(हळूच) मित्रा भागुरायणा, चंद्रगुप्तानें राक्षसाच्या गुणांची प्रशंसा करून त्याजवर आपली प्रीति आहे असें दर्शविलें, नाहीं बरें ?

भागुरायण—कुमारा, केवळ गुणप्रशंसा करूनच राक्षसावर आपली प्रीति दर्शविली असें नाहीं, तर चाणक्याला घालवून ती विशेष दर्शविली !

राक्षस—चाणक्यानं चंद्रिकोत्सव बंद केला एवढ्याच कारणावरून त्याचा कोप चंद्रगुप्तास आला, किंवा कांहीं दुसरेंहि कारण झालें ?

मलयकेतु—(हळूच) मित्रा भागुरायणा, राक्षसाला दुसऱ्या कारणाचा शोध करण्यांत फळ काय आहे बरें ?

भागुरायण—कुमारा, शोध करण्यांत हें फळ निष्पन्न होतें कीं, चाणक्य हा मोठा शहाणा असतां प्रयोजनावांचून चंद्रगुप्तास कोप कां आणील ? आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंद्रगुप्त हा कृतज्ञ आहे, ह्मणून तोहि अकारण चाणक्याची आज्ञा मोडणार नाहीं. तर चंद्रगुप्त आणि चाणक्य यांचा खरोखरी मोठ्या कारणावरून जो बिघाड होईल, तोच खरा बिघाड ह्मणावयाचा, अशा हेतूनें हा दुसरें कारण विचारित आहेसें वाटतें.

करभक—अमात्या, चंद्रगुप्तास चाणक्याचा कोप येण्याचीं कारणें दुसरींहि पुष्कळ आहेत.

राक्षस—कोणतीं वरें ?

करभक—तुह्मी आणि मलयकेतु दोघे नगरांतून बाहेर आलां असतां, चाणक्यानें उपेक्षा केली, हें एक मुख्य कारण आहे.

राक्षस—(हर्षयुक्त होऊन शकटदासास) मित्रा शकटदासा, आतां वरीक चंद्रगुप्त खचीत माझ्या कवज्यांत आला !

शकटदास—अमात्या, चंद्रगुप्त आपल्या कवज्यांत आला एवढेंच काय ? आणखी पुष्कळ कार्यें झालीं. आतां चंदनदास बंदींतून सुटेल; आपली आणि आपल्या मुलांमाणसांची भेट होईल; जीवसिद्धीचा क्लेशच्छेद होईल.

भागुरायण—(स्वगत) हं ! आतां झाला जीवसिद्धीचा खरोखरी क्लेशच्छेद!

मलयकेतु—(हळूच) चंद्रगुप्त कवज्यांत आला असें जें यानें ह्मटलें, त्यांतील अभिप्राय काय वरें ?

भागुरायण—दुसरा अभिप्राय तो कोणता ? ह्याच्या मनांत असें आहे कीं, चंद्रगुप्तापासून चाणक्य दूर झाल्यावर चंद्रगुप्त सहज स्वाधीन होईल.

राक्षस—करभका, चाणक्याला अधिकारावरून दूर केलें, परंतु तो आतां कोठें आहे रे ?

करभक—अद्यापि तो कुसुमपुरांतच आहे.

राक्षस—(नाखुष झाल्यासारखें करून) काय? तो अद्यापि कुसुमपुरांतच आहे ! तपोवनास नाहीं गेला ? किंवा त्यानें पुन्हा पूर्वींप्रमाणें प्रतिज्ञाहि नाहीं केली ?

करभक—अमात्या, तो तपोवनांत जाणार आहे असें ह्मणतात.

राक्षस—(शंकित होऊन) मित्रा शकटदासा, यानें सांगितलेली गोष्ट खरी दिसत नाहीं. पहा—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नंदानें [१]भूतलेंद्रें उठवुनि दिधलें आसनाखालतें ज्या,
मानाचा भंग ज्यानें क्षणभरिहि नसे सोशिला, तो [२]सुतेजा,
हातानें ज्यास राजा करुनि बसविलें, [३]तत्कृता मानहानि
कैसा सोशील? कर्ता, चतुर, नयबळें चालता, आणि मानी. १

मलयकेतु—(हळूच) मित्रा भागुरायणा, चाणक्य तपोवनांत गेला किंवा पुन्हा त्यानें नंदाच्या नाशाप्रमाणें चंद्रगुप्ताच्या नाशाची प्रतिज्ञा केली, तर त्यांत ह्या राक्षसाला कोणता लाभ आहे बरें?

भागुरायण—राजकुमारा, हें समजण्यास फारसें कठीण नाहीं. हा गुलाम चाणक्य जितका जितका त्या चंद्रगुप्तापासून दूर होईल, तितका तितका ह्या राक्षसाचा स्वार्थ आहे.

शकटदास—अमात्या, आपण उगीच शंका घेण्याची गरज नाहीं. करभकानें आणलेली वातमी जुळते. पहा—

राजांच्या [४]दीप्तदीप्तिज्वलमणिमुकुटीं मस्तकीं पाय देता
आज्ञाभंग स्वकीयाकडुनि नृपति तो केंवि साहेल नेता?
जाणे कौटिल्य कोपी, तरि बहुत परोच्छेददुःख स्वयें तो,
दैवें झाली प्रतिज्ञा सफल तरि अजी भाविदुःखास भीतो. १

राक्षस—मित्रा शकटदासा, तूं ह्मणतोस हेंच खरें. आतां व्यर्थ शंका काढूं नये. बरें, ह्या करभकाचा खाण्यापिण्याचा बंदोबस्त कर, ह्मणजे हा विश्रांति घेईल.

शकटदास—आज्ञेप्रमाणें करतों.

[करभकास घेऊन जातो.

राक्षस—मीहि आतां मलयकेतूस भेटावयास जातों.

मलयकेतु—(पुढें होऊन) अमात्या, मीच आपणास भेटावयास आलों आहें, आपण श्रम घेऊं नये.

राक्षस—(पाहिलेंसें करून) अरे, हा कुमारच आला आहे! (आसनावरून उठून) कुमारा, हें आसन आहे, याजवर बसावें

मलयकेतु—अमात्या, मी बसतों, आपण आधीं बसावें. (दोघे आसनावर बसतात).

---

१ भूतलावरील इंद्रानें. २ उत्तम आहे तेज ज्याचें तो. ३ त्यानें केलेली. ४ अत्यंत प्रकाशमान आहेत मणिखचित मुकुट ज्यांचे अशा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलयकेतु—अमात्या, आतां कपाळाची वेदना कांहीं कमी झाली का ?

राक्षस—बाबा, राजकुमारा, तुझा हा कुमारशब्द नाहींसा होऊन तुला अधिराज शब्द मिळेपर्यंत माझी वेदना कशी कमी होईल ?

मलयकेतु—अमात्या, आपण माझा अंगिकार केला आहे, त्यामुळें जें आपल्या मनांत आहे तें होणें मुळींच दुर्घट नाहीं. परंतु आमची सैन्यादिक सर्व सामग्री सिद्ध असतां शत्रु कांहीं अडचणींत येईल अशा प्रसंगाची वाट पाहत उगेंच किती दिवस बसावें ?

राक्षस—कुमारा, आतां फार दिवस कशाला पाहिजेत ? शत्रूच्या जयासाठीं आतां खुशाल प्रस्थान करावें !

मलयकेतु—कां बरें ? शत्रूस कांहीं संकट उपस्थित झालें आहे कीं काय ?

राक्षस—होय, झालें आहे, ह्मणून तर ह्मणतों !

मलयकेतु—कोणतें संकट त्याला आलें आहे ?

राक्षस—सचिवाविषयीं संकट उपस्थित झालें आहे.

मलयकेतु—अंः, इतकेंच का ? तर मग हें संकट कांहीं मोठेंसें नाहीं !

राक्षस—राजकुमारा, इतर राजांनां सचिवाविषयींचें संकट मोठें नसेल तर नसो; परंतु चंद्रगुप्तास तें तसें नाहीं !

मलयकेतु—अमात्या, मला वाटतें कीं, चाणक्य विघडल्यानें चंद्रगुप्तास कांहीं संकट नाहीं.

राक्षस—कां नाहीं बरें ?

मलयकेतु—चंद्रगुप्तावर प्रजेचें प्रेम न बसण्यास कारण ह्मटलें ह्मणजे चाणक्याचेच दोष होत; ह्मणून चंद्रगुप्तानें चाणक्यास घालविलें असतां चंद्रगुप्तावर सर्व प्रजांचें प्रेम पूर्वीं होतेंच, तें आतां उलटें अधिक होईल.

राक्षस— राजकुमारा, नाहीं, असें नाहीं. याठिकाणीं प्रजा दोन प्रकारच्या समजल्या पाहिजेत. चंद्रगुप्ताबरोबर उदयास आलेल्या प्रजा, व नंदकुलावर प्रेम ठेवणाऱ्या प्रजा. त्यांपैकीं पहिल्या प्रकारच्या प्रजा नाखूष होण्यास चाणक्याचे दोष कारण खरे; परंतु दुसऱ्या प्रकारच्या प्रजा आपल्या पितृकुलासारखें जें नंदकूल तें सर्व ह्या चंद्रगुप्तानें कृतघ्नपणा करून निर्मूळ केल्यानें फार दुःखी झाल्या आहेत. त्यांनां दुसरा आश्रयहि मिळत नाहीं, एवढ्याच कारणानें त्या कांहीं काळ घालविण्यासाठीं चंद्रगुप्ताशीं मिळून आहेत. जर शत्रूंचा उच्छेद

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करण्यास समर्थ असा कोणी तुझ्यासारखा त्यांना मिळेल, तर त्या तत्काळ त्याचा आश्रय करून चंद्रगुप्तास सोडतील, ह्याविषयीं आह्मीच दृष्टांत आहों पहा!

मलयकेतु—अमात्या, चंद्रगुप्तास आतां सचिवाचें संकट प्राप्त झालें आहे, हेंच केवळ आपण त्याजवर स्वारी करण्यास कारण आहे, किंवा कांहीं दुसरींहि कारणें आहेत?

राक्षस—राजकुमारा, आणखी दुसऱ्या कारणांची चौकशी कशाला पाहिजे? सचिवसंकट हेंच मुख्य कारण होय.

मलयकेतु—अमात्या, हेंच मुख्य कारण कसें? चंद्रगुप्त राजा एक प्रधान गेला तरी दुसरा प्रधान ठेवून, अथवा आपणच स्वत: राज्यकारभार चालविण्यास असमर्थ आहे काय?

राक्षस—होय, असमर्थ आहे, यांत काय संशय?

मलयकेतु—कां बरें असमर्थ आहे?

राक्षस—जे स्वबुद्धीनें वागणारे किंवा आपण आणि प्रधान मिळून दोघांच्या बुद्धीनें वागणारे राजे असतात, त्यांविषयीं तूं ह्मणतोस हें संभवतें; परंतु चंद्रगुप्ताविषयीं हें संभवत नाहीं. कारण, चंद्रगुप्त बेटा केवळ प्रधानाच्याच बुद्धीनें चालणारा आहे, त्यामुळें याला चाणक्यानें सोडतांच जसा नेत्रविकल अंध असतो आणि त्याला कांहीं दिसत नसतें, तसा हा चाणक्यावांचून आंधळाच होय! त्याला कांहींएक समजत नाहीं. त्याच्या हातून दुसरा प्रधान ठेवून कारभार चालविणें हें अशक्य आहे. कारण—

मंत्री आणि नृपाल तुल्यबल हे दोघे, तरी ह्यांवरी
राखोनी सम भार राहत असे लक्ष्मी, जरी धावरी;
संधी साधुनि योग्यशी, धरुनियां एकावरी[१] तोल ती,
स्त्रीत्वें दुर्बळ ह्यामुळें त्यजितसे अन्यास कीं निश्चिति. १

आणखी असें आहे—

जैसा कीं मुलगा, सुटोनि पडतां मातृस्तनावेगळा,
दुःखव्याकुळ होउनी रडतसे, होई जसा बावळा;
कर्तव्या क्षण एक त्यास न सुचे जैसें स्वता, त्या परी
राजा जो सचिवा अधीन असतो, ही होय त्याची[२] परी. १

---

१ निश्चयानें. २ प्रकार.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलयकेतु—(स्वगत) वरें झालें, मी सचिवाच्या स्वाधीन झालों नाहीं तें ! (उघड) आपण ह्मणतां हें खरें आहे. तरी अन्य कारणें नसतां केवळ सचिव-संकटावरूनच शत्रूवर स्वारी करून जाणारांस सिद्धि प्राप्त होईलच, असा निश्चय नसतो.

राक्षस—राजकुमारा, सिद्धि प्राप्त होईल या विषयीं संदेह ठेवूं नको. कां ह्मणशील तर–

गंता शत्रूवरी तूं, प्रबल बल तुझें, होय नंदीं पुरी ती
सप्रेमा, सर्व आहे नवचि नरपती मौर्य अज्ञातरीति;
चाणक्य भ्रष्ट झाला अधिकृतिवरुनी, मी तुला साह्य आहें,—
(इतकें बोलून लाजल्यासारखें करून)
दावाया मार्ग मात्र, स्वकरगत अशि वांछिता सिद्धि लाहे. १

मलयकेतु—अमात्या, हा स्वारी करण्याचा समय असें जर आपणास वाटतें, तर विलंब कां मग ?

कटाव.

शत्रूवरी चालुनि जाया, समयीं कां विलंब राया ? । धृ० । विपक्षशिक्षणदक्ष महाबळ, एक लक्ष हे योद्धे असती, शस्त्रें लखलख घेउनि हातीं, काळालाही भीती देती, युद्ध कराया वाट पाहती; योद्धे माझे व्याघ्रसमान, जया पाहतां, टाकुनि मान मेंढयांपरि रिपु देती प्राण ! पट्टे तलवारींच्या पाती, ज्यांच्या विद्युत्समा चमकती, क्षणांत करितिल समरीं दाणा-दाण रणीं हें ठाण मांडुनि, निशाण लावुनि बाण टाकितां, शरणार्थी रिपु रणांत होती, आत्मत्राणा-साठीं एका यमाजवळि ते प्रयाण करिती, प्रतिभटसारे निर्भय चित्तें वास कराया. ॥ शत्रूवरी० ॥

नीलवर्ण हे मेघमंडलासमान हत्ती, पर्वतसम हे उन्नत असती, करोनि शुंडादंडातें वरि, गर्जित करितां ब्रह्मांडाचां भेद होतसे, गंडस्थलमदलुब्ध होउनी भ्रमर - पाहतां, येउनि करिती बहुताचि दाटी, ज्यांच्या गुंजारवेंचि भरल्या, दहा दिशाही एकचि झाल्या, अतांचि गजरिपु नगराजवळी जाउनि करतिल शोण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नदातें, दांतें अपुल्या तटें फोडुनी, कडेवरी जीं असती झाडें, पाडुनि सारीं मोडुन करतिल उजाड, नदजळ विपुळहि असतां खळबळ खळबळ करोनि निर्जळ करतिल सिंदूराने शोण, नद जो आहे नामें शोण, ह्मणुनि असूया मनीं धरून, करिती शोणावरी प्रयाण, जळभरिताचें मदसलिलानें, त्याच्या लाटांचा पाहुनियां खटाटोप तो मोठा, अपुल्या गंडतटाच्या भ्रमररवानें, तिरस्कृतीनें करिती त्यांच्या विकट तटातें दंततटातें फोडितील, कां दुर्बल अमुची बरोबरी हे करिती वाया ? ॥ शत्रूवरी० ॥

आणखी,

गंभीरगर्जित जसे घन पूर्णवृष्टि,
विंध्याचलीं करुनि रोधिति लोकदृष्टि,
रोधोनि शत्रुनगरास मदीयहस्ती,[1]
वर्षोनि दानसलिलास[2] करोत मस्ती. २

[भागुरायणासह मलयकेतु जातो.

राक्षस—कोण आहे रे तिकडे ?

प्रियंवदक—(प्रवेश करून) काय आज्ञा आहे महाराज ?

राक्षस—अरे प्रियंवदका, बाहेर ज्योतिष्यांपैकीं कोण आहे पहा ?

प्रियंवदक—आज्ञा महाराज. (बाहेर येऊन क्षपणकास पाहून आंत येऊन) महाराज, बाहेर क्षपणक—

राक्षस—(अपशकुन झाल्यासारखें सुचवून स्वगत) कार्याच्या आरंभींच क्षपणकाचें दर्शन ?

प्रियंवदक—जीवसिद्धी आहे.

राक्षस—(उघड) बरें, त्याचीं अमंगळ वस्त्रें बदलून चांगलीं वस्त्रें देऊन त्याला आंत घेऊन ये.

प्रियंवदक—आज्ञा महाराज.

(तदनंतर क्षपणक येतो.)

क्षपणक—

अज्ञान-रोग-भेषज अर्हच्छासन कडू असे आधीं,
परिणामीं गोडचि तें होतें, जातां समस्तही व्याधी. १

---

१ माझे हत्ती. २ मदोदकास.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—भदंता, आह्मांला प्रस्थान करावयास चांगला दिवस कधीं आहे, तो सांग.

क्षपणक—(चिंतन केल्यासारखें करून) श्रावका, मुहूर्त पाहिला. पौर्णिमेस मध्यान्हानंतर सात घटका लोटल्यावर प्रस्थानास वेळ चांगली आहे. तुह्मांला दक्षिणेकडून उत्तरेस जावयाचें आहे ह्मणून, तुह्मीं दक्षिणेकडे प्रस्थान करावें, ह्मणजे तिकडे नक्षत्रानुकूल्य आहे. आणि--

संपूर्णमंडळाचा चंद्राचा उदय आणि सूर्यास्त
होतां, गमन बुधाच्या लग्नीं अस्तींहि केतुच्या शस्त. १

राक्षस—भदंता, मुळीं तिथीच चांगली नाहीं!

क्षपणक—तिथी चांगली नसली तरी दोष नाहीं. कारण—

तिथी आहे एकगुण, नक्षत्र होय चतुर्गुण,
लग्न आहे चतुःषष्ठिगुण, असें सोमसिद्धांतीं सांगितलें. १
क्रूरग्रह टाळितां, लग्नाची होय सफळता,
चंद्रबळें जात असतां, महालाभ होईल. २

राक्षस—अरे, दुसऱ्या ज्योतिष्यांबरोबर जाऊन वाद कर, मला तुझ्याशीं वाद करण्यास वेळ नाहीं.

क्षपणक—जोतिषांबरोबर आपण वाद करावा, मी जातों घरीं!

राक्षस—भदंतास क्रोध तर आला नाहींना?

क्षपणक—भदंतास तुमचा क्रोध नाहीं आला.

राक्षस—तर मग कोणास आला?

क्षपणक—(स्वगत) कृतांतास तुमचा क्रोध आला आहे! (उघड) अविश्वासानें स्वपक्ष सोडून तूं परपक्षास मानतोस ह्मणून?

[जातो.

राक्षस—प्रियंवदका, दिवस किती उरला आहे तो पहा.

प्रियंवदक—आज्ञा महाराज. (बाहेर जाऊन पुन्हा आंत येऊन) महाराज, आतां दिवस नाहीं, सूर्यास्ताचा समय आहे.

राक्षस—(आसनावरून उठून सूर्याकडे पाहून) अरे, दिवस अगदीं नाहीं, सूर्यास्ताची वेळ आहे. पहा—

---

१ या पद्यांत मंगळ, चंद्र, बुध, केतु हे शब्द क्लिष्ट आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आविर्भूतानुराग क्षणभरि उदया सूर्य येतांचि सारे
धावोनी चालती हे सफल तरु पुढें सावलीच्या प्रसारें,
होतां सूर्यास्त मागें फिरति जरि धनी वैभवें हीन झाला,
त्यातें भृत्य त्यजोनी पळति ह्मणति 'ही स्वामिसेवा कशाला?' २

[सर्व जातात.

[चवथा अंक समाप्त.]

१ ज्यांनीं प्रिति प्रगट केली आहे ते; पक्षीं आरक्तवर्ण प्रगट केला आहे ज्यांनीं.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंक ५ वां.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**—मलयकेतूचें शिबिर. सिद्धार्थक प्रवेश करितो.]

सिद्धार्थक—अहाहा, काय चमत्कार !

मतिरूपनिर्झरजलें देशसमय घट करोनि, नीतिलता
चाणक्यें शिंपियली, निश्चित दावील ती महाफलता. १

(स्वगत) अमात्य राक्षसाच्या मुद्रेनें वर मोहोर करून पूर्वी चाणक्यानें शकटदासाकरवीं लिहिविलेलें हें पत्र, आणि राक्षसाच्याच मुद्रेनें मोहोर केलेला हा दागिन्यांचा डवा घेऊन मी कुसुमपुरांत जात आहें. (इकडे तिकडे फिरून पुढें पाहून) अरेरे, मी बाहेर पडतांच माझ्यापुढें हा क्षपणक आला, हा मोठा अपशकुन झाला ! असो. सूर्यदर्शनानें ह्या अपशकुनाचा परिहार करूं.

क्षपणक—(प्रवेश करून)

[1]अर्हंताला नमितों, लोकोत्तरयुक्तिच्या बळें सिद्धि
करिती स्वहस्तगत जे, अति गंभीरा धरोनियां बुद्धि. १

सिद्धार्थक—(पुढें होऊन) भदंता, मी प्रणाम करतों.

क्षपणक—उपासका, धर्मलाभ असो. (सिद्धार्थकाकडे पाहून) समुद्र तरून जाण्याच्या उद्योगांत असल्याप्रमाणें तुझी मोठी तयारी दिसत आहे ?

सिद्धार्थक—भदंता, हें तुला कसें कळलें ?

क्षपणक—उपासका, ह्यांत कळण्यास अवघड तें काय आहे ? जसा समुद्रांत मार्गदर्शक नावाडी असतो, तसा हा तुझ्या हातांतील लखोटाच तुला जें कर्तव्य आहे तें सुचवितो.

सिद्धार्थक—भदंता, मी देशांतरास जात आहें, हें तूं समजलास खरें. बरें तर, आज दिनशुद्धि कशी आहे ती सांग पाहूं ?

क्षपणक—(हंसून) श्रावका, फार चांगलें ! डोकें भादरून आज नक्षत्र कसें आहे ह्मणून पुसतोसना ?

सिद्धार्थक—भदंता, बरें, अद्यापि काय बिघडलें आहे ? दिवस चांगला आहे किंवा नाहीं हें सांग. चांगला असेल तर जाईन, चांगला नसेल तर परतेन मागें.

---

१ नास्तिमतापैकीं एक धर्मोपदेष्टा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्षपणक—श्रावका, दिवस चांगला असो किंवा वाईट असो, सांप्रत काळीं ह्या मलयकेतूच्या कटकांतून दस्तक घेतल्याशिवाय बाहेर जाण्याची कोणाचीहि शक्ति नाहीं!

सिद्धार्थक—भदंता, तर मग आतां माझें जाणें कसें होईल?

क्षपणक—उपासका, ऐक. पूर्वी ह्या मलयकेतूच्या कटकांतून लोकांनां जाण्यायेण्यास कांहीं अटकाव नव्हता; परंतु आतां येथून हें कुसुमपुर अगदीं जवळ राहिलें आहे, ह्मणून तेथें जाण्याला दस्तक लागतें. त्यावांचून जावें असें तुला कोणी सांगणार नाहीं. याकरितां जर तुझ्यापाशीं भागुरायणाचें दस्तक असेल तर तूं खुशाल जा. दस्तक नसेल तर उगाच तळमळ कां करतोस? स्वस्थ बैस कसा. माहींतर चौकीदार फुकट तुझ्या मुसक्या बांधितील आणि तुला राजाकडे नेतील.

सिद्धार्थक—भदंता, मी राक्षसाचा खेळगडी आणि त्याच्याशीं नेहमीं हितगुज करणारा आहें, हें तुला माहित नाहीं काय? अरे, मला दस्तक असो किंवा नसो, मी जात असतां माझा अटकाव करण्याची कोणाची प्राज्ञा आहे?

क्षपणक—श्रावका, तूं राक्षसाचा खेळगडी ऐस किंवा भुताचा सहचर ऐस, दस्तकावांचून बाहेर जाण्याची सोय नाहीं, हें मात्र खरें आहे.

सिद्धार्थक—भदंता, पण सांग बरें, माझी काय कार्यसिद्धि होईल तें?

क्षपणक—उपासका, जा, होवो तुझी कार्यसिद्धि. मी कुसुमपुरींत जाण्याकरितां भागुरायणापासून दस्तक घेण्यासाठीं जातों.

[क्षपणक आणि सिद्धार्थक जातात.

प्रवेश २ रा.

[**स्थळ**—मलयकेतूच्या शिबिरांतील सभामंडप. भागुरायण आणि भासूरक प्रवेश करितात.]

भागुरायण—(स्वगत) काय सांगावें, चाणक्याची नीति मोठी विचित्र आहे!

केव्हां विस्पष्ट होते, गहन[1] कधिकधीं कोणत्याही प्रसंगीं,
[2]नश्यद्बीजा कधींही, [3]बहुफलद, कधीं होय [4]संपूर्णअंगीं,
केव्हां अत्यंत सूक्ष्मा [5]नियतिसम असे, [6]आर्यचाणक्यनीति
कोणालाही कळेना, अतिशयित जगीं दाखवी चित्र रीति.१

---

१ दुर्बोध. २ नष्ट झालें आहे बीज जीचें. ३ बहुफलप्रद. ४ अंगांनीं पूर्ण. ५ दैवासारखी. ६ श्रेष्ठ जो चाणक्य त्याची नीति.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(उघड) भासूरका, मलयकेतूला मी दूर असलों तर क्षणभर चैन पडत नाहीं, याकरितां ह्याच सभामंडपांत गालिच्या टाक, ह्मणजे येथेंच बसूं.

भासूरक—आज्ञा महाराज, हा गालिच्या येथें टाकिला आहे, यावर बसावें.

भागुरायण—(आसनावर बसून) भासूरका, बाहेर कोणी माझ्याकडे दस्तक घेण्याकरितां आला, तर त्याला मजकडे येऊं दे.

भासूरक—आज्ञा महाराज.

[जातो.

भागुरायण—(करुणा येऊन स्वगत) हरहर ! मलयकेतु आह्मांवर इतकें प्रेम ठेवित असतां आह्मी त्याच्याशीं प्रतारणा करित आहों, हें फार अनुचित होय ! अथवा—

कुलातें लज्जेतें त्यजि, निजयशातें, न समजे
जनीं सन्मानातें, हित अहित कांहींच नुमजे !
निजा देहातेंही विकुनि धनिकाला, शिरिं धरी
तदाज्ञा लोभें जो, परवशचि; तो काय न करी ! १

(तदनंतर मलयकेतु आणि त्याच्या मागून प्रतीहारी अशीं येतात).

मलयकेतु—(स्वगत) काय करावें ? ह्या राक्षसाचें अंतःकरण मजविषयीं कसें आहे, ह्याविषयीं मनांत अनेक प्रकारचे विकल्प येतात; निर्णय कांहीं होत नाहीं. कारण—

नंदाच्या सर्व वंशावरि बहु अपुलें प्रेम, तद्वंश मौर्य
जाणोनी स्नेह त्याशीं घडविल, अथवा भक्ति माझीच [1]धैर्य;
हा चित्तीं आणुनीयां स्वकृत पण अजी शेवटालागिं नेतो,
ऐसा चित्तास [2]चक्रभ्रमण पदिंपदीं थोर संदेह देतो. १

(उघड) विजये, भागुरायण कोठें आहे, पहा.

प्रतीहारी—महाराज, हा भागुरायण सरकारच्या सैन्यांतून बाहेर जाणारे लोकांस दस्तक देण्याचें काम करित बसला आहे.

मलयकेतु—विजये, तूं अमळ हळूच पाऊल टाक, हा पाठमोरा बसला आहे; तर मी ह्याच्या मागून हळूच जाऊन हातांनीं ह्याचे डोळे झांकतों.

प्रतीहारी—बरें आहे महाराज.

---

१ श्रेष्ठ. २ चक्रासारखें भ्रमण.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भासूरक—(भागुरायणास) महाराज, हा बाहेर क्षपणक आला आहे त्याला दस्तक पाहिजे.

भागुरायण—वरें आहे, त्याला आंत येऊंदे.

भासूरक—आज्ञा महाराज. [जातो.

क्षपणक—(प्रवेश करून) श्रावकाची धर्मवृद्धि असो.

भागुरायण—(क्षपणकाकडे पाहिलेंसें करून स्वगत) हां, हा राक्षसाचा मित्र जीवसिद्धि. (उघड) भदंता, तूं राक्षसाच्या कांहीं कामाकरितां नगरांत जात आहेस वाटतें ?

क्षपणक—(कानांवर हात ठेवून) छे छे, मी अशा ठिकाणीं जात आहें, कीं, जेथें राक्षसाचें किंवा भूताचें नांवदेखील ऐकूं येणार नाहीं. !

भागुरायण—भदंता, मित्राशीं कांहीं मोठा प्रेमकलह झालासें वाटतें ? बरें, पण राक्षसानें इतका तुझा अपराध तरी कोणता केला ?

क्षपणक—राक्षसानें माझा कांहींएक अपराध केला नाहीं ! हतभाग्य मीं, स्वतःचाच अपराधी आहें !

भागुरायण—हं हं भदंता, मला तुझें हें भाषण ऐकून तुझी गोष्ट ऐकण्याविषयीं उत्कंठा वाटते.

मलयकेतु—(स्वगत) मलाहि तशीच वाटत आहे.

क्षपणक—उपासका, तुला हें ऐकण्यांत फळ काय आहे ?

भागुरायण—भदंता, जर इतकें गुप्त असेल, तर नको सांगूं. आमचा कांहीं आग्रह नाहीं !

क्षपणक—उपासका, गुप्त तर कांहीं नाहींच; परंतु तें कृत्य फार दुष्टपणाचें असल्यामुळें सांगवत नाहीं.

भागुरायण—वरें तर, मीहि दस्तक देत नाहीं.

क्षपणक—(स्वगत) हा मलयकेतु ऐकण्याविषयीं इतका उत्सुक झाला आहे, तर आतां याला सांगावें. (उघड) श्रावका, निरुपाय होऊन सांगतों, ऐकावें. मी कर्म करंटा पूर्वी त्या कुसुमपुरांत राहत असतां माझी आणि राक्षसाची मैत्री झाली. पुढें राक्षसानें गूढ विषकन्येचा प्रयोग करून माझ्या हातून त्या बापड्या पर्वतेश्वरास मारविलें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलयकेतु—(डोळ्यांत पाणी आणून स्वगत) एकून राक्षसानेंच आमच्या तातास मारविलें ना? चाणक्यानें नाहीं मारविलें. शिवशिव !

भागुरायण—भदंता, बरें पुढें काय झालें.

क्षपणक—पुढें, मी राक्षसाचा मित्र असें समजून, त्या दुष्ट चाणक्यानें माझा अपमान करून मला नगरांतून हांकून दिलें. बरें, आतां राक्षसाकडे आलों, पण राक्षस हा मोठा राजकारणी आहे, तो हल्लीं अशीं कांहीं कृत्यें करितो कीं, त्याच्यासंबंधानें माझा प्राणच जावा !

भागुरायण—भदंता, आमच्या ऐकण्यांत असें आहे कीं, पर्वतेश्वराला पूर्वी देऊं केलेलें अर्धें राज्य देण्याचें टाळण्यासाठींच चाणक्यानें तूं ह्मणतोस तें दुष्ट कृत्य केलें, राक्षसानें केलें नाहीं.

क्षपणक—(कानांत बोटें घालून) छे छे, चाणक्याला विषकन्येचें नांव देखील ठाऊक नाहीं बरें ! त्या दुर्बुद्धि राक्षसानेंच हें घोर कर्म केलें.

भागुरायण—अरेरे, फार वाईट गोष्ट !बरें, हें दस्तक घे आणि चल मलयकेतूला हें वर्तमान सांग.

मलयकेतु—(डोळ्यांत पाणी आणून स्वगत)

राक्षसमित्राच्या वदनानें तत्कृत्याची वार्ता
जाळित जाळित विषशरसम ही कर्णीं शिरली आतां. १
तातवधाचें दुःख मला हें आजवरी जें होतें,
द्विगुण जाहलें, घोरवृत्त हें परिसुनि, ममचित्तीं तें. २

क्षपणक—(स्वगत) हें वर्तमान मलयकेतूनें ऐकिलें ! आतां माझें कार्य झालें !

[जातो.

मलयकेतु—(वर तोंड करून प्रत्यक्ष बोलल्यासारखें दाखवून) शाबास, राक्षसा, शाबास ! तूं फार चांगलें केलें !

गीत.

प्राणमित्र तूं असशी माझा, ऐसें समजुनि, अपुल्या काजा
सोंपुनियां तुजवरी, तो राजा निवांत कीं होता. १
विश्वासाचें असशी पात्र, चिंतातापाचें तूं छत्र
जाणुनि, तुजला विकोनि गात्र, निवांत तो होता. २

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रे! दुष्टा ! त्या मत्ताताते, आणिक बांधवनेत्रजळातें,
एका समयीं भूमीवरिते पाडियलें, त्वां रे ! ३
दया राक्षसा! कशी न आली, नांवासमान करणी केली !
ऐशा दुष्टा जननी व्याली, तुझीच रे एक ! ४

भागुरायण—(स्वगत) राक्षसाचें प्राणक्षरण करावें, अशी चाणक्याची आज्ञा आहे. मलयकेतूला हें वर्तमान कळलें, ह्यामुळें राक्षसाचा तो कदाचित् प्राण घेईल. तर आतां अशी युक्ति करावी. (उघड) राजकुमारा, इतकी घाई करूं नये. आसनावर स्वस्थपणें बसावें, ह्मणजे कांहीं विज्ञप्ति करतों.

मलयकेतु—(आसनावर वसून) बाबा, काय ह्मणतोस? सांग लवकर.

भागुरायण—राजकुमारा, ऐक. लोकांत जसे शत्रुमित्र केवळ रुचीनें होतात, तसे राजकीय व्यवहारांत असत नाहींत. राजकारस्थानी पुरुषांस त्यांच्या मुख्य उद्देशास जो अनुकूळ पडेल तो त्यांचा मित्र, व प्रतिकूळ असेल तो त्यांचा शत्रु. आतां, राक्षस हा नंदाचा मुख्य प्रधान असतां, त्याच्या हातून हें कृत्य घडलें आहे. त्याकाळीं सर्वसिद्धि जिवंत असून त्याला नंदराज्य मिळावें असा राक्षसाचा मानस होता, व त्या गोष्टीस चंद्रगुप्त प्रतिकूळ असल्यामुळें तो राक्षसाचा मोठा शत्रु होता खरा, परंतु त्याहूनहि डोईजड शत्रु ह्मटला ह्मणजे तुझा पिता पर्वतेश्वर हाच होता. तेव्हां त्याचा घात करण्यास राक्षस प्रवृत्त झाला, यांत राजनीतीच्या दृष्टीनें पाहतां त्यानें फारसें गैरकृत्य केलें असें ह्मणवत नाहीं. कारण—

मित्रास शत्रु नृपनीति करी प्रसंगें,
शत्रूस मित्रपण आणि निजानुषंगें;
पाडोनियां विसर पूर्वकृतीस, एक
जन्मींच ही इतर जन्म करी अनेक. १

ह्मणून, ह्या बाबतींत राक्षसावर दोष ठेवून त्याच्याशीं विटूं नये. नंदाचें राज्य आपल्या हातीं येईपर्यंत त्याच्याशीं गोडीगुलाबीनें असावें, असें माझें मत आहे. पुढें त्याला जवळ ठेवणें किंवा दूर करणें, हें राजकुमाराच्या मनास येईल तसें होईल.

मलयकेतु—तूं हा चांगला विचार सांगितला. तुझ्या विचाराप्रमाणें करावें, हेंच योग्य आहे. खरेंच, सध्या राक्षसास मारल्यास कुसुमपुरांतील प्रजा बिथरून आपल्यास जय मिळण्यास हरकत होईल. (इतक्यांत भासुरक येतो.)

भासुरक—राजकुमाराचा जयजयकार असो ! महाराज, दीर्घरक्ष नांवाचा आपला चौकीदार विनंति करित आहे कीं, 'हा एक मनुष्य दस्तक घेतल्याशिवाय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सैन्यांतून बाहेर जात होता, व याच्या हातीं एक लखोटा आहे, ह्मणून यांला आह्मीं धरून आपणाकडे पाठविलें आहे' त्याची चौकशी व्हावी.

भागुरायण—भासूरका, जा, तो कोण आला आहे, त्याला आंत घेऊन ये.

भासूरक—आज्ञा महाराज. (बाहेर जाऊन मुसक्या बांधलेल्या सिद्धार्थकास घेऊन येतो.)

सिद्धार्थक—(स्वगत)

वागे गुणें करुनि सेवक, जी तयाला
संतुष्ट होय, परि रुष्टहि जी शठाला;
ती स्वामिभक्ति जननीच अह्मांसमांनां,
तीतें नमूं, करुनियां अति नम्र माना. १

भासूरक—(पुढें होऊन) महाराज, हा तो मनुष्य.

भागुरायण—(त्याच्याकडे पाहिलेंसें करून) कायरे? हा कोणी बाहेरचा मनुष्य आहे किंवा येथेंच कोणाचा चाकर आहे?

सिद्धार्थक—महाराज, मी अमात्य राक्षसाजवळ असतों.

भागुरायण—तर मग तुला तर माहित असावें! असें असतां तूं दस्तक घेतल्याशिवाय ह्या सैन्यांतून कां जात होतास?

सिद्धार्थक—महाराज, अमात्यांच्याच कामाच्या निकडीनें मला दस्तक घेण्यास अवकाश झाला नाहीं.

भागुरायण—राजाची आज्ञा मोडून जाण्याजोगें इतक्या जलदीचें काम कोणतें रे?

मलयकेतु—मित्रा भागुरायणा, त्याच्या हातांतील लखोटा कशाचा आहे तो घे पाहूं.

(सिद्धार्थक भागुरायणाच्या हातीं लखोटा देतो.)

भागुरायण—(सिद्धार्थकाच्या हातून लखोटा घेऊन, त्यावर मोहोर पाहून) राजकुमारा, या लखोट्यावर राक्षसाच्या नांवाची मोहोर आहे.

मलयकेतु—मोहोर कायम ठेवून लाखोटा फोड. (भागुरायण लखोटा फोडून कागद मलयकेतुच्या हातीं देतो. मलयकेतु वाचतो) "स्वस्ती, कुशल असो विशेष. कोठून तरी कोणी एका मनुष्याकडून कोणाला तरी कळविण्यांत येतें कीं, आमचा शत्रु

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दूर करून तुह्मीं सत्यवादिता प्रगट केलीच; आतां पूर्वी ज्यांनीं ज्यांनीं आपणांस अनुकूल होण्याचें कबूल केलें आहे, त्या त्या आमच्या मित्रांस देऊं केलेल्या देणग्या देऊन त्यांचा संतोष करावा, आणि सत्यप्रतिज्ञ व्हावें. ज्यांनां ज्यांनां जें देऊं केलें आहे तें त्यांनां त्यांनां दिलें असतां ते संतुष्ट होऊन आपापल्या हातांतल्या साधनांचा नाश करून आपल्या उपयोगीं पडतील, हें सत्यवादी विसरले नसतीलच; तथापि सूचनार्थ लिहिलें आहे. वर लिहिलेले लोकांपैकीं कितीएक शत्रूचा खजिना मिळण्याची इच्छा करित आहेत; कितीएकांस त्यांचा मुलूख पाहिजे आहे, तरी त्यांचा त्यांचा संतोष ठेवावा. आपण पाठविलेले तीन दागिने पावले. पत्र रिकामें पाठवूं नये ह्मणून आह्मींहि इकडून कांहींएक वस्तु पाठविली आहे, तिचा स्वीकार करावा. सिद्धार्थक फार विश्वासु आहे, अधिकोत्तर मजकूर सांगेल तो ऐकून घ्यावा." मित्रा भागुरायणा, ह्या पत्रांतील अर्थ काय असावा बरें?

भागुरायण—बाबा सिद्धार्थका, हें पत्र कोणाचें आहे रे?

सिद्धार्थक—महाराज, मला ठाऊक नाहीं.

भागुरायण—अरे लुच्चा! पत्र नेतोस, आणि कोणाचें पत्र आहे हें तुला ठाऊक नाहीं काय? बरें, तें असो; परंतु तोंडजबानीनें मजकूर तूं कोणास सांगणार, आणि तुजपासून तो कोण ऐकणार?

सिद्धार्थक—महाराज, आपणच ऐकावयाचे!

भागुरायण—(क्रोधानें संतप्त होऊन) आह्मींच ऐकावयाचे काय?

सिद्धार्थक—(घाबरून) आपण मला धरून ठेविलें ह्मणून काय बोलावें तें मला सुचत नाहीं!

भागुरायण—(अधिकच संतापून) हं हं, सुचत नाहीं काय? बरें तर आतां सुचेल. (भासूरकाकडे वळून) भासूरका, ह्याला बाहेर नेऊन चांगला मऊ कर, ह्मणजे हा आपोआप शुद्धीवर येईल!

भासूरक—आज्ञा महाराज! (सिद्धार्थकास घेऊन बाहेर जाऊन पुनः आंत येऊन) महाराज, ह्याला बाहेर नेऊन खूब कुमकलें, तेव्हां ह्याच्या बगलेंतून हा दागिन्यांचा डबा खालीं पडला, आणि ह्यावरहि राक्षसाचीच मोहोर आहे.

भागुरायण—राजकुमारा, ह्या डब्यावरदेखील राक्षसाची मोहोर आहे!

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलयकेतु—ह्या मोहोरेवरून त्या पत्राचा अर्थ स्पष्ट होईल. मोहोर कायम ठेवून डबा उघड पाहूं. (भागुरायण डबा उघडतो. डब्यांतील दागिनें पाहून) मीं आपल्या अंगावरून काढून राक्षसाकडे पाठविले होते, तेच हे दागिने ! आतां मुळींच संदेह राहिला नाहीं. हें पत्र चंद्रगुप्ताकडे जात आहे खचीत !

भागुरायण—राजकुमारा, आतां ह्या गोष्टीचा मी निर्णय करतों. उगीच अधीर होऊं नको. (भासूरकास) अरे, याला पुन्हा बाहेर नेऊन चांगला मार दे, ह्मणजे हा आपल्या गुणांस येईल.

भासूरक—आज्ञा महाराज. (बाहेर जाऊन पुन्हा आंत येऊन) त्याला खूब मार दिला, तेव्हां तो कबूल झाला आहे कीं, आपण स्वतःच काय सांगावयाचें तें सांगतों ह्मणून.

मलयकेतु—बरें, त्याला आंत येऊंदे.

भासूरक—आज्ञा महाराज. (बाहेर जाऊन सिद्धार्थकास घेऊन पुन्हा आंत येतो.)

सिद्धार्थक—(मलयकेतूच्या चरणांवर मस्तक ठेवून) महाराज, मला अभय असेल तर मी सर्व सांगेन.

मलयकेतु—अरे सांग, तुला अभय आहे. बोलून चालून तूं चाकर माणूस, तुझ्याकडे काय आहे ?

सिद्धार्थक—ऐकावें महाराज, राक्षसानें हें पत्र देऊन मला चंद्रगुप्ताकडे पाठविलें आहे.

मलयकेतु—बरें, तोंडजबानीनें कोणता निरोप त्याला सांगावयाचा होता ?

सिद्धार्थक—महाराज, अमात्य राक्षसानें निरोप असा सांगावयास सांगितला होता कीं, कुलूत देशाचा स्वामी चित्रवर्मा, मलय देशाचा स्वामी सिंहनाद, काश्मीर देशाचा स्वामी पुष्कराक्ष, सिंधुदेशाचा स्वामी सिंधुसेन, आणि पारसीक देशाचा स्वामी मेघाक्ष, हे पांच राजे आपले अत्यंत प्रिय मित्र आहेत. त्यांचा तुह्मांशीं पूर्वी स्नेह करून दिलाच आहे. यांतील प्रथम तिघे राजे मलयकेतूपासून कांहीं देश घ्यावा असें इच्छितात, व दोघे त्याचा खजिना आणि हत्ती इच्छितात. याकरितां तूं चाणक्याला घालवून जसा आपल्याला संतोषित केलेंस, तसेंच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ह्या पांचा जणांस पूर्वी कबूल केलेलें तें तें देऊन त्यांचा संतोष ठेवावा. ह्याप्रमाणें चंद्रगुप्तास निरोप सांगावयास सांगितला होता.

मलयकेतु—(स्वगत) अरे ! चित्रवर्मादिकहि फितुरी आहेत काय ? ह्मणून ह्यांचा राक्षसावर अत्यंत प्रेमा ? (उघड) विजये, अमात्य राक्षसाची भेट घ्यावी, असें मनांत आहे.

प्रतीहारी—आज्ञा महाराज.

[जातात.

प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—राक्षसाच्या वाड्यांतील दिवाणखाना. राक्षस आसनावर बसला आहे, जवळ प्रियंवदक उभा आहे, असा प्रवेश.]

राक्षस—(स्वगत) आमचें सैन्य चंद्रगुप्ताहून कमी आहे, ह्मणून जय मिळण्याविषयीं माझ्या मनांत थोडासा संशय येतो. कारण—

[1]जें साध्यासवें वसे, पक्षीं जें निश्चयें असे,
जें विपक्षीं कधींच नसे, अन्वयव्याप्ति आहे जया. १
ऐशा गुणांचें जें साधन, तें होतसे सिद्धीकारण,
येर आश्रयतां जाण, पराभव रोकडा ! २
जें साधन स्वतः असिद्ध, विपक्षसंबंधें जें वा विरुद्ध,
किंवा पक्षविपक्षीं जें प्रसिद्ध, तें दुष्ट साधन बोलती. ३
करितां तयाचा आश्रय, वादी पावे पराजय,
तोच जाणावा निश्चय, दुष्टसेवकाविषयींही. ४

अथवा, आह्मीं आंतून फितूर केल्यामुळें आणि चंद्रगुप्ताकडून प्रजांचें मनोरक्षण न झाल्यामुळें त्यांची चंद्रगुप्तावर प्रीति नाहीं, हें आह्मांला समजलें आहे; अर्थात्, तिकडील प्रजा आमच्याच आहेत ! तेव्हां कार्यसिद्धीविषयीं संशय धरण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. (उघड) अरे, प्रियंवदका, मलयकेतूच्या बरोबर असणाऱ्या सर्व राजांनां माझा निरोप जाऊन सांग कीं, आतां दिवसेंदिवस

---

१ ह्या ओवींत न्यायशास्त्राच्या रीतीप्रमाणें सद्धेतूंचें लक्षण वर्णिलें आहे व पुढील ओवींत असद्धेतूंचें ह्मणजे हेत्वाभासाचें लक्षण सांगितलें आहे. ह्या ओव्यांतील साध्य, साधन, पक्ष, अन्वय हे न्यायांतील पारिभाषिक शब्द आहेत.

Jangamwadi Math ... VARANASI, Acc. No. 3409
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुसुमपुर जवळ येत चाललें आहे, करितां सर्वांनीं आपापल्या सैन्याचीं पथकें सज्ज ठेवून कुच करित जावें. त्यांची व्यवस्था अशी असावी कीं—

मी पुढें जाईन, सैन्यें आपुलीं जमवून,
चालोत माझ्यामागून, खश आणि मगध नृप. १
यवनाधिप घेवोनि संगीं, दुर्धर असती जे जगीं,
ते गांधार राजे मध्यभागीं, सावधपणें चालोत. २
महावीर असती शक, जयां दिसती शत्रु मशक,
ते धरोनि युद्धकौतुक, सर्वांमागें चालोत. ३
चेदि आणि हून, ज्यां देखतांचि रिपुप्राण
निघोनि जाती, ते धनुष्यबाण, घेवोनियां चालोत. ४
यापरि समस्त सेना, मध्यें घालोनि राजनंदना,
धरोनियां मच्छासना, सावधपणें असोत. ५

प्रियंवदक—आज्ञा महाराज.

[जातो.

(इतक्यांत प्रतीहारी येते.)

प्रतीहारी—आमात्याचा जयजयकार असो ! आमात्या, मलयकेतु महाराज आपली भेट व्हावी असें इच्छिताहेत.

राक्षस—अग, अंमळ उभी रहा. कोण आहे रे तिकडे ?

प्रियंवदक—(प्रवेश करून) आज्ञा महाराज !

राक्षस—अरे, शकटदासाला जाऊन सांग कीं, राजकुमारानें आह्मांला मोठ्या प्रेमानें अलंकार दिले असल्यामुळें अंगावर अलंकार घातल्याशिवाय त्याचें दर्शन घ्यावें हें नीट नव्हे. याकरितां आपण विकत घेतलेल्या अलंकारांपैकीं एक अलंकार दे.

प्रियंवदक—आज्ञा महाराज. (जाऊन पुन्हा येऊन) महाराज हा अलंकार आणिला आहे.

राक्षस—(अलंकार अंगावर घालून उठून प्रतीहारीस) विजये, राजवाड्याकडे चल.

[जातात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवेश ४ था.

[स्थळ—मलयकेतूचें शिबिर. मलयकेतु आसनावर बसला आहे, भागुरायण, सिद्धार्थक वगैरे बाजूला उभे आहेत, असा प्रवेश.]

प्रतीहारी—यावें, महाराज इकडून यावें.

राक्षस—(स्वगत) अधिकारपदवीवर असलें, ह्मणजे फार भिऊन असावें लागतें.

स्वामीचें भय सेवकास असतें मोठें सदा अंतरीं,
त्याहूनी भय फार त्याजवळि जे त्यांचें मनाभीतरीं,
जेही मत्सरयुक्त त्यांसहि पदारूढें भियावें सदा,
जो मोठ्या चढला पदावरि तया भीती असे सर्वदा ! १

प्रतीहारी—(पुढें होऊन) आमात्या, हे येथें मलयकेतु महाराज बसले आहेत, पुढें व्हावें.

राक्षस—(पाहिलेंसें करून) हां, हा राजकुमार येथेंच बसला आहे. जो हा—

करोनि खालीं निश्चल दृष्टी, कुमार बसला आहे,
चलनवलनही अगदीं सोडुनि शून्यपणानें पाहे ! १
दुर्वहकार्याच्या भारानें मुखेंदु अवनत झाला,
ह्मणोनि जाणों करकमळानें टेका दिधला त्याला. २

(पुढें होऊन) कुमाराचा जयजयकार असो !

मलयकेतु—अमात्या, मी चरणाप्रत वंदन करितों. हें येथें आसन आहे, ह्याजवर बसावें. (राक्षस बसल्यावर) अमात्या, बहुत दिवस आपलें दर्शन झालें नाहीं, तेणेंकरून चैन पडेना, ह्मणून बोलावणें पाठविलें.

राक्षस—कुमारा, पुष्कळ दिवसांत तुझी भेट घेतां आली नाहीं, यामुळें तूं दिलेला ठपका बरोबरच आहे ! परंतु काय करावें ? शत्रूवर स्वारी करावयाच्या बेतबातांत गुंतलों होतों, त्यामुळें इकडे येण्यास अवकाश झाला नाहीं.

मलयकेतु—अमात्या, स्वारीचा बेत कसा काय केला, तें ऐकण्याची इच्छा आहे.

राक्षस—राजकुमारा, तुझ्यामागें असणाऱ्या राजांस आज्ञा केली, कीं— ‘ मी पुढें जाईन ’ इत्यादि मागें लिहिलेल्या ओंव्या ह्मणतो.)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलयकेतु—(स्वगत) समजलें ! जे राजे माझा नाश करून चंद्रगुप्ताचें हित करूं इच्छितात, तेच माझ्या भोंवतालीं असणार, अं ? ठीक. (उघड) अमात्या, अलीकडे कोणी शत्रु नगरांतून येणारा किंवा तिकडे जाणारा कोणी आपणास माहित आहे का ?

राक्षस—आतां तिकडून येणारा जाणारा समजण्याचें प्रयोजन नाहीं. आपणच थोड्या दिवसांत तिकडे जाऊं.

मलयकेतु—(स्वगत) खरेंच ! (उघड) असें आहे, तर आपण पत्र देऊन कुसुमपुरास हा जासुद कां पाठविला होता ?

राक्षस—(समोर पाहून) अरे हा सिद्धार्थक ! सिद्धार्थका, कायरे हें ?

सिद्धार्थक—(लाजल्यासारखें करून) महाराज, रागें भरूं नये ! मला मार सोसवेना, ह्मणून आपला निरोप माझ्यानें गुप्त ठेववला नाहीं.

राक्षस—माझा निरोप ! कोणता रे बाबा ? तूं ह्मणतोस यांतलें मला कांहींच ठाऊक नाहीं !

सिद्धार्थक—हे मला जेव्हां मारूं लागले, तेव्हां—(इतकें अर्धेच बोलून भयानें तोंड खालीं घालून उभा राहतो.)

मलयकेतु—भागुरायणा, हा मनुष्य आपल्या धन्यास भितो, व त्याच्यादेखत सांगावयास लाजतो. तर तूंच अमात्यांस सर्व सांग.

भागुरायण—अमात्या, हा मनुष्य सांगतो कीं, अमात्य राक्षसांनीं आपल्याजवळ पत्र देऊन व निरोप सांगून आपल्याला चंद्रगुप्ताकडे पाठविलें आहे.

राक्षस—सिद्धार्थका, खरेंच कायरे तूं असें ह्मणालास ?

सिद्धार्थक—(लाजल्यासारखें करून) महाराज, मला मारूं लागले, तेव्हां—

राक्षस—राजकुमारा, हें सारें खोटें आहे ! मारूं लागलें असतां कोण काय बोलणार नाहीं ?

मलयकेतु—भागुरायणा, तें पत्र दाखीव आणि निरोप ह्यांचा चाकरच ह्यांनां सांगेल.

(भागुरायण पत्र वाचून दाखवितो.)

राक्षस—(पत्र वाचून पाहून) राजकुमारा, हें सारें शत्रूचें कृत्य आहे !

मलयकेतु—रिकामें पत्र पाठवूं नये, ह्मणून आपण एक अलंकारहि पाठविला आहे, असें असतां हें शत्रूचें कृत्य ह्मणणें संभवत नाहीं. (अलंकार दाखवितो.)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस--(अलंकार पाहून) राजकुमारा, हा अलंकार मीं पाठविला नाहीं. कोणा एका प्रसंगीं संतुष्ट होऊन या सिद्धार्थकाला मीं हा वक्षीस दिला होता.

भागुरायण--अमात्या, असला अलंकार आणि त्यांतहि राजकुमारानें प्रसन्न होऊन आपल्या अंगावरून काढून दिलेला असतां तो वक्षीस द्यावयास हा मनुष्य पात्र दिसत नाहीं!

मलयकेतु--सिद्धार्थक अत्यंत विश्वासू आहे, ह्यापासून निरोप ऐकावा, असें आपण पत्रांत लिहिलें--

राक्षस--राजकुमारा, कोणाचा निरोप आणि कोणीं पत्र पाठविलें? हा लेखच मुळीं आमचा नाहीं!

मलयकेतु--ही मोहोर कोणाची आहे?

राक्षस--कपटी लोक खोट्या मोहोराहि करावयास चुकत नाहींत!

भागुरायण--राजकुमारा, अमात्यांचें ह्मणणें खरें दिसतें. तसेंहि कदाचित् घडूं शकेल.

मलयकेतु--(सिद्धार्थकास) हा लेख कोणीं लिहिला रे!

(सिद्धार्थक राक्षसाकडे पाहून तोंड खालीं घालून उगाच राहतो.)

भागुरायण--अरे भल्या माणसा! आतां उगीच मार खाऊं नकोस! खरें काय आहे तें लवकर सांग.

सिद्धार्थक--महाराज, हा लेख शकटदासानें लिहिला आहे.

राक्षस--राजकुमारा, जर हा लेख शकटदासानें लिहिला आहे, तर तो मींच लिहिला!

मलयकेतु--विजये, शकटदासास घेऊन ये.

प्रतीहारी--आज्ञा, महाराज.

भागुरायण--(स्वगत) चाणक्याचीं माणसें उगीच भलतेंसलतें सांगणार नाहींत. शकटदास येऊन पूर्वीं झालेली गोष्ट स्मरून हा लेख ओळखील, आणि ह्या विषयींची गोष्ट सांगेल, तर मलयकेतूला राक्षसाविषयीं आलेला संशय कदाचित् कमी होईल, आणि तसें झालें असतां नीट नाहीं. (उघड) राजकुमारा, शकटदास येथें येऊन राक्षसासमक्ष हा लेख आपण लिहिला आहे असें कधींहि कबूल करणार नाहीं. तर ह्या अक्षरासारख्या अक्षराचें दुसरें पत्र त्याकडून लिहवून आणून ह्या पत्रास लावून पहावें, ह्मणजे ह्या गोष्टीचा निर्णय होईल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलयकेतु—ठीक आहे, तसें कां होईना? (प्रतिहारीस) विजये, जा, दुसरें पत्र घेऊन ये.

भागुरायण—राजकुमारा, इच्याकडून ती मुद्राहि आणवावी.

मलयकेतु—विजये, मुद्राहि घेऊन ये.

प्रतीहारी—आज्ञा महाराज. (जाऊन कांहीं वेळानें पुनः येऊन) महाराज, हें शकटदासानें स्वहस्तानें लिहिलेलें पत्र, आणि ही मुद्रा.

मलयकेतु—(पत्र आणि मुद्रा दोन्ही पाहून) कां अमात्या, अक्षरें मिळतात कीं नाहीं?

राक्षस—(स्वगत) हीं अक्षरें तर मिळतात! तरी पण शकटदास ज्ञा परम मित्र आहे, तो असें कपट करील हें मात्र जुळत नाहीं! काय, शकटदासानें हें पत्र लिहिलें असेल?

स्थिरयश विसरोनी पुत्रदारास्मृतीनें,
तशि विसरुनि भक्ती स्वामिची, दुर्मतीनें,
त्यजुनि शकटदासें आपुलें तें सुशील,
अतिचल धनलोभें कृत्य केलें असेल? १

अथवा, त्यानें हें कृत्य केलें असेल, असा आतां संशय तरी कशाला पाहिजे?

हा सिद्धार्थक तत्सखा, अणिक ही मुद्रा असे तत्करीं,
लेखाशीं दुसराहि लेख मिळतो, झाली अतां खातरी!
संधि प्राणभयें करोनि रिपुशीं, स्वामिप्रती अंतर
देवोनी, शकटें अकृत्य रचिलें, ही साक्ष दे [1]अंतर. १

मलयकेतु—अमात्या, आपण चंद्रगुप्तास असें लिहिलें आहे कीं, 'तुह्मीं तीन अलंकार पाठविले, ते आपणास पावले.' बरें, त्यांतील हा अलंकार काय? (राक्षसाच्या अंगावरील अलंकाराकडे पाहून स्वगत) हरहर! हा अलंकार पूर्वी आमच्या तातानें अंगावर घातला होता. (उघड) अमात्या, हा अलंकार आपणाजवळ कोठून आला?

राक्षस—एका उदम्यापासून विकत घेतला.

मलयकेतु—(प्रतीहारीस) विजये, हा अलंकार तुझ्या ओळखीचा आहे काग?

---

१ अंतःकरण.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रतीहारी—(अलंकाराकडे पाहून डोळ्यांत पाणी आणून) राजकुमारा, ओळखीचा कसा नसेल ? पूर्वीं हा अलंकार पर्वतेश्वर महाराज अंगावर घालित असत, तेव्हां मीं फार वेळां पाहिला आहे !

मलयकेतु—(डोळ्यांत पाणी आणून) हरहर, ताता ! ताता !

पद.

भूषणेंच तीं हीं आतां, दुःखचि मज देती ताता ! ॥धृ०॥
भूषण तूं सकल कुलाला, होतासी शशिसमकांता !
भूषणांसि भूषण अंगें असतांही तुझिया [१]स्वांता
त्यांची बहु आवड होती, तुज [२]रिपुघनतिमिरनिशांता ! १
घालुनि हीं अंगावरतीं शोभलास तूं नृपचंद्रा !
आली तुज शोभा जैंवी, नक्षत्रें शारदचंद्रा;
पाहतां नयनें झालीं अनिमिष हीं, टाकुनि तंद्रा. २
तुझिया जीं अंगा योग्य, होतीं तीं टाकुनि कैसा
गेलासी ? मोठा भोगी नाहीं वा जगिं तुजऐसा.
अत्यंत प्रेम सुताचें विसरलासि निर्दय जैसा ! ३
भूषणेंच तीं हीं आतां, दुःखचि मज देती ताता !

राक्षस—(स्वगत) काय, पर्वतेश्वरानें पूर्वीं अंगावर घातलेलीं हीं भूषणें ह्मणतो ? (उघड) हीं भूषणें ज्या जवाहिऱ्यापासून आह्मीं घेतलीं, त्याला चाणक्यानेंच कपटानें आमच्याकडे पाठविला, ह्यांत संशय नाहीं !

मलयकेतु—अमात्या, हीं भूषणें पूर्वीं आमच्या तातानें अंगावर घातलेलीं होतीं; तो वारल्यावर चंद्रगुप्ताच्या हातीं तीं लागलीं. तीं हीं भूषणें विकण्याएवढी चंद्रगुप्ताला अडचण पडली नव्हती. असें असतां चंद्रगुप्तापासून जवाहिऱ्याच्या द्वारानें घेतलीं, असें आपण सांगतां, हें संभवतें कसें ? अथवा, तुह्मीं हीं चंद्रगुप्तापासून विकत घेतलीं ह्मणतां, तेंच खरें ! पहा—

अधिक लाभाची होऊनि मनीं आशा,
चंद्रगुप्तें भूषणें [३]दुर्जनेशा !
विकत दिधलीं तूजला, अह्मां तूं रे !
कल्पियेलें तन्मूल्य दिसे क्रूरें. १

---

१ अंतःकरणाला. २ शत्रु हाच अत्यंत अंधकार त्यास प्रातःकाळ. ३ दुर्जनश्रेष्ठा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—(स्वगत) शत्रूनें मसलत तर उत्कृष्ट प्रकारची रचली! पहा—

नाहीं लेख मदीय हें ह्मणुं तरी, मुद्रा मदीया असे!
मैत्री सोडियली मदीय शकटें, श्रद्धेय हें तों नसे;
मौर्यानें विकिलें स्वभूषण असें बोलूं तरी, हें खरें
मानी कोण? अजी कबूल करणें हें फार वाटे बरें! १

मलयकेतु— आर्या, मी आपल्याला विचारतों—

राक्षस—(डोळ्यांत पाणी आणून) जो आर्य असेल त्याला विचार. आह्मी आतां अनार्य झालों!

मलयकेतु—

त्वत्स्वामीचा पुत्र असे तो, मित्रपुत्र मी होय,
आज्ञा मानुनि आनंदें मी वंदितसें तव पाय! १
मौर्य असे तो बहुधनदाता, आहे मी वश तूतें,
तुझ्या मतानें वागतसें मी, टाकुनियां कितूतें. २
तिकडे सत्काराचें दास्यचि अमात्य पदवी होय,
इकडे धनीच असशी, तुजला उणेपणा तो काय? ३
न कळे! तुजला स्वार्थाशा तरि अधिक कोणती आहे,
अनार्यपण जी तुजला आणी? सांग मला लवलाहें! ४

राक्षस—राजकुमारा, तूं लोकव्यवहार उत्तम जाणतोस. तूं फारच योग्य बोललास. ह्या तुझ्या बोलण्यांतच याचा निर्णय झाला. कां तर, ('त्वत्स्वामीचा पुत्र असे तो' ह्याच साक्या प्रथम द्वितीय पुरुष बदलून ह्मणतो.)

मलयकेतु—(पत्र आणि दागिन्यांचा डबा दाखवून) अमात्या, ह्याविषयीं आपण काय ह्मणतां?

राक्षस—(डोळ्यांत पाणी आणून) विधिविलसित! चाणक्यांकडे कांहीं नाहीं! कारण—

भृत्यपणा अति अनादराचें गृहचि असे हें साचें,
त्यांत राहतां तिळभरि वारें नाहीं सौख्यरसाचें. १
स्थिरबुद्धी जे कृतज्ञ राजे लोकपरीक्षक होते,
लेखित होते, दया करुनि जे पुत्रापरि भृत्यांतें; २
तयांस नेलें लया जिनें, हो! जी ठकवी मनुजांचा
प्रयत्न, त्या नियतीचा आहे सर्व खेळ हा साचा! ३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलयकेतु--(रागावून) काय, अझूनहि सारें दैवावर लोटतोस ? आपलें कृत्य कांहींच कबूल करित नाहींस ? अरे अधमा !

दुष्टा ! ती विषकन्यका करुनियां, धाडोनियां त्वां तिला,
माझा तात, तुझ्यावरी बहुत जो विश्वस्त, तो मारिला;
आतांही बहु गौरवीत असतां तूंतें, अरीतें असा
माझें मांस विकोनि, जोडिशि कशी तत्प्रीति तूं राक्षसा? १

राक्षस—(स्वगत) हे तर दुःखावर डाग होत ! (कानांत बोटें घालून उघड) शिव ! शिव ! पर्वतेश्वरावर विषकन्येचा प्रयोग करणारा असा मी पापी नाहीं !

मलयकेतु--तर मग, माझ्या ताताला कोणीं मारिलें ?

राक्षस--कोणीं मारिलें हें दैवाला विचार !

मलयकेतु—(रागावून) दैवाला विचारूं काय ? क्षपणक जीवसिद्धि याला विचारूं नको ?

राक्षस—(स्वगत) काय ? क्षपणक जीवसिद्धिदेखील चाणक्याचाच फितुरी ? आतां पराकाष्ठा झाली ! माझें काळीजसुद्धां शत्रूच्या वश्य झालें म्हटलें पाहिजे !

मलयकेतु--(रागावून) भासूरका, शिखरसेन नांवाच्या सेनापतीस जाऊन सांग कीं, राक्षसाच्या द्वारें आमच्याशीं मैत्री करून आमच्या घातासाठीं टपून बसलेले, व चंद्रगुप्ताचें हित इच्छिणारे, जे कुलूत देशाचा राजा चित्रवर्मा, सिंधुदेशाचा राजा सुषेण, मलयदेशाचा राजा सिंहनाद काश्मीर देशाचा राजा पुष्कराक्ष आणि पारसीक देशाचा राजा मेघाक्ष, हे राजे, ह्यांपैकीं पहिले तिघे माझें राज्य घेण्याची इच्छा करित आहेत, तर त्यांनां मोठी खांच करून तींत जीवंत पुरून टाकावें, आणि बाकीचे दोघे माझे हत्ती घेण्याची इच्छा करित आहेत, त्यांनां हत्तींच्या पायाखालीं मारून टाकावें !

भासूरक—आज्ञा महाराज.

[जातो.

मलयकेतु—(रागानें) अरे राक्षसा ! मी विश्वासघातकी राक्षस नव्हें, मलयकेतु आहें ! तुला सोडून देतों, जा, खुशाल जाऊन चंद्रगुप्ताचा आश्रय कर!

चाणक्य, मौर्य, तूंही तिघेहि मजवरि तुह्मी जरी आलां,
मी एकटा तुह्मांला उपडिन दुर्नय जसा त्रिवर्गाला. १

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भागुरायण—राजकुमारा, आतां उगीच कालहरण कां करावें ? लवकर आमच्या सैन्यांनीं जाऊन कुसुमपुरास गराडा घालावा, ह्मणजे झालें.

आमुची अश्वसेना आतां, खुरें करोनि भूमी तुडवितां,
धूळी उडोनि गगनप्रांता, झांको मेघमंडलापरी. १
त्या धूळीचें पटल, लोध्ररजःकणधवल,
जे गौडांगनांचे कपोल, त्यांस आणो मलिनत्व. २
त्यांचे केश अत्यंत नील, जैसें कां भ्रमरकुल!
त्यांसही करोनि शवल, चोहींकडे प्रसार पावो. ३
हत्तीचें मदसलिल, भूतळीं पडतां छिन्नमूल,
होवोनियां धूलीपटल, शत्रूंच्या मस्तकीं पडो. ४

[मलयकेतु सेवकांसहवर्त्तमान जातो.

राक्षस—(दुःख पाहून) हरहर! फार वाईट झालें! ते विचारे चित्रवर्मादिकहि सर्व नष्ट झाले! ह्यावरून असें वाटतें कीं, माझा हा सारा उद्योग शत्रूचा नाश न करतां माझ्या मित्रांचाच नाश करित आहे! आतां म्यां हतभाग्यानें करावें तरी काय ?

जावें मीं जरि तपोवनाला, वैर मनीं हें आहे,
त्याची शांती तपें बहुतही करोनि कधिंही नोहे. १
शत्रू असतां जिवंत, जँरि मीं स्वामिपथानें जावें,
तरि दुर्बळ ज्या स्त्रिया तयांचें साम्य करूनी घ्यावें! २
खड्ग उपसुनी घेउनि हातीं, रिपुसैन्यावरि पडणें
हेंचि योग्य! परि चंदनदासा मज आहे सोडविणें. ३
बहुत उपकार त्या मित्राचा माझ्या माथीं आहे,
मी त्यातें जरि न सोडविन तरि कृतघ्नता मज राहे. ४

[जातो.

[पांचवा अंक समाप्त.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंक ६ वा.

प्रवेश १ ला.

[स्थळ—कुसुमपुरांतील राजमार्ग. सिद्धार्थक प्रवेश करितो.]

सिद्धार्थक—(प्रवेश करून स्वगत)

जो जलद्नील[1] केशव केशिविघातक,[2] तयास जय लाहो,
सज्जननयनां चंद्रचि ! तो विजयी चंद्रगुप्तही राहो. १
चाणक्याची नीती सर्वोत्कर्षें असे, स्वसेनेला
न करुनिही सज्ज, जिनें सर्वहि रिपुपक्ष परिभवा नेला ! २

पुष्कळ दिवसांत माझा प्रियसखा समिद्धार्थक मला भेटला नाहीं, त्याची भेट घ्यावी. (इकडे तिकडे फिरून पाहून) अरे, हा माझा प्रियसखा समिद्धार्थक इकडेच येत आहे !

समिद्धार्थक—(प्रवेश करून)

मना योग्यही, वैभव, मित्रावांचुनि गोड न वाटे,
उत्सवकाळीं रडतां रडतां कंठ बहुतचि दाटे. १
बोलत चालत असतां तत्स्मृति होउनि, न सुचे कांहीं,
इकडे तिकडे फिरतां तापचि होय, परी सुख नाहीं. २

मलयकेतूच्या कटकांतून माझा प्रिय मित्र सिद्धार्थक इकडे आला आहे, असें ऐकतों. तर आतां त्याचा शोध करावा. (इकडे तिकडे फिरून पाहून स्वगत) अरे वा:, हा सिद्धार्थक इकडेच येत आहे ! (पुढें होऊन उघड) मित्रा सिद्धार्थका, खुशाल आहेसना ?

सिद्धार्थक—होय, खुशाल आहें. समिद्धार्थका, बरा भेटलास, मी तुझ्याकडेच येत होतों. तूं खुशाल आहेसना ?

समिद्धार्थक—प्रिय मित्रा, मला सुख कसें असेल बरें ? तूं पुष्कळ दिवसांनीं प्रवासांतून आलास, तेव्हां खरें ह्मटलें तर तूं माझ्या घरीं अगोदर येऊन आपला सर्व वृत्तांत मला सांगून मग दुसरेकडे जावें. तसें न करितां अद्यापि माझ्या घरींहि आला नाहींस—

सिद्धार्थक—मित्रा, क्षमा कर. मला पाहतांच चाणक्यभटजींनीं 'चंद्रगुप्ताला एक प्रिय वृत्तांत कळवून ये' अशी आज्ञा केली; त्याप्रमाणें चंद्रगुप्ताला चाणक्याचा

---

१ मेघासारखा नीलवर्ण. २ केशिनांवाच्या दैत्याचा नाशक.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तो निरोप सांगून व त्याच्यापासून हें बक्षीस घेऊन, हा आतांच तुझी भेट घेण्यासाठीं तुझ्या घराकडेच चाललों होतों, तों तूंच भेटलास.

समिद्धार्थक—प्रिय मित्रा, सांगावयास हरकत नसेल, तर तूं चंद्रगुप्त महाराजांस जो प्रियवृत्तांत सांगितला तो, ऐकण्याची माझी फार इच्छा आहे.

सिद्धार्थक—मित्रा, तुलाहि न सांगण्याजोगा वृत्तांत कोणता असणार ? सांगतों ऐक. चाणक्यभटजींच्या नीतीनें त्या मूर्ख मलयकेतूच्या मतीस मोह झाला. त्यानें राक्षसास घालवून देऊन चित्रवर्मादि पांच मुख्य मुख्य राजांस जीवें मारिलें. त्यावरून हा मलयकेतु अविचारी व दुष्ट आहे, असें समजून बाकीचे राजे त्याचें कटक सोडून आपापल्या फौजेसकट आपापल्या देशीं चालते झाले. नंतर भद्रभट, पुरुदत्त, हिंगुरात, बलगुप्त, राजसेन, भागुरायण, लोहिताक्ष, आणि विजयवर्मा यांनीं त्या मलयकेतूला धरून कैद केलें.

समिद्धार्थक—मित्रा, भद्रभटादिक राजे चंद्रगुप्त महाराजांशीं बिघडून मलयकेतूस मिळाले, असें लोक ह्मणतात. असें असतां, अडाणी कवीच्या नाटकांत मुखसंधींत एक आणि निर्वहणसंधींत दुसरेंच, असा उपक्रमोपसंहाराचा जसा विरोध असतो, तसा या राजांच्या पूर्वापार आचरणांत विरोध दिसतो, हें काय ?

सिद्धार्थक—मित्रा, चाणक्यभटजींच्या नीतीला नमस्कार असो ! जशी दैवगति अतर्क्य, तशीच ही चाणक्याची नीति अतर्क्य आहे, तिचा पार कोणाला लागला आहे ?

समिद्धार्थक—बरें, पुढें काय झालें ?

सिद्धार्थक—पुढें, चाणक्यभटजींनीं आपल्या सैन्याची तयारी करून मलयकेतुकडून आलेल्या राजांशीं त्यांच्या सेनेसहवर्तमान संधि केला.

समिद्धार्थक—मित्रा, कोठें संधि केला ?

सिद्धार्थक—

जेथें हे जलदगंभीरनादहस्ती[१]
वर्षोनी मद, करिताति फार मस्ती;
घोडेही उडति पहा कशाभयानें[२],
जिंकाया रिपुस तयार हे रयानें[३] १

१ मेघासारखा ज्यांचा नाद गंभीर आहे, असे हत्ती. २ चाबुकाच्या भयानें. ३ वेगानें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समिद्धार्थक—प्रिय मित्रा, हें सर्व असो; परंतु सर्व लोकांच्या देखत चाणक्य भटजींनीं अधिकार टाकला असतां पुन्हा त्यांनीं तोच प्रधानाचा अधिकार कसा पतकरला रे ?

सिद्धार्थक—मित्रा, मला वाटतें तूं अगदींच मूर्ख आहेस ! अरे, अमात्य राक्षस अत्यंत शहाणा असून त्यालाहि जिचा अंत लागला नाहीं, त्या चाणक्य भटजीच्या बुद्धीचा अंत पहावयास तूं इच्छितोस, तेव्हां तुला काय ह्मणावें ?

समिद्धार्थक—मित्रा, बरें, तो अमात्य राक्षस आतां कोठें आहे ?

सिद्धार्थक—मलयकेतूच्या सैन्यांत जेव्हां प्रलय गुदरला, तेव्हां तो तेथून निघून इकडे कुसुमपुराकडेच आला, असें उंदुरक नांवाच्या एका गुप्त बातमीदारानें चाणक्यभटजींस कळविलें आहे.

समिद्धार्थक—मित्रा, तो अमात्य राक्षस तर नंदाचें राज्य पुन्हा हस्तगत करण्याची प्रतिज्ञा करून नगरांतून बाहेर गेला होता. तो ती प्रतिज्ञा पूर्ण केल्याशिवाय पुनः ह्या कुसुमपुरांत कसा आला रे ?

सिद्धार्थक—मला वाटतें, चंदनदासाच्या स्नेहानें त्याला नगरांत आणिलें.

समिद्धार्थक—मित्रा, खरेंच काय रे, चंदनदासाच्या स्नेहानें तो आला ? बरें, चंदनदास बंदांतून सुटला काय ?

सिद्धार्थक—बंदांतून सुटण्यासारखें त्या बापड्याचें पुण्य कोठें आहे ? चंदनदासाला तूं आणि मीं या दोघांनीं वध्यस्थानांत नेऊन सुळीं द्यावें, अशी चाणक्य भटजींची आपणांस आज्ञा झाली आहे.

समिद्धार्थक—(रागावून) चाणक्याजवळ कोणी दुसरे मांग राहिले नाहींत, ह्मणून तो हें नीच काम आह्मां ब्राह्मणांस सांगतो ?

सिद्धार्थक—मित्रा, ज्याला मनुष्यलोकीं रहावयाची इच्छा आहे, त्यानें चाणक्याची आज्ञा मोडून उपयोग नाहीं ! तर चल कसा, आपण दोघे चाण्डालाचा वेष घेऊन त्या चंदनदासाला वधस्थानीं घेऊन जाऊं.

[जातात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवेश २ रा.

[**स्थळ**—कुसुमपुरांतील जीर्णोद्यान. एका झाडाखालीं हातांत पाश घेऊन दीर्घशृंग उभा आहे, असा प्रवेश.]

दीर्घशृंग—

षड्गुण[1]संयोगदृढा, सदुपायांचा जिच्या मुखीं पाश
चाणक्यनीतिरज्जू, बांधुनि रिपुचा करीतसे नाश. १

चाणक्याच्या उंदुरक नांवाच्या बातमीदारानें सांगितलेलें ठिकाण हेंच. येथें अमात्य राक्षसाची भेट घेण्याविषयीं मला चाणक्याची आज्ञा झाली आहे. वाः ! हा अमात्य राक्षसहि तोंडावर बुरखा घेऊन इकडेच येत आहे! आतां मी ह्या वृक्षाच्या आड उभा राहून राक्षस कोठें बसतो, तें पाहतों.

(वृक्षाच्या आड उभा राहतो.)

राक्षस—(प्रवेश करून, डोळ्यांत पाणी आणून) हरहर! काय दुःख सांगावें हो?

होतां आश्रयनाश जेंवि कुलटा[2] गोत्रांवरी जातसे,
गेली श्री तशि; सर्व लोकहि तिच्यामागून गेले कसे !
आप्तांनींहि समस्त भार त्यजिला, देखोनि यत्नाहती,
किंवा मस्तक गेलियावरि दुजीं[4] अंगें कशीं राहती ? १

भुवनपति जो अत्यंत कीं कुलीन,
सगुणनृपती सर्वांस मान्य लीन,
पाहुनि श्री थोडकें मिष, तयास
त्यजुनि गेली; काय मी करूं यास ? १

[5]मत्तवृषलीतुल्य ही नीचसक्त
असे झाली, फारची हें अयुक्त;
यत्न अमुचा सर्वही व्यर्थ जाय,
दैव शत्रूतुल्य हें आड होय. २

---

१ संधिविग्रहादि गुण; पक्षीं दोघांचा संयोग ह्मणजे योजना. २ व्यभिचारिणी स्त्री. ३ यत्नाचा विघात. ४ येथें नंदराजास मस्तकाची व कारभाऱ्यांस इतर अंगांची उपमा गर्भित आहे. ५ उन्मत्तदासीसारखी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तशा मृत्युला योग्य नव्हे तो राजा स्वर्गी गेला,
पर्वतनृपतिस राज्य द्यावया प्रयत्न बहु मीं केला. १
त्याच्यामागें तत्पुत्राला राज्य द्यावयासाठीं,
मनापासुनी झटोनि केली दुर्घट खटपट मोठी. २
सिद्धीला ती गेली नाहीं, दैवचि नंदकुलाचें
शत्रू आहे, दोष नसति त्या विप्रा चाणक्याचे ! ३

हा म्लेंच्छ मलयकेतु किती हो मूर्ख आहे पहा !

'जो, स्वामी गतले तरी, करितसे त्यांचेंहि शुश्रूषण,
संधी तद्रिपुशीं कसा करुनियां घेईल तो दूषण?'
हें त्या म्लेंच्छनृपें मनांत अपुल्या कांहींच कीं नाणिलें!
सत्यासत्यविवेक कोठुनि तयां ? दैवें जयां सांडिलें ! १

तरी, हा नांवाचा राक्षस आहे ह्मणावें ! हा जरी शत्रूच्या हस्तगत झाला आहे, तरी अरण्यांत निघून जाईल, परंतु चंद्रगुप्ताशीं संधि ह्मणून कधींहि करणार नाहीं ! अथवा, आपली प्रतिज्ञा शेवटास गेली नाहीं ह्मणून लोकांत अपयश आलें तरी चिंता नाहीं; परंतु शत्रूच्या स्वाधीन होणें हें फारच अयोग्य आहे ! (चोहोंकडे पाहून डोळ्यांत पाणी आणून) राजाधिराज नंदानें संचार करून जी पवित्र केली, तीच ही भूमी होय ! येथें—

[१]शाङ्र्गप्रत्यंचेच्या करितां प्रसार संकोचांला,
हातीं धरिला लगाम तेणें सईल जरिही झाला; १
तरि अति निपुणें दैवें वेगें धाववुनी अश्वातें,
[२]चललक्ष्यातें तत्क्षण खालीं पाडियलें शरघातें. २
येथें माझ्यासवें प्रभूचें प्रिय भाषण बहु झालें;
ह्या वृक्षांच्या राइंत आह्मीं विश्रांतीतें केलें ! ३
त्या राजाविण सांप्रत मजला कुसुमपुराच्या भूमी,
तीव्र होतसे दुःख, देखुनी; उपाय काय करूं मी ? ४

मंदभाग्य मी, आतां जाऊं तरी कोठें ? (सभोंवार पाहून) समोर ही जुनी बाग दिसत आहे, हींत जाऊन चंदनदासाचा कांहीं वृत्तांत समजला तर पाहूं. (इकडे तिकडे फिरून स्वगत) काय चमत्कार आहे हो हा ! मनुष्यास उच्चनीच दशा

---

१ शृंगाच्या धनुष्याच्या दोराचा. २ उडत्या पाखरातें किंवा हरिणादिकांतें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केव्हां व कशा येतील, याचा कांहीं नियम नाहीं ! पहा,

माझ्याभोंते सहस्रावधि नृप असतां मी पुरांतूनि जेव्हां
पूर्वी बाहेर येईं, नगरजन मला वोट दावूनि, तेव्हां
नव्येंदूतुल्य सारे बघत असत; तो मी इथें हीनमानें
जीर्णोद्यानांत आतां भिउनि भिउनियां जाइं चोरासमान ! १

अथवा, ज्यांच्या प्रसादानें मीं इतकें ऐश्वर्य भोगिलें, ते तरी आतां कोठें आहेत ? मग माझी अशी दशा झाली ह्मणून मीं खेद कां करावा ? (बागेंत प्रवेश करून पाहून) कायहो, हें जीर्णोद्यानहि किती उदास दिसत आहे—

मोठेंही कुळ लयास जाई जैसें, फिरतां काळ,
तैसें मोडुनि गेलें पाहीं सुंदर सौध विशाळ ! १
साधूचें मन सुहृद्विनाशें जातें सुकूनि जैसें,
येथिल सुंदर सारससरही वाळुनि गेलें तैसें ! २
विरुद्ध होतां दैव, सर्वही उपाय जाती वायां,
तैसे दिसती सर्वहि पादप निष्फळ उद्यानीं या ! ३
तृणें करोनी झांकुनि गेली भूमी अवघी साची,
कुसंग होतां, सुमती झांके जैशी मूर्खजनाची. ४

आणखी, येथें—

कुठारीनें छिन्न द्रुम वहुत आक्रोश करिती
जणों, वाटे मातें अविरतचि [4]कापोतविरुतीं !
[5]स्वनिर्मोकच्छेदें [6]पटशकल वृक्षव्रणिं, पहा,
तरुस्नेहें देती भुजग, [7]करुणा येउनि अहा ! १

हे सर्व वृक्ष दीनासारखे दिसत आहेत—

आंत शुष्क [8]अतिशोकक्षतिसम [9]कीटक्षतितें धरिती,
दुःखाग्नीनें दग्ध होउनी, वहुत मलिन हे दिसती. १
जाणों छायाविरहें दुःखित होउनि, मरणीं जाया,
कंटाळुनियां निघती तरु हे, प्राण आपुले द्याया. २

---

१ नूतनचंद्रासारखे. २ अपमानयुक्त. ३ राजाचा महाल. ४ कपोत पक्ष्यांचे शब्द. ५ आपल्या कांतीच्या तुकड्यानें. ६ वस्त्राच्या पट्ट्या. ७ करुणायुक्त. ८ शोकव्रणा सारखें. ९ किड्यांनीं केलेले व्रण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही येथें फुटलेली शिळा आहे, इच्यावर बसून अमळ विश्रांति तरी घेऊं. (शिळेवर बसून ऐकून) हा नौबतीच्या नादानें मिश्रित असा मंगलगायनाचा नाद अकस्मात् कोठून ऐकूं येत आहे बरें ? जो हा—

आधीं येउनि लोककर्णविवरीं शब्दांतरां[1] झांकतो,
प्रासादीं[2] मग गुप्त होउनि पुन्हा दिग्मंडळीं[3] फांकतो;
शंखाच्या ध्वनिनें अणीक पटहध्वानें[4] फुगोनी पहा,
नान्दीनाद[5] वघावया, जणुं निघे वेगें, दिगंतां[6] दहा ! १

(चिंतन करून) हां, समजलों. हा ध्वनि मलयकेतूला बांधल्यामुळें राजकुलाचा (इतकें अर्धेंच बोलून)—मौर्यकुलाचा अधिक संतोष सुचवित आहे. (डोळ्यांत पाणी आणून) हरहर, काय दुःख हो हें !

पूर्वीं दैवें शत्रुश्री मज दुरोनि आयकवीली,
मग डोळ्यांनीं अभिनयपूर्वक वळेंचि मज दावीली ! १
आतां तीचा प्रत्यक्षचि मज अनुभव द्यायासाठीं,
दुष्ट दैव हें, पहा लागलें कैसें माझ्यापाठीं ! २

दीर्घ०—(स्वगत) हा राक्षस येथें बसला आहे. आतां चाणक्यानें आज्ञा केल्याप्रमाणें करावें. (गळ्याभोंवतीं फांस लावून घेतो.)

राक्षस—(पाहून स्वगत) अरे, हा गळफांस घेतो आहे ? हा विचारा कोणीतरी माझ्यासारखाच कोणी दुःखी प्राणी असला पाहिजे. ह्याला विचारून पाहूं. (पुढें जाऊन उघड) अरे ! हें तूं काय मांडलें आहे ?

दीर्घ०—(डोळ्यांत पाणी आणून) अहो बाबा, काय सांगूं ! प्रिय मित्राच्या विनाशानें दुःखित झालेल्या आह्मासारख्या हतभाग्य जनानें जें करावें, तेंच मी करित आहें !

राक्षस—(स्वगत) हा विचारा कोणीतरी माझ्यासारखाच आर्त झालेला असावा, हें मी पूर्वींच समजलों होतों. (उघड) अरे बाबा, तूं आणि मी दोघे समदुःखी आहों. याकरितां जर कांहीं गुह्य नसेल व सांगावयाजोगें असेल तर तुझ्या प्राणत्यागाचें कारण काय तें मला सांग.

दीर्घ०—अहो बाबा, कांहीं गौप्य नाहीं किंवा महत्वाचेंहि नाहीं; परंतु माझ्यानें तें सांगवत नाहीं. कारण, प्रिय मित्राच्या विनाशानें माझें हृदय फार दुःखित

---

१ इतर शब्दांस. २ राजगृहांत. ३ दिशामंडलांत. ४ नगाऱ्याच्या शब्दानें. ५ मंगलगायनाचा. ६ दिशांचे शेवट.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे, ह्मणून तुह्मांला माझी गोष्ट सांगण्यास जो वेळ लागेल तितका वेळदेखील मरणास विलंब करणें मला साहवत नाहीं !

राक्षस—(श्वासोछ्वास टाकून स्वगत)याचें नांव मित्रत्व! नाहींतर आह्मी ! मित्रावर इतकें संकट आलें असतां अझून तिऱ्हाइतासारखे स्वस्थ बसलों आहों! यानें आह्मांला खरोखर खालीं पहावयास लाविलें. (उघड) बाबा, जर गौप्य किंवा महत्वाचें नसेल, तर तुझ्या दुःखाचें कारण काय आहे तें सांगच !

दीर्घ०—अहो बाबा, काय हा आग्रह? असो. काय होईल तें होवो, सांगतों, ऐका. ह्या नगरांत विष्णुदास नांवाचा एक वाणी आहे.

राक्षस—(स्वगत) हो आहे खरा; तो चंदनदासाचा अत्यंत मित्र आहे.

दीर्घ०—तो माझा अत्यंत प्रिय मित्र आहे.

राक्षस—(हर्षयुक्त होऊन स्वगत) अरे, हा प्रिय मित्र असें ह्मणतो, तर मग ह्याला चंदनदासाचा वृत्तांत खचीत माहीत असेल.

दीर्घ०—(डोळ्यांत पाणी आणून) त्यानें आपल्या घरांत जें काय होतें नव्हतें तें सर्व गरीब लोकांस वांटून सांप्रत अग्निप्रवेश करण्याकरितां तो नगरांतून बाहेर निघाला आहे. जोंपर्यंत आपल्या प्रिय मित्राचें वाईट वर्तमान कानीं पडलें नाहीं, तोंपर्यंत गळफांस घेऊन जीव द्यावा, यासाठीं मी ह्या जुन्या बागेंत आलों आहें.

राक्षस—बाबा, पण तुझ्या मित्रास अग्निप्रवेश करण्याचें कारण काय झालें ?

कीं दुःसाध्य महौषधींसहि, अशा रोगें असे गांजिला ?

दीर्घ०—बाबा, नाहीं हो नाहीं !

राक्षस—

अग्नीनें ? अथवा विषें ? वद नृपक्रोधें असे पीडिला ?

दीर्घ०—अहो बाबा, ही पापाची गोष्ट कशाला बोलतां ? चंद्रगुप्तराजा आपल्या प्रजेस कदापि पीडा करित नाहीं.

राक्षस—

कीं दुःखास, अलभ्य अन्यमहिला[१] वांछूनियां, पावला ?

दीर्घ०—(कानांत बोटें घालून) शिव शिव ! असे अमंगल शब्द उच्चारल्यास आपल्यालाहि पातक लागेल ! सामान्य वाण्याची जात ह्मटली ह्मणजे विनयाचें घर असतें; तशांत विष्णुदासाविषयीं तर ही शंकाच नको !

---

१ दुसऱ्याची स्त्री.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—अरे बाबा,

किंवा मित्रविनाशदुःखितमना त्वत्तुल्य तो कावला ?

दीर्घ०—होय बाबा, असेंच झालें आहे.

राक्षस—(आवेशानें स्वगत) ह्याच्या मित्राचा प्रिय मित्र चंदनदास आहे. अर्थात्, चंदनदासाचा नाशच विष्णुदासाच्या अग्निप्रवेशास कारण असावा! यावरून माझा जिवलग मित्र चंदनदास याच्यावर कांहीं अनर्थ गुदरलासें वाटतें! (उघड) तुझा प्रिय मित्र सुचरित विष्णुदास, स्वमित्रांविषयीं अत्यंत कनवाळू असल्यामुळें त्याचें चरित्र ऐकण्याची फार इच्छा आहे, तर विस्तारानें सांग.

दीर्घ०—अहो बाबा, क्षमा करा, आतां माझ्यानें मरणाला विलंब करवत नाहीं !

राक्षस—बाबा, ही कथा ऐकावयाजोगी आहे, ही मला सांगच !

दीर्घ०—आपणापुढें उपाय नाहीं ! सांगतों महाराज, ऐकावें. ह्या नगरांत सर्व जवाहिऱ्यांत श्रेष्ठ असा चंदनदास ह्मणून एक सावकार आहे, हें आपणास विदित असेलच.

राक्षस—(खेदयुक्त होऊन स्वगत) हं ! हें मित्रशोकाच्या दीक्षेंत प्रवेश करण्याचें द्वार दैवानें उघडें केलें ! मना ! अंमळ स्थिर हो बाबा ! कांहीं अत्यंत कष्टाचें वर्तमान तुला ऐकावयाचें आहे. (उघड) होय बाबा, तो चंदनदास आह्मांला विदित आहे. तो आपल्या मित्राविषयीं मोठा दयाळू आणि फार सज्जन आहे, असें ऐकतों. बरें, पण त्याचें काय झालें ?

दीर्घ०—तो चंदनदास विष्णुदासाचा अत्यंत मित्र आहे.

राक्षस—(स्वगत) हा शोकरूपी वज्राघात आतां अगदीं जवळ आला वाटतें !

दीर्घ०—विष्णुदासानें आपल्या परम मित्राच्या स्नेहास योग्य अशी चंद्रगुप्ताजवळ विज्ञप्ति केली.

राक्षस—सांग सांग, काय विज्ञप्ति केली ती—

दीर्घशृंग—अशी विज्ञप्ति केली कीं, “ महाराज, माझ्या घरीं कुटुंबपोषणापुरतें द्रव्य आहे, तें सर्व घेऊन माझा प्रिय मित्र चंदनदास ह्याला बंदींतून सोडून द्यावें.”

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—(स्वगत) शाबास, विष्णुदासा, शाबास! तूं मित्रस्नेह खरा करून दाखविला!

ज्यासाठीं परकीयवत् जनकही पुत्रास आलोकिती,
तैसे पुत्र पित्यास, मित्रहि तसे मित्रासही टाकिती;
पाहोनी व्यसनीं[1] स्वमित्र पडला, तूं द्रव्यही द्यावया,
वाणी होउनि, धैर्य तूं प्रगटिलें, तें योग्य वर्णावया! १

(उघड) बरें, मग चंद्रगुप्त काय ह्मणाला?

दीर्घश्रृंग—याप्रमाणें विनंति केल्यावर महाराज चंद्रगुप्तानें विष्णुदासास सांगितलें कीं, "आपण द्रव्यासाठीं चंदनदासास अडकावून ठेविलें नाहीं. तर त्यानें अमात्य राक्षसाचीं सर्व मुलेंमाणसें लपवून ठेविलीं आहेत तीं आमच्या हवालीं कर ह्मणून याला पुष्कळ वेळां सांगितलें तरी तो तसें करित नाहीं. चंदनदास जर तीं आमच्या हवालीं करील, तर त्याला आह्मी सोडून देऊं; नाहींतर त्याचा प्राणनाश होण्यासारखा त्याला दंड करूं, ह्मणजे दुसरा कोणी तसें करणार नाहीं." सांप्रत चंदनदासाला सुळीं देण्याच्या ठिकाणीं नेलें आहे. चंदनदासाची दुर्दशा जोंपर्यंत आपल्या कानीं पडली नाहीं, तोंपर्यंत आपण प्राणत्याग करावा, असा विचार करून अग्निप्रवेश करण्यासाठीं विष्णुदास नगरांतून बाहेर निघाला आहे; आणि जोंपर्यंत माझ्या त्या प्रिय मित्राचें दुष्ट वर्तमान मीं ऐकिलें नाहीं, तोंपर्यंत गळफांस घेऊन देहमुक्त व्हावें, असा विचार करून मीहि ह्या जुनाट बागेंत आलों आहें.

राक्षस—कायरे बाबा, चंदनदासाला मारिलें तर नाहीं ना?

दीर्घश्रृंग—अद्यापि त्याला मारिलें नाहीं. त्याच्यापाशीं अमात्य राक्षसाचीं मुलें पुनः पुनः मागत असतात; परंतु मित्रत्वास्तव तो तीं देत नाहीं. ह्या कारणानें लांबतें मात्र आहे; परंतु शेवटीं तो मरणार खचीत!

राक्षस—(हर्षयुक्त होऊन स्वगत) शाबास! मित्रा चंदनदासा! शाबास!

तूं एकलाचि साधो! मित्रावांचुनि कसें सुयश घेशी?
शरणागतास रक्षुनि, त्या शिबिलाही उणेपणा देशी? १

(उघड) अरे, तूं लवकर जा, आणि त्या विष्णुदासाला अग्निप्रवेश करूं नको ह्मणून सांग; मीहि चंदनदासाला मरणापासून सोडवितों.

दीर्घश्रृंग—महाराज, आपण चंदनदासाला सोडवितों ह्मणतां, पण कोणत्या उपायानें त्याला मरणापासून सोडविणार?

---

१ संकटांत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—(तरवार उपसून) संकटकाळची मैत्रीण जी ही तरवार, हिनें सोडवितों. पहा—

[१]निर्मेघाकाशतुल्या लखलख करिते [२]मत्करप्राप्तसख्या,
युद्धश्रद्धेकरोनी पुलकितचि जणों [३]वीरलोकाप्तसंख्या,
संग्रामाच्या कसोटीवरि रिपुंनिं जिची दृष्ट आहे परीक्षा,
मित्रस्नेहें मला ही विवश करुनियां साहसीं देइ दीक्षा. १

दीर्घश्रृंग—महाराज, चंदनदास वांचण्याचा एक उपाय मीं ऐकिला आहे; परंतु ह्या संकटदशेंत असल्यामुळें त्या उपायानें तो वांचेलच, असें माझ्यानें निश्चित सांगवत नाहीं. (पुढें पाहून चरणांवर पडून) सुगृहीत आहे नाम ज्यांचें, असे अमात्य राक्षस ज्यांनां ह्मणतात ते आपणच आहां, असें मला वाटतें; परंतु कृपा करून माझा संशय आपण घालवावा.

राक्षस—अरे बाबा, आतां मला सुगृहीतनामा ह्मणणें शोभत नाहीं! ज्यानें आपल्या स्वामींचा नाश अनुभविला, जो मित्रविनाशाला हेतु झाला, असा अत्यंत नीच राक्षस तो मीच आहे!

दीर्घ०—(हर्षानें पुन्हा चरणांवर पडून) महाराज, आज मी कृतार्थ झालों. कारण, ह्या प्रसंगांत मला आपली भेट झाली. आतां मजवर दया असूं द्यावी.

राक्षस—बाबा ऊठ, ऊठ, आतां कालहरण करूं नको. जा, विष्णुदासाला जाऊन सांग कीं, राक्षस चंदनदासाला मरणापासून सोडवितो, काळजी करूं नको! ('युद्धश्रद्धेकरोनी' हा श्लोक पुन्हा ह्मणून, तरवार उपसून इकडे तिकडे फिरतो.)

दीर्घ०—(चरणांवर पडून) महाराज, मी बोलतों हें कृपा करून ऐकावें. पूर्वीं ह्या नगरांत दुष्ट चंद्रगुप्तानें त्या बिचाऱ्या शकटदासाचा वध करावा ह्मणून आज्ञा केली; परंतु वधस्थानावरून कोणीं शकटदासाला सोडवून पळवून देशांतरास पोहोंचविलें, तेव्हां "तुमचें शकटदासास अंग आहे, ह्मणून सुस्ती करून तुह्मीं शकटदासास सोडून दिलें," असें ह्मणून त्यानें जितके घातक लोक होते, तितक्यांचीं डोकीं मारून त्या घातकांच्या वधरूपी जळांत आपला क्रोधाग्नि शांत केला. तेव्हांपासून घातक लोकांनीं वध्य मनुष्याच्या मागें किंवा पुढें शस्त्रधारी पुरुष पाहिला असतां, त्या बापड्यास मारण्याच्या ठिकाणीं नेण्याची वाट न पाहतां,

---

१ मेघरहित आकाशासारखी. २ माझ्या हातीं निरंतर असणारी. ३ वीरलोकांत विख्यात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ते आपल्या जिवाच्या भयानें त्याला अर्ध्या वाटेंतच मारून टाकतात. ह्मणून आपल्याला हातांत शस्त्र घेऊन चंदनदासाकडे येतांना घातक लोकांनीं पाहिलें तर ते तत्काळ चंदनदासाचें डोकें उडवितील. यासाठीं आपल्याला सुचवित आहें.

[जातो.

राक्षस—(स्वगत) कायहो सांगावें ? ह्या बेट्या चाणक्याची मसलत कोणालाहि कळावयाची नाहीं ! पहा,

शकटदास तो शत्रुमतानें माझ्याजवळीं आला
असें ह्मणावें, तरि शत्रूनें तन्मोचक जे त्यांला १
मारियलें कां ? किंवा स्वमतें मत्संनिध तो येतां,
कपटलेख तो असतां, माझा ऐसें कधीं न ह्मणता. २

(विचार करून) ह्मणून,

नाहीं खड्गप्रसंग, प्रथम वधियलें शत्रुनें घातकांतें,
योजावी नीति आतां, तरि बहु दिवसीं देतसे ती फलातें,
माझ्यासाठीं विपत्ती बहु सहन करी जो, उपेक्षा धरावी
कैशी त्याची ? तरी हे उचित निजतनू मूल्य त्याला करावी. १

[सहावा अंक समाप्त.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंक ७ वा.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**—नगराबाहेरील वधस्थान. चाण्डाल प्रवेश करितो.]

चाण्डाल—महाराज बाजूला व्हा, बाजूला व्हा ! हे मान्यजनहो, समजून उमजून चाला. ऐका—

पुरुषें अपथ्य करितां व्याधी किंवा मृतीहि होत असे,
राजापथ्यें तत्क्षण कुळ नाशातें समग्र पावतसे. १
पोरें बाळें, विभवें, आणिक जीवित तुह्मां जरी व्हावें,
राजापथ्य तुह्मीं तरि कायावाचामनें त्यजुनि द्यावें. २

राजाशीं विपरीत न वागण्याची गोष्ट तुह्मी जर ध्यानांत न ठेवाल, तर ह्या चंदनदासाची दुर्दशा काय झाली आहे ही पहा ! हा राजाशीं विपरीत वागला, ह्मणून याला पोरांबाळांसुद्धां सुळावर देण्याकरितां चालविलें आहे. (आकाशाकडे तोंड करून आपणाशींच) काय ह्मणतां ? "चंदनदासाला सोडविण्याचा कांहीं उपाय आहे कीं काय ?" दादांनों, त्या हतभाग्याला सोडविण्याचा आतां कोठचा उपाय राहिला आहे ? होय. अझूनहि एक उपाय आहे खरा. हा चंदनदास जर अझूनहि त्या अमात्य राक्षसाचीं मुलेंमाणसें राजाच्या हवालीं करील, तर बरीक ह्या संकटांतून सुटेल. (पुनः आकाशाकडे तोंड करून) काय ह्मणालां ? "हा चंदनदास शरणागताविषयीं अत्यंत दयाळू आहे, तें अकार्य हा कदापिहि करणार नाहीं !" असें का ? मग नाइलाजाची गोष्ट आहे! हे श्रेष्ठांनों ! वांचला तर ह्याच उपायानें त्याचा प्राण वांचेल. आतां दुसरा उपायच राहिला नाहीं ! व्हा, बाजूला व्हा, वाट सोडा !

(इतक्यांत ज्याच्या पाठीमागें दुसरा एक चाण्डाल आहे व ज्यानें वध्याचा वेष केला असून ज्याच्यामागून स्त्रीपुत्र येत आहेत, असा चंदनदास येतो.)

चंदनदासाची स्त्री—हाय हाय, धिक्कार असो ह्या आमच्या जिण्यास ! सन्मार्गास नित्य भिऊन वागणाऱ्या अशा आह्मांलादेखील असें दुर्मरण यावेंना ? शिव शिव ! बा दैवा, तुला नमस्कार असो ! अथवा, जे घातकी आहेत, त्यांनां आमच्यासारखीं उदासीन किंवा दुसरीं सर्व सारखींच आहेत. कारण—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मांसादिक भक्ष्य भयें टाकुनि, हरिणें वनीं तृणें खाती,
परि तिलभरिही नसते करुणा व्याधांस त्यांचिया घातीं ! १

(चोहींकडे पाहून) मित्रा विष्णुदासा ! बाबा, तूं उत्तर कां देत नाहींस ? अथवा, अशा प्रसंगीं दृष्टीस पडणारे पुरुष दुर्लभ होत !

चंदनदास—(डोळ्यांत पाणी आणून) हे आमच्यासभोंवती आमचे प्रिय मित्र उभे आहेत! आह्मीं ह्या संकटांतून सुटावें अशी ह्यांची परम इच्छा असूनहि बिचाऱ्यांच्या हातीं काय आहे ? हे केवळ शोकानें दीनवदन होऊन रडत उभे राहिले आहेत ! ह्यांचीं शरीरें मात्र जाग्यावर उभीं आहेत, परंतु अश्रुधारांनीं भरलेलीं नेत्रें आह्मांकडेच लागलीं आहेत !

दोघे चाण्डाळ—(इकडे तिकडे पाहून) श्रेष्ठा चंदनदासा, तूं ह्या सुळीं देण्याच्या जाग्यावर आलास. आतां आपल्या घरच्या माणसांस निरोप दे बावा.

चंदनदास—प्रिये, आतां तूं मुलाला घेऊन माघारी फीर. पुढें सुळीं देण्याची जागा आहे ! पुढें यावयाला योग्य ही जागा नाहीं.

चंदनदासाची स्त्री—(डोळ्यांत पाणी आणून) प्राणप्रिया, तुह्मी आतां परलोकास जावयास निघालां आहां; केवळ देशांतरास जात आहां असें नाहीं. आतां आह्मांसारख्या कुलस्त्रियांनीं माघारी जाणें योग्य नाहीं !

चंदनदास—सखे, विचार कर. पहा, मित्राच्या कार्यासाठीं माझा प्राणनाश होत आहे, कांहीं अपराधानें होत आहे असें नाहीं. असें असतां हर्ष मानावा तें सोडून वेड्यासारखी काय रडतेस ?

चंदनदासाची स्त्री—प्रिया,तर मग अशा हर्ष प्रसंगांत मला माघारी लावून आपण एकटें जावें हें आपल्याला योग्य तरी आहे का ?

चंदनदास—प्रिये, तुझ्या मनांत आहे तरी काय ?

चंदनदासाची स्त्री—(डोळ्यांत पाणी आणून) आपल्या चरणांला सोडून जाऊं नये, एवढीच या दासीची विनंति आहे. मला आज्ञा असावी.

चंदनदास—सखे, हा तुझा विचार नीट नाहीं. कारण, अद्यापि तुझा मुलगा अज्ञान आहे; त्याला अद्यापि लोकरीति माहित नाहीं; त्याचें लालनपालन करून तूं असावें, हेंच योग्य आहे.

चंदनदासाची स्त्री—आतां कुलदेवता प्रसन्न होऊन ह्या मुलाचें पालन करोत. (मुलास) बाळा, पित्याच्या चरणीं शेवटचा नमस्कार कर.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंदनदासाचा पुत्र—(पित्याच्या चरणांवर पडून) बाबा, मी आपणाला सोडून मग काय करूं?

चंदनदास—बेटा, ज्या देशांत चाणक्य नसेल, तेथें जाऊन रहा !

दोघे चाण्डाळ—श्रेष्ठी चंदनदासा, हा शूळ रोविला, आतां तयार हो !

चंदनदासाची स्त्री—अरे बाबांनों, तुह्मी तरी रक्षण करारे, रक्षण करा !

चंदनदास—अरे गड्या, असळ थांव रे दादा.(स्त्रीस)सखे, उगीच कां आक्रोश करितेस ? तुझा आक्रोश ऐकतों कोण ? दुःखित स्त्रीजनास पाहून तक्षणीं दया करणारे नंदराजे स्वर्गास गेले !

पहिला चाण्डाळ—अरे वेणुवेत्रका, तूं धर ह्या चंदनदासाला, ह्मणजे याच्या घरचीं माणसें आपसुकच माघारीं जातील !

दुसरा चाण्डाळ—अरे वज्रलोमका, मला काय ? हा मी त्याला धरतों !

चंदनदास—अरे दादा, असळ थांव, मी एकदा या मुलाला कडकडून भेटतों. (पुत्राला भेटून त्याचें मस्तक हुंगून) बाळा, कधीं तरी मरणें तर आहेच; परंतु आज मी मित्राच्या कार्यासाठीं मरणाचा अनुभव घेतों, ही गोष्ट मोठी आनंदाची आहे.

चंदनदासाचा पुत्र—(चरणांवर पडून) बाबा, आमच्या कुळांत सर्व असेंच करित आले आहेत काय ?

चाण्डाळ—अरे वज्रलोमका, पहातोस काय ? उचल त्याला. (दोघे चाण्डाळ चंदनदासाला शूळावर चढविण्याकरितां धरतात.)

चंदनदासाची स्त्री—बाबांनों, जीव घेऊं नकारे, जीव घेऊं नका ! (इतक्यांत शब्द होतो) शुलपते ! थांव, चंदनदासाला सुळीं देऊं नको !

नाश पावतां स्वामीचें कुल रिपुकुल समान ज्यानें
देखियलें अणि मित्रव्यसनामाजी उत्साहानें १
जसें असावें, तसा राहिला, तुमच्या पराभवाचें
पात्रचि आहे, तरिही मानुनि आत्मा प्रिय, जो वांचे ! २
तो मी राक्षस, माझ्या कंठीं वध्यकंठिंची माला
बांधा आतां, अणीक सत्वर सोडुनि द्यावें त्याला. ३

चंदनदास—(पाहून डोळ्यांत पाणी आणून) अमात्या, हें काय केलें ?

राक्षस—बाबा, हें तुझ्या सत्कृत्याचें उगेंच कांहींसें अनुकरण आहे !

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चंदनदास—अमात्या, माझा एवढा प्रयास आपण निष्फल केला, हें मला रुचत नाहीं !

राक्षस—मित्रा चंदनदासा, आतां मजवर दोष ठेवूं नको. सर्व प्राणी स्वार्थपर आहेत ! (चाण्डाळांस) अरे घातकांनों, जा, हें वर्तमान त्या दुष्ट चाणक्याला जाऊन सांगा.

चाण्डाळ—चाणक्यभटजींस काय सांगूं ?

राक्षस—

हा दुष्काळ, केली[1], असज्जनरुची[2] यामांजि,-दीना अशा,-
रक्षोनी निज जीवितें, मळविलें औशीनरीया[3] यशा;
बुद्धांचेंहि चरित्र तें स्वचरितें केलें उणें, जो अतां
टाकी देह यदर्थ, मी उघड तो आहें तया रक्षिता. १

पहिला चाण्डाळ—अरे वेणुवेत्रका, तूं ह्या चंदनदासाला घेऊन ह्या स्मशान वृक्षाच्या छायेखालीं बैस. मींहि तोंपर्यंत अमात्यराक्षसास धरिलें, असें आर्य चाणक्यास जाऊन कळवितों.

दुसरा चाण्डाळ—वज्रलोमका, बरें आहे, जा, जाऊन सांग आणि लवकर ये. (स्त्री आणि पुत्र ह्यांसहवर्तमान चंदनदासास घेऊन जातो).

पहिला चाण्डाळ—(राक्षसासहवर्तमान इकडे तिकडे फिरून) येथें पहारेकऱ्यांपैकीं कोण आहे रे? जो नंदकुलाच्या सैन्यांचें चूर्ण करण्यास वज्रच होय, आणि ज्यानें मौर्यकुलांत धर्मप्रतिष्ठा केली,असा जो आर्य चाणक्य,त्याला जाऊन सांगा—

राक्षस—(स्वगत) हेंहि शब्द ह्या राक्षसानें ऐकावे ना ?

चाण्डाळ—चाणक्यास ह्मणावें,आपल्या नीतीनें ज्याची बुद्धि आणि पराक्रम कुंठित करून टाकिलीं, असा हा अमात्य राक्षस धरिला आहे! (तदनंतर सर्व शरीर पडद्याच्या आड करून, तोंड मात्र उघडें ठेवून चाणक्य हर्षयुक्त होऊन येतो.)

---

१ दुष्ट कलि. २ दुष्ट जनावर ज्याची प्रीति. ३ उशीनरपुत्र शिबि नामक राजा त्याचें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चाणक्य—अरे सांग सांग,

उत्तुंगज्वाल[1] कोणीं अनल[2] धरुनियां बांधिला हा पटानें[3]?
पाशें बांधूनि कोणीं अनिलगति[4] बळें रोधियेली करानें?
कोणीं रे घातियेला मदगजपतिहा[5] सिंह हा पंजरांत?
कोणी पोहोनि बाहूंकरुनि उतरला सिंधु एका क्षणांत? १

चाण्डाळ—महाराज, नीतिज्ञधुरंधुर अशा आपणच हें सर्व कृत्य केलें!

चाणक्य—छे, असें बोलूं नको. नंदकुळास प्रतिकुळ अशा दैवानें केलें, असें बोल.

राक्षस—(पाहून स्वगत) हाच तो दुरात्मा अथवा महात्मा कौटिल्य!

रत्नाकर[6] सागरसा, शास्त्राकर[7] हा असे, परी तोष
याच्या गुणें न पावूं, आह्मी मत्सर धरूं आणिक रोष! १

चाणक्य—(पाहून स्वगत) अहो, हा अमात्य राक्षस खराच! ज्यानें आपल्या अगाध व अद्भुत बुद्धीनें,

क्लेशें करूनि मजला कधि झोंप नाहीं
येऊं दिली क्षणभरी बहु कल्पनांहीं[8];
माझी मती अणिक मौर्यचमू[9] जयानें
अत्यंत ही श्रमविली अपुल्या भयानें. १

(पडदा वर करून, पुढें येऊन) अहो अमात्य राक्षस, हा विष्णुगुप्त आपल्याला नमस्कार करित आहे.

राक्षस—(स्वगत) सांप्रत मला अमात्य हें विशेषण लज्जाप्रद आहे. (उघड) अहो विष्णुगुप्त, मला चाण्डाळांचा विटाळ झाला आहे, आपण मला शिवूं नका.

चाणक्य—अमात्या, हा चांडाळ नाहीं, हा राजपुरुष आहे. ह्याला सिद्धार्थक ह्मणतात. ह्याला तुह्मीं पूर्वीं कधीं पाहिलें असेल! हा जो दुसरा आहे, हाहि राजपुरुष आहे. ह्याला समिद्धार्थक ह्मणतात. मींच ह्या दोघांशीं आणि शकटदासाशीं सख्य करवून, त्या शकटदासाकडून तें तसें खोटें पत्र लिहविलें. बिचाऱ्या शकटदासाला यांतलें कांहीं ठाऊक नाहीं!

---

१ उन्नत आहेत ज्वाला ज्याच्या. २ अग्नि. ३ वस्त्रानें. ४ वायूची गति. ५ मत्त गजाचा हंता. ६ रत्नांची खाण. ७ शास्त्रांची खाण. ८ अनेक विचारांनीं. ९ सेना.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—(हर्षयुक्त होऊन स्वगत) आनंदाची गोष्ट झाली ! शकटदासाविषयीं उगाच माझ्या मनांत विकल्प आला होता, तो आतां नाहींसा झाला.

चाणक्य—आतां फार काय बोलावयाचें आहे ! थोडक्यांत सांगतों,

ते ते भद्रभटादि, लेखहि तसा, तोहि समिद्धार्थक,
तो त्वन्मित्र भदंत, आणिक [१]अलंकारत्रयप्रापक,
जीर्णोद्यानग तोहि आर्त पुरुष, [२]श्रेष्ठीस जो क्लेश, तो
सारा यत्न मदीय—

(इतकें अर्धेंच बोलून लाजलेंसें करून चवथा चरण फिरवून.)

सारा हा वृषलप्रयत्नचि, तुझा संबंध तो इच्छितो. १

आतां हा वृषल तुझांला भेटावयास येत आहे, ह्याकडे पहावें.

राक्षस—(स्वगत) काय उपाय ? येवो. (उघड) हा मी त्याला पाहतों.

(तदनंतर सेवकासहवर्तमान राजा येतो.)

राजा—(स्वगत) मीं कांहीं उद्योग न करितां, अत्यंत दुर्जय जें शत्रुकुल, त्याचा आर्य चाणक्यानें युद्धावांचूनच पराजय केला, ह्मणून मी आपले ठिकाणीं लज्जित आहें. माझे बाण—

पावोनियां [३]सुफलयोग [४]विलक्ष झाले,
बाहेर जे न कधिंही असती निघाले,
भात्यामध्येंच धरुनी [५]शयनव्रतातें
शोकें अधोमुख असे करिती तपातें. १

धनुष्य प्रत्यंचा न चढवुंनिही, शत्रूविजया
असे शक्त; स्वांतीं मम समचि चिंता बहु जया;
जरी मी झोंपेनें स्वसुखिं असतों, कार्यकरणीं
सदाही जागा तो मम गुरु असे [६]ज्ञानतरणी. २

(चाणक्याच्या पुढें येऊन) गुरुमहाराज, हा मी चंद्रगुप्त चरणांस वंदन करतों.

चाणक्य—वृषला, तुझे सर्व मनोरथ पूर्ण झाले. आतां पूज्य जो अमात्य राक्षस, त्याला नमस्कार कर. हा तुझ्या पित्याच्या वेळेस सर्व अमात्यांत मुख्य होता.

---

१ अलंकार देणारा. २ चंदनदास. ३ प्रयोजन; पक्षीं फल. ४ ज्यांत लक्ष्य नाहीं तें; पक्षीं लक्षशून्य. ५ शयन हेंच व्रत. ६ ज्ञानसूर्य.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—(स्वगत) हं, ह्यानें तें नातें लावलें !

राजा—(राक्षसाजवळ येऊन) श्रेष्ठा अमात्या, मी चंद्रगुप्त चरणांस वंदन करितों.

राक्षस—(राजास पाहून स्वगत) अरे, हा चंद्रगुप्त काय?

ज्याचा पुढें उदय होइल, हें जनानें
बाल्यामधेंचि कथिलें शुभलक्षणानें;
तो हा क्रमेंकरुनि राज्यपदास आला,
येतो जसा कलभयुथप या पदाला. १

(उघड) राजा, तुझा विजय असो.

राजा—

तूं आर्य आणि गुरु तो जरि नित्य पाहे
षाड्गुण्य[1], काय मग दुर्जय[2] वस्तु आहे ?
भूमंडळीं ? तुमचिया सदयावलोकीं[3]
माझा सदा जयचि होय समस्त लोकीं. १

राक्षस—(स्वगत) हा कौटिल्याचा शिष्य मला भृत्यत्वाचें नातें लावित आहे ! अथवा, हा ह्याचा स्वाभाविक विनयच असेल. माझ्या मनांतील मत्सरानें उगीच विपरीत भाव मनांत येतो. हा चाणक्य सर्व प्रकारें यशस्वी आहे, याला शिष्य फार योग्य मिळाला !

सत्पात्र शिष्य असला, तर त्या गुरूतें
ये रोकडें शिकवुनी यश त्या प्रसूतें
नीतिज्ञहि सचिव पावुनि राय मूढ,
पावे लयास तरु जेंवि तटप्ररूढ. १

चाणक्य—अमात्या, चंदनदास वांचावा, अशी आपली वास्तविक मनीषा आहे काय ?

राक्षस—होय, होय, यांत संदेह काय विष्णुगुप्ता ?

चाणक्य—अमात्या, आपण हातांत शस्त्र घेऊन ह्मणजे प्रधानकी स्वीकारून ह्या वृषलावर कृपा करित नाहीं, ह्मणून संदेह. बरें पण, जर तुमच्या मनांत चंदनदास वांचावा असें वास्तविकच असलें, तर हें शस्त्र हातांत घ्यावें.

---

१ संधिविग्रहादिक राज्यकारभार. २ जिंकावयास अशक्य. ३ दयायुक्त.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—आर्या विष्णुगुप्ता ! छे छे, असें ह्मणूं नको. मुळींच आह्मी हें शस्त्र हातीं घेण्यास अयोग्य आहों. तशांत, तुह्मीं हातीं धरिलेलें शस्त्र घेण्यास तर फारच अयोग्य आहों !

चाणक्य— हें काय, मी योग्य आणि आपण अयोग्य हें कसें ? पहा,

निरंतर लगाम घालितां, अश्वांस आली कृशाता,
स्वारांस त्यावरी बैसतां, निद्रा नाहीं क्षणभरी ! १
ज्यांना नाहीं स्नानपान, आहार, विहार, सुखशयन,
कधींहि न सुटे पृष्ठबंधन, फार सुजल्या पाठी ह्यांच्या. २
घोडे आणि सर्व हत्ती, तुझ्या पौरुषास अत्यंत भीती,
रात्रंदिवस सज्ज असती, तूं दृप्तारिहंता ह्मणोनी. ३

अथवा, इतकें तरी कशाला पाहिजे ? एकच सांगतों, कीं आपण हातांत शस्त्र घेतल्याशिवाय चंदनदासास जीवित दुर्लभ आहे !

राक्षस—(स्वगत)

नंदस्नेह मनीं अजूनि वसतो, तच्छत्रुचा चाकर
झालों; वाढविल्या तरूंस, न कळे, तोडो कसा हा कर ?
मित्रांगावरि शस्त्रही तरि कसें धाधांत रोषें अतां
टाकावें ? नुमजेचि दैवगति ही ब्रह्मादिकां तत्वता ! १

(उघड) बाबा विष्णुगुप्ता, आण तें शस्त्र. ह्या मित्रस्नेहाला नमस्कार असो ! हा जें पाहिजे तें करवील. काय करावें, उपाय नाहीं. हा मी सज्ज आहें शस्त्र घेण्याला.

चाणक्य—(हर्षानें आपल्या हातचें शस्त्र देऊन) वृषला, अरे वृषला, अमात्य राक्षसानें शस्त्र घेतलें, हा ह्याचा तुजवर मोठा अनुग्रह झाला. आतां तुझी बढती आहे बरें !

राजा—गुरुजी, ह्या चंद्रगुप्तावर हा सर्व आपल्या चरणांचा प्रसाद आहे.

(इतक्यांत एक पुरुष येतो.)

पुरुष—गुरुजी, मलयकेतूला भद्रभट, भागुरायण इत्यादिकांनीं कैद करून आणिलें आहे. तो दरवाज्याबाहेर आहे. काय करणें ती आज्ञा करावी.

चाणक्य—हो, ऐकिलें. अरे, सांप्रत अमात्य राक्षसाकडे राज्यकारभार आहे, त्यांनां विचारावें.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राक्षस—(स्वगत) काय सांगावें ? आतां हा कौटिल्य मला दास करून, माझ्या तोंडानें बोलवित आहे ! असो. उपाय काय ? (उघड) राजा चंद्रगुप्ता, तुला विदितच आहे कीं, आह्मीं किती एक दिवस मलयकेतूजवळ राहून काळ घालविला आहे. त्या अर्थी आह्मींच त्याच्या प्राणांवर उठावें, हें योग्य नाहीं. याकारितां विनंति ऐकून, त्यांचे प्राण वांचवावे.

(राजा चाणक्याच्या तोंडाकडे पाहतो.)

चाणक्य—वृषला, पहिल्यानेंच अमात्य राक्षसाची मर्जी मोडूं नको. (पुरुषाकडे पाहून) अरे जा, भद्रभटादिकांस मीं सांगितलें आहे ह्मणून सांग कीं, अमात्य राक्षसानें विनंति केल्यामुळें, चंद्रगुप्त राजा मलयकेतूला त्याच्या पित्याचें राज्य देत आहे; तर तुह्मीं जाऊन मलयकेतूला त्याच्या देशांत स्थापून पुन्हा माघारें यावें.

पुरुष—आज्ञा गुरुजी.

चाणक्य—अरे, अंमळ थांब. त्या विजयपालाला आणि दुर्गपालाला सांग कीं, अमात्य राक्षसानें शस्त्र घेऊन राज्यकारभार पतकरला, ह्मणून संतुष्ट होऊन राजानें आज्ञा केली आहे कीं, चंदनदास शेटजींला पृथ्वींत जितकीं नगरें आहेत, त्या नगरांतील सर्व सावकारांत मुख्यत्व द्यावें.

पुरुष—आज्ञा महाराज.

[जातो.

चाणक्य—चंद्रगुप्ता, तुझें आणखी प्रिय काय करूं ?

राजा—गुरुजी, आणखी याहून दुसरें काय प्रिय आहे ?

> **राज्यावरी वसविलें मजलागिं, साची**
> **मैत्री करोनि दिधली मज राक्षसाची;**
> **ते नंदही उपडिले उरले न कांहीं,**
> **याहूनही प्रिय दुजें उरलेंच नाहीं !** १

चाणक्य—विजये, दुर्गपाल आणि विजयपाल ह्या दोघांनां जाऊन सांग कीं, अमात्य राक्षस अनुकूल झाला ह्मणून संतुष्ट होऊन चंद्रगुप्त आज्ञा करित आहे कीं, हत्ती आणि घोडे, ह्यांवाचून सर्वांस बंधनापासून मुक्त करावें. अथवा, अमात्य राक्षस कारभार चालविणारा असतां, सर्व हत्ती घोडे ह्यांचें तरी काय प्रयोजन आहे ? ह्मणून आतां,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाहनगजांस वर्जुनि बंधांतुनि अवघियांस सोडावें,
पूर्णप्रतिज्ञ होउनि म्यां केवळ या शिखेस बांधावें ! १

(शेंडी बांधतो.)

प्रतीहारी—आज्ञा महाराज.

[जाते.

चाणक्य—अमात्य राक्षसा, आणखी तुझें प्रिय काय करूं?

राक्षस—ह्याहूनहि दुसरें प्रिय काय आहे? तथापि इच्छाच असेल तर हें करावें—

(भरतवाक्य.)

वाराही[1] ज्या प्रभूनें प्रबलतर तनू[2] घेतली स्वःपतीज्या[3],
ज्याच्या दंष्ट्राग्रभागीं प्रलयसमयिं जी राहिली स्वस्थ ईज्या[4]
म्लेंच्छोद्विग्ना[5] अजो ती भुजयुगलिं वसे त्याचिया राजमूर्ती,
तो रक्षो नित्य हीतें मुदितसुत[6] नयें चंद्र[7] सत्काममूर्ती[8].

[सर्व जातात.

[सातवा अंक समाप्त.]

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. 3459
35595

समाप्त.

---

१ वराहाची. २ शरीर. ३ इंद्रानें पूज्य. ४ पृथ्वी. ५ म्लेंच्छापासून त्रासलेली. ६ आनंद पावले आहेत पुत्र ज्याचे. ७ चंद्रगुप्त राजा. ८ सज्जनांचे मनोरथ पूर्ण करणारा (चंद्रगुप्त राजाचें विशेषण.)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीनें

प्रसिद्ध केलेलीं विक्रीस तयार पुस्तकें.

पुस्तक	नांव	किंमत.
१ लें,	धाकट्या सुनबाई.	०-८-०
२ रें,	[illegible]च्या गोष्टी.	१-६-०
३ रें,	गुणसुंदरी.	०-१२-०
४ थें,	नवयुग.	०-१२-०
५ वें,	सरस्वती.	०-१०-०
६ वें,	द्रोणसंकोप.	०-६-०
७ वें,	[illegible]	०-८-०
८ वें,	सुंदरमाधव.	०-१०-०
९ वें,	रावबहादुर पर्वीला.	[illegible]-६-०
१० वें,	कुसुमगुच्छ.	०-४-०
११ वें,	मृणालिनी.	०-८-०
१२ वें,	[illegible]	१-[illegible]-०
१३ वें,	माणिकबाग.	१-४-०
१४ वें,	महुरगडच्या स्त्रिया.	०-६-०
१५ वें,	रामालोडरसाह.	०-१२-०
१६ वें,	प्रियंवदा.	०-८-०
१७ वें,	संसाररंजन.	१-०-०
१८ वें,	[illegible] बंगाल.	०-४-०
१९ वें,	[illegible]चरित्र.	०-४-०
२० वें,	भयंकर अहदना.	०-६-०
२१ वें,	[illegible] जिजाबाई.	०-[illegible]-०
२२ वें,	[illegible]	०-१२-०
२३ वें,	[illegible]	०-८-०
२४ वें,	मालतीमाधव.	०-८-०
२५ वें,	उपदेशपाठ.	०-४-०
२६ वें,	परिणामीं हेंच.	०-८-०

१	रत्ना आणि माधव.	०-४-०
२	मुरारराव.	०-४-०
३	हंसकूल.	०-२-०
४	मोहनतारा.	०-२-०
५	विलक्षण [illegible].	०-१-०

मनोरंजनाचीं बांधलेलीं पुस्तकें :—

पुस्तकें ४,५,६ वें. (एकत्र)	[illegible]
पुस्तक ७ वें,	[illegible]
पुस्तक ८ वें,	१-४-०
पुस्तकें ९,१०,११ वें. (एकत्र)	२-८-०

[illegible] बांधलेलीं पुस्तकें :—

पुस्तक १,२,३. (एकत्र)	२-०-०

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी.

गिरगांव-मुंबई.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi